सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ७५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ग्रामीण भागातही महायुतीच

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये दणदणीत विजय

## लोकसभा ते पंचायत समिती विजयाचे वर्तुळ पूर्ण

◆ **मुंबई ९ फेब्रुवारी**

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालांत ग्रामीण महाराष्ट्रातील सत्तासमीकरणात भाजप सरस ठरली असून १२ जिल्हा परिषदांमध्ये महायुतीची सत्ता स्थापन करण्यास जनतेने कौल दिला आहे. शहरी भागात भाजपसह महायुतीने मिळवलेले यश कायम राखत महाविकास आघाडीला शहरासह ग्रामीण महाराष्ट्रातून हद्दपार केले आहे. तसेच लोकसभा ते पंचायत समिती असे विजयाचे वर्तुळ महायुतीने पूर्ण केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. या निकालातून ग्रामीण भागांत महायुतीही भक्कम झाली असल्याचे स्पष्ट झाले. शहरी भागासह ग्रामीण भागातूनही महाविकास आघाडीला जनतेने धूळ चारली आहे.

**कोकणात शिंदे गटाची ताकद**

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत शिवसेना शिंदे गटाने सर्वाधिक जागा जिंकत कोकणातील आपला जनाधार अजूनही अबाधित असल्याचे दाखवून दिले. कोकणातील ही कामगिरी शिंदे गटासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

**पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादीचा प्रभाव**

पश्चिम महाराष्ट्रात मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचा दबदबा कायम राहिला. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत दोन्ही राष्ट्रवादी गटांनी आपापली ताकद दाखवली. कोल्हापुरात हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीने आघाडी घेतली, तर काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांनीही एकाकी लढतीत आपली राजकीय ताकद सिद्ध केली. येथे सत्ता स्थापनेसाठी बहुमताची समीकरणे गुंतागुंतीची बनली आहेत.



जिल्हा परिषदेतील विजयानंतर कराड येथे जल्लोष करताना भाजपा कार्यकर्ते

**सोलापूरमध्ये पारंपरिक घराणेशाहीला धक्का**

सोलापूर जिल्हा परिषदेत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि राम सातपुते यांच्या नेतृत्वाखालील गटाने मोहिते पाटील घराण्याचे दीर्घकाळचे वर्चस्व मोडीत काढले. या निकालाने जिल्ह्यातील पारंपरिक सत्ताकेंद्राला मोठा धक्का बसला आहे.

**पुण्यात राष्ट्रवादीचे पुनरुत्थान**

महानगरपालिका निवडणुकांतील पराभवानंतर अडचणीत सापडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे जिल्हा परिषदेत मोठे यश मिळाले. ४३ जागांवर आघाडी घेत राष्ट्रवादीने ग्रामीण भागात वर्चस्व असल्याचे सिद्ध केले. भाजपला येथे केवळ आठ जागांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेना शिंदे गटाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

**सांगलीत चुरशीची लढत**

सांगली जिल्ह्यात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात काट्याची टक्कर झाली. राष्ट्रवादी १९, भाजप १६, काँग्रेस ११ आणि इतर गटांनीही महत्त्वपूर्ण जागा मिळवत सत्ता स्थापनेची समीकरणे खुली ठेवली आहेत. येथे काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीची शक्यता वर्तवली जात आहे.

**लातूरमध्ये काँग्रेसचा वरचष्मा**

लातूर जिल्ह्यात काँग्रेसने सर्वाधिक २३ हून अधिक जागांवर आघाडी घेत ग्रामीण मतदारांचा कौल आपल्या बाजूने वळवला. महानगरपालिकेप्रमाणेच जिल्हा परिषदेतही काँग्रेसला पाठिंबा मिळाल्याने पक्षाला नवसंजीवनी मिळाली आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

### सात जिल्ह्यांत भाजपा अव्वल

» भाजपने सात जिल्हा परिषदांमध्ये सर्वाधिक जागा जिंकत आघाडी घेतली. विशेषतः मराठवाड्यातील परभणीत भाजपने २४ जागा मिळवत स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित केले. येथे राष्ट्रवादी काँग्रेसला १५ जागांवर समाधान मानावे लागले, तर शिवसेनेचे दोन्ही गट आणि काँग्रेस पिछाडीवर गेले.

### एकूण आकडेवारी (१२ जिल्हे)

| | |
|---|---|
| एकूण जिल्हा परिषद : | १२ |
| एकूण निवडणूक विभाग : | ७३१ |
| एकूण जागा : | ७३१ |
| एकूण उमेदवार : | २६९७ |
| **पक्षनिहाय एकूण विजयी जागा** | |
| भाजप : | २२५ |
| राष्ट्रवादी काँग्रेस : | १६५ |
| शिवसेना : | १६२ |
| काँग्रेस : | ५५ |
| शिवसेना (उद्धव गट) : | ४३ |
| राष्ट्रवादी काँग्रेस (शप) : | २६ |
| मनसे : | २ |
| अन्य : | ४१ |
| राज्याबाहेरील नोंदणीकृत पक्ष : | ७ |
| अप्रमाणित पक्ष : | १४ |
| अपक्ष : | २० |




### पंचायत समित्यांवरही 'भाजपा'चा वरचष्मा

### काँग्रेस, उध्दवसेनेने 'भोपळा'ही फोडला नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ व पंचायत समितीच्या १३६ जागांसाठी शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान झाले. सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या मतमोजणीअंती सोलापूर जिल्हा परिषदेवर भारतीय जनता पार्टीचे 'कमळ' फुलल्याचे स्पष्ट झाले.

जि.प.च्या एकूण ६८ जागांपैकी तब्बल ३८ जागा मिळवत 'भाजपा'ने जिल्हा परिषदेवर एकहाती सत्ता मिळविली. विशेष म्हणजे, काँग्रेस आणि उध्दवसेनेला 'भोपळा'ही फोडता आला नाही.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाने १०, शिवसेना शिंदे गटाने ८, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने ६, सांगोला शेकाप आघाडीने ३, करमाळा विकास आघाडीने २, पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आघाडीने १ जागा पटकावले.

मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने ११ तालुक्यात एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली होती. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण २४ लाख ५९ हजार २२७ मतदार होते. **(पान २ वर)**

# आजपासून बारावीची परीक्षा

# राज्यात १५.३२ लाख विद्यार्थी

### १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत 3 हजार ३८७ केंद्रांवर होणार परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.९ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बारावीच्या (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) परीक्षेसाठी १५ लाख ३२ हजार ४७८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत राज्यातील ३ हजार ३८७ मुख्य केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे, अशी माहिती मंडळाचे प्रभारी अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी पत्रपरिषदेत दिली.

पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण अशा एकूण नऊ विभागीय मंडळांमार्फत परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख २० हजार २२९ मुले, ७ लाख १२ हजार २४० मुली आणि १८ तृतीयपंथी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. एकूण १० हजार ६६४ कनिष्ठ महाविद्यालयांमधून या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.



विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. मंडळाने 'कॉपीमुक्त अभियान'च्या अनुषंगाने विविध बैठका घेण्यात आल्या आहेत. परीक्षा काळात वीजपुरवठा खंडित होऊ नये; यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून पारदर्शकता राखण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहे, असेही त्यांनी सांगितले.

### माझ्या एका मताने काय होणार?

**ढोकीत भाजपाला फटका**

**धाराशिव** - जिल्ह्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या एका उमेदवाराचा अवघ्या एका मताने विजय झाल्याची थक्क करणारी घटना घडली आहे. या निकालाद्वारे माझ्या एका मताने काय होणार? असे म्हणत लोकशाही व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या मतदारांसाठी मोठा संदेश असल्याचे मानले जात आहे. धाराशिवच्या ढोकी पंचायत समिती गणात लोकशाहीच्या ताकदीचे सर्वात थरारक चित्र दिसून आले. येथे भाजपा उमेदवार निहाल काझी यांचा अवघ्या एका मताने पराभव झाला, तर ठाकरे गटाच्या अमर समुद्रे यांचा निसटता, पण ऐतिहासिक विजय झाला.

# महाराष्ट्रात लवकरच मेगा भरती

## नव्या पद्धतीने भरणार ७० हजार जागा : मुख्यमंत्री फडणवीस

◆ **मुंबई, ९ फेब्रुवारी**

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील पदांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रिया राबविताना आवश्यक कौशल्ये, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भात बैठक झाली. राज्य



प्रशासनातील महत्त्वाच्या विभागांकडे सर्वांगीण प्रशासन सुधारणा वेगाने राबवाव्यात. मनुष्यबळ व्यवस्थापन आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता याला प्राधान्य असेल. राज्य शासनाच्या सेवा प्रवेश नियमावली सुधारणेसंदर्भातील निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करणार

» सामान्य प्रशासन विभाग हा केवळ औपचारिक नाही, तर शासनाच्या संपूर्ण भरती प्रणालीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्य शासनाच्या विविध विभागात ७० हजार पदे भरल्यानंतर विभागाच्या कार्यक्षमतेत भर पडणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर देण्याच्या सूचना केल्या.

पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाईन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरता येईल. यासाठी प्रत्येक विभागाने ब्लॉकचेन पद्धतीबरोबरच डीजीलॉकर प्रणालीत प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करावी. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे. येणाऱ्या एका वर्षात महाराष्ट्रात गव्हर्नन्स रिफॉर्मचे नवे मॉडेल उभे राहील. यात प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

### विचारपुष्प



शरीर धारणेसाठी आवश्यकतेनुसार उपभोगपूर्ती स्वीकारूनही सहअस्तित्वावर आच येऊ नये म्हणून संवेदनशीलतेचा अंकुश प्रभावी राखण्यासाठी आपल्या ऋषिमुनींनी उपाय सुचविले आहेत. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' या श्लोकाची प्रेरणा संवेदनशीलतेच्या अंकुशाचेच प्रतीक आहे; परंतु या अंकुशाला जनमानसात सतत जागरूक आणि प्रभावी ठेवण्यासाठी अनुकूल वातावरणनिर्मिती अत्यंत आवश्यक आहे.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
**संस्थापक,**
**दीनदयाल शोध संस्थान**


# शरद पवारांची तब्येत बिघडली; रुग्णालयात दाखल

**पुणे, दि. ९ फेब्रुवारी -**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती आज अचानक बिघडली आहे. त्यांना तातडीने बारामतीहून पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. तिथे त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार सुरू आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवारांची प्रकृती काहीशी ढासळली होती. त्यामुळे ते आज अजित पवारांच्या तेराव्याच्या कार्यक्रमातही सहभागी झाले नव्हते. पण तब्येत फारशी सुधारणा न झाल्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या भीषण विमान अपघातात निधन झाले होते. त्याचा मोठा धक्का शरद पवारांसह त्यांच्या कुटुंबीयांना बसला होता. अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवार सातत्याने श्रद्धांजली कार्यक्रम व भेटीगाठींमध्ये व्यस्त होते. यामुळे त्यांची दगदग वाढली होती. त्यातच गत काही दिवसांपासून प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांनी सार्वजनिक कार्यक्रम टाळले होते. आज अजित पवार यांच्या तेराव्याच्या कार्यक्रमालाही ते उपस्थित राहू शकले नाही. त्यांनी घरीच विश्रांती घेणे पसंत केले होते.

पण त्यानंतरही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने अखेर डॉक्टरांच्या सल्लानुसार त्यांना पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात हलण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार शरद पवार यांना बारामतीहून पुण्यात आणण्यासाठी विशेष वैद्यकीय व्यवस्था करण्यात आली. त्यांच्या ताफ्यात वैद्यकीय पथकासह कार्डियाक सुविधांनी सज्ज अशी रुग्णवाहिका ठेवण्यात आली. काही वेळापूर्वीच ते रुग्णालयात पोहोचले. तिथे त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टर सिमोन ग्रँट यांच्या निगराणीत उपचार सुरू आहेत. शरद पवारांच्या प्राथमिक तपासणीनंतर त्यांच्यावरील पुढील उपचारपद्धती ठरवली जाणार आहे. गरज भासली तर त्यांना रुग्णालयात ॲडमिटही केले जाईल. सूत्रांच्या माहितीनुसार, शरद पवारांना खोकल्याचा त्रास होत आहे. आज सकाळपासून त्यांचा त्रास वाढला. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यांच्यासोबत त्यांच्या कन्या तथा खासदार सुप्रिया सुळेही आहेत. शरद पवारांना सुरूवातीला गाडीतून व्हिलचेअरवर बसवून रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर त्यांना ऑक्सिजन मास्क घालून बेडवरुनच तपासणीला नेण्यात आले. त्यांचा यासंबधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सुप्रिया सुळे, सदानंद सुळे, रोहित पवारही शरद पवारांसोबत रूग्णालयात आहेत. सध्या पवारांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दगदगीमुळे पवारांच्या छातीत कफ झाला असून, त्यांच्या योग्य त्या तपासण्या केल्या जात आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.



**उपचार सुरु, प्रकृती स्थिर : सुप्रिया सुळे**

शरद पवार यांना रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल केल्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी रुग्णालय प्रशासनाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी केवळ एक कौटुंबिक सदस्य म्हणून नाही, तर एक जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून डॉक्टरांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. 'डॉक्टर, तुम्ही जसं म्हणाल तसंच आम्ही सगळे वागू. तुमचे सजेशन आमच्यासाठी अंतिम राहील,' असे म्हणत त्यांनी उपचाराची पूर्ण सूत्रे डॉक्टरांच्या हाती सोपवली. माध्यमांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली चिंता दूर करण्यासाठी त्यांनी विनंती केली की, 'पुढील १० मिनिटांत डॉक्टर स्वतः माध्यमांना शरद पवार यांच्या प्रकृतीची अधिकृत माहिती देतील.' तसेच कोणत्याही व्हिजिटर्सला आत सोडू नका. हॉस्पिटलचे सगळे नियम काटेकोरपणे पाळा, अशी सूचना त्यांनी प्रशासनाला दिली.

# विकासावर जनतेचा विश्वास

**मुंबई, ९ फेब्रुवारी**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समितीच्या निकालात भाजपा ६० ठिकाणी नंबर एकचा पक्ष ठरला आहे. छत्रपती संभाजीनगर, सिंधुदुर्ग, सांगली, धाराशिव, परभणी आणि सातारा जिल्ह्यात भाजपाचे सर्वाधिकार उमेदवार निवडून आले.



१२ जिल्हा परिषदांध्ये महायुतीचीच सत्ता येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले, शिवसेना रत्नागिरी आणि रायगडमध्ये नंबर एकवर आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस पुण्यामध्ये नंबर एकवर आहे. २०१७ साली १२ जिल्हा परिषदांध्ये भाजपाकडे १४१ जागा होत्या, पण आत्तपर्यंत घोषित झालेल्या निकालांध्येच २३६ जागा मिळाल्या आहेत.

पंचायत समितीत २०१७ साली भाजपाकडे एकूण २८४ जागा होत्या, पण आत्तापर्यंतच्या यावेळी ४१० जागा मिळाल्या आहेत. जनतेने विकासाला प्राधान्य देत विरोधकांच्या नकारात्मक प्रचाराला नाकारले. महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा महायुतीवरच आपला विश्वास दाखवला आहे. १२ जिल्हा परिषदां ध्ये महायतीतीचीच सत्ता येईल, हे निकालातून स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान मोदी यांनी ग्राम विकासाचे हाती घेतलेले कार्य आणि राज्य सरकारने राबविलेल्या विविध योजनांवर जनतेने विश्वास दाखवला आहे.

आज प्रत्येक जिल्ह्यामध्ये महायुतीतील पक्षांना प्रचंड समर्थन मिळत आहे, आणि त्याचाच हा परिणाम आहे. निवडणूक प्रचारात महाविकास आघाडी फारशी कुठे दिसत नाही. त्यामुळे आम्हालाही फारसे काही करण्याची गरज नाही. त्यांचे प्रवक्ते रोज सकाळी ९ वाजता टिप्पण्या करतात, त्यातून त्यांची मते कमी करण्याचे काम होते. लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास उडाला आहे. मुळात विरोधकां ध्ये लढण्याची इच्छाशक्ती नाही.

> महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेने सुशासन आणि विकासाला प्राधान्य देत जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीतून महायुतीला जनादेश दिला. राज्याच्या गौरवशाली संस्कृतीच्या भावनेनुसार काम करणारी युती हवी आहे हे निकालातून स्पष्ट झाले. या विजयाबद्दल मी जनता आणि भाजपा कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



# माळशिरस पंचायत समितीवर राष्ट्रवादीची सत्ता

- अठरापैकी राष्ट्रवादी आघाडीला बारा तर भाजपाला सहा जागा
- जिल्हा परिषदेमध्ये नऊ पैकी सात सदस्य विजयी भाजपाला दोन जागा

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ९ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची मतमोजणी सोमवारी सकाळी दहा वाजता २४ टेबलवर प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाली या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी शिवसेना आघाडीला जिल्हा परिषदेचे नऊपैकी सात गट मिळाले व पंचायत समितीच्या १८ गणापैकी बारा पंचायत समितीचे गण मिळाले तर भाजपला पंचायत समितीचे सहा गण व जिल्हा परिषदेचे दोन गण मिळाले.

सर्वप्रथम दहीगाव जि प गट व दहीगाव व गुरसाळे पंचायत समिती गण यांची मतमोजणी सुरू करण्यात आली या मतमोजणीत धक्कादायक निकाल बाहेर आला पं स माजी उपसभापती राष्ट्रवादी शरद पवरा पक्षाचे अर्जुनसिंह मोहिते पाटील हे फोंडशिरस जि प गटातून ९५४ विजयी झाले तर गुरसाळे गणातून ३०० मतांनी पराभुत झाले. माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी भाजपाच्या संस्कृती सातपुते या दहीगाव जिल्हा परिषद गटातून ११७४ मतांनी विजयी झाल्या तर आमदार उत्तमराव जानकर यांचे पुत्र जीवन जानकर दहिगांव जिप गटातुन पराभुत झाले. माजी पंचायत समिती सदस्य राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे गौतम माने मांडवे जिप गटातून १०५३ मतांनी विजयी झाले.

फेर मतमोजणीत भाजपच्या ऋतुजा पराडे पाटील या १९ मतांनी विजयी झाल्या. पंचायत समितीच्या माजी सभापती वैष्णवीदेवी अर्जुनसिंह पाटील या यशवंतनगर पंचायत समिती गणातून ५६८४ मतांनी विजयी झाल्या तर आमदार उत्तमराव जानकर यांच्या पत्नी विमल उत्तम राव जानकर या वेळापूर पंचायत समिती गणातून विजयी झाल्या. आर.पी.आय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या पत्नी मीनाक्षी सरतापे या वेळापूर जिल्हा परिषद गटातून ५९१७ मतांनी विजयी झाल्या. बोरगाव जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादीचे उमेदवार नागनाथ भोसले हे ५०६५ मतांनी विजयी झाल्या. एंकदरीत तालुक्यातील मतदारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आघाडीला आपली पसंती दिल्याचे दिसत आहे





## करकंबमध्ये कमळ फुलले

**करकंब, दि. ९ फेब्रुवारी-**

करकंब जिल्हा परिषद गटातून भाजपाचे आदिनाथ देशमुख व पंचायत समिती गणामधून राहुल पुरवत हे बहुमताने निवडून आले आहेत.करकंब जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गटामधून दोन्हीही भाजपचे उमेदवार निवडून येणार असल्याचे संकेत दैनिक तरुण भारतने दिले होते. विजयी उमेदवारांचे मतदारांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## अज्ञात कारणावरून लोखंडी रॉडने व गाडीच्या चावीने मारहाण

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी -**

अज्ञात कारणावरून दोघांना लोखंडी रॉडने व गाडीच्या चावीने मारहाण केल्याने तोंडास डोक्यास व सर्वांगास मुका मार लागल्याने त्यांना शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले.याबाबतची अधिक माहिती अशी की, दि. ९ फेब्रुवारी रोजी राहत्या घराजवळ अज्ञात कारणावरून आकाश जोगी याने लोखंडी रॉडणे व गाडीच्या चावीने मारहाण केल्याने संतोष यल्लाप्पा तलवार वय २० रा. स्वागत नगर सोलापूर यांच्या तोंडास जखम व सर्वांगास मुकामार लागला आहे तर प्रफुल्ल प्रकाश कोरे वय २१ यांच्या डोक्यास जखम झाली असून सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे ते स्वतः दाखल झाले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे

# पोलिस भरतीवेळी उमेदवारांनी स्पाइक शूज घालणे टाळावे

- पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे उमेदवारांना आवाहन
- मुख्यालय मैदानावर उद्यापासून सोलापूर शहर पोलीस भरती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

१०० मीटर धावण्यासाठी उमेदवार जे स्पाईक शूज घालतात त्यांना त्याची परवानगी नसणार आहे, जे नॉर्मल स्पोर्ट शूज आहेत तेच उमेदवारांनी वापरावे, असे आवाहन पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी उमेदवारांना केले आहे.

शहर पोलीस दलाची भरती प्रक्रिया ११ ते १४ फेब्रुवारी दरम्यान पोलीस मुख्यालय मैदान येथे घेण्यात येणार आहे. मैदानी चाचणीच्या दरम्यान दररोज अंदाजे १००० ते अकराशे इतके उमेदवार यांना बोलवण्यात आले आहे. ही प्रक्रिया सीसीटीव्हीच्या निगराणी खाली होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

बुधवार ११ फेब्रुवारी रोजी ७३ कॉन्स्टेबल ६ बँड्समन या जागांसाठी ११ ते १३ फेब्रुवारी पर्यंत साडेतीन ते चार हजार उमेदवार चाचणी देतील. १४ फेब्रुवारी रोजी चाचणी ही महिलांसाठी असेल यामध्ये महिला व माजी सैनिक असे ८७८ उमेदवार चाचणी देतील. पूर्ण प्रक्रिया ही पोलीस मुख्यालयात होणार आहे. चाचणी दरम्यान कोणाला शंका असल्यास किंवा आल्यास दोन अपील कमिटी नेमण्यात आलेले आहेत. यामध्ये एसीपी मळाले हे अपील अधिकारी आहेत यांच्याकडे हाईट, चेस्ट किंवा इतर शंका असल्यास ते व्हिडिओद्वारे पारखून त्यांना संधी देण्यात येईल. जर शंकेचे निरसन न झाल्यास डीसीपी हसन हे अपील अधिकारी असतील.

### स्पायराइट किंवा इतर पदार्थांचा सेवन करणे टाळावे

उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला, आश्वासनाला बळी न पडता चाचणी पार पाडावी ही सर्व प्रक्रिया मेरिट बेसवर होणार आहे. स्पायराईट किंवा इतर पदार्थांचा सेवन करणे टाळावे असे आढळून आल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल होऊन पोलीस भरतीच नव्हे तर इतर शासकीय सेवेत देखील भरती अटेंड करू शकणार नसल्याचे आयुक्तांनी सांगितले.

# अक्कलकोट पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा; विकास कामांचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ फेब्रुवारी-**



सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट मतदार संघात भाजपाने केलेल्या विकास कामांच्या बळावर भाजपाला पंचायत समितीमध्ये बहुमत प्राप्त करून दिले. पंचायत समितीच्या १२ पैकी ८ जागा जिंकल्या जिल्हा परिषदेच्या ६ जागापैकी ४ जागा जिंकल्या. आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे वर्चस्व रोखण्यासाठी शिंदे सेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कांग्रेस यांची संयुक्त आघाडी करून भाजपा विरोधात उमेदवार दिले होते. मात्र आ. कल्याणशेट्टीनी सर्व विरोधकाशी एक हाती झुंज दिली.

जेऊर मंगरूळ जिप गट गण खेचुन आणला. कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लीकार्जुन पाटलांचा जेऊर गट व माजी आ. कै. सिद्रामप्पा पाटील यांच्या मंगरूळ जिप गट बालेकिल्लयात भाजपाने मुसंडी मारून यश मिळवले. जेऊर गड कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लीकार्जुन पाटलाना राखता आला नाही. कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षाना हा फार मोठा धक्का मानला जातो. पोलादी पुरुष म्हणून ओळख असलेल्या कै. आ. सिद्रामप्पा पाटील यांच्या मंगरूळ जिल्हा परिषद गटात पाटील गटास वर्चस्व राखता आले नाही. जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील पंचायत समितीचे माजी सभापती संजीवकुमार पाटील, रमेश पाटील बंधूनां शिंदे सेनेचे जेष्ठ नेते माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे व कॉंग्रेस तालुकाध्यक्ष मल्लीकार्जुन पाटील यांची साथ मिळुनही पाटलांचा मंगरुळ जिप गट शाबित राहिला नाही .

जिल्हा परिषदेच्या ६ जागांपैकी आ. कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने चपळगाव जिप गट 'जेऊर जिप गट मंगरूळ नागणसुर जिप गट जागा जिकल्या. माजी आ सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे सेनेने वागदरी जिल्हा परिषद गट, सलगर जिल्हा परिषद गट, शिरवळ गण, तोळणुर प.स. गण, सलगर गण, मुगळी गण जिंकल्या. पंचायत समितीच्या १२ जागापैकी भाजपाने चप्पळगाव गण, कुरनुर गण, वागदरी गण, जेऊर गण, दहिटणे गण, सुलेरजवळगा, मंगरूळ, नागणसुर गण काबिज केला.

## पान १ वरून...

### 'कमळ'मय सोलापूर

१६ लाख २० हजार ५७७ इतक्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यात ८ लाख ६१ हजार ६७५ पुरुष, ७ लाख ५८ हजार ८८६ महिला तर १६ इतर मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यात सरासरी ६५.९० टक्के इतके मतदान झाले होते.

### उत्तर सोलापूरमध्ये माने-पवारांचे वर्चस्व

उत्तर सोलापूर तालुक्यातील तीन गटात आणि पंचायत समितीच्या ४ गणात भाजपा उमेदवारांनी बाजी मारली. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटाला प्रत्येकी १ जागा मिळाली. उत्तर सोलापूर तालुक्यावर माने-पवार वर्चस्व कायम राखले. ज्येष्ठ नेते बळीराम काठे यांना पराभव चाखावा लागला.

### बार्शीत भाजपाचा ऐतिहासिक विजय

बार्शी तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ६ पैकी ६ तर पंचायत समितीच्या १२ पैकी १२ जागा जिंकून माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील भाजपाने ऐतिहासिक विजय संपादन केला. सर्व अठरा उमेदवारांनी विक्रमी असे मताधिक्य घेत मिळवलेला विजय हा रेकॉर्ड ब्रेक आणि न भूतो न भविष्यती असा ठरला आहे.

### दक्षिणच्या पं.स.मध्ये भाजपाला एकहाती सत्ता

दक्षिण सोलापूर तालुक्यात मतमोजणीत भाजपाने दक्षिण पंचायत समितीवर एकहाती सत्ता मिळवली. पंचायत समितीच्या १२ जागांपैकी ११ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिध्द केले. जिल्हा परिषदेच्या सहा जागांपैकी पाच जागा जिंकल्या. हत्तुर जिल्हा परिषद गट व भंडारकवठे पंचायत समिती गणात शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले.

### माळशिरस तालुक्यातही फुलले कमळ

माळशिरस तालुक्यात ७ गटांपैकी ६ जागांवर राष्ट्रवादीने बाजी मारली आहे. पंचायत समितीच्या १४ जागांपैकी ५ जागांवर भाजपाचे कमळ फुलले आहे. दहिगाव गटात आ.उत्तम जानकर यांचे चिरंजीव आणि माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांच्यात लढत होती. यात सातपुते यांनी जानकर यांच्यावर मात केली. फोंडशिरस जि.प.गटातून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुतणे अर्जुनसिंह मोहिते पाटील हे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाकडून विजयी झाले.

### माढा तालुक्यातही भाजपा सरस

माढा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकमध्ये भाजपा सरस ठरले. जि.प.च्या ४ तर पं.स.च्या ७ जागांवर विजय संपादन केले. आमदार अभिजीत पाटील यांना शिंदे वरचढ ठरल्याचे दिसून येत आहे. जि.प.गटातून राष्ट्रवादीला २ तर शिवसेनेला १ जागा मिळाले. पंचायत समितीत राष्ट्रवादी अप ५ राष्ट्रवादी शप १ अपक्ष १ जागेवर विजयी झाले आहेत.

### पंढरीत परिचारकांना मिळाल्या अवघ्या ३ जागा

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ८ पैकी ४ जागांवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे, तीर्थक्षेत्र विकास आघाडीला १ जागा तर अवघ्या ३ जागांवर परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपाच्या उमेदवारांनी विजय मिळविला आहे. पंचायत समितीच्या निवडणुकीत आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेसने चांगलीच मुसंडी मारत परिचारकांच्या नेतृत्वाखालील तालुक्यातील पंचायत समितीच्या सत्तेला मोठा सुरुंग लावल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले आहे.

### सांगोला येथे तालुका विकास आघाडीचे वर्चस्व

सांगोला तालुक्यात ७ जि.प.गट व १४ पं.स.गण यासाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीचे ४ तर सांगोला तालुका विकास आघाडीचे ३ उमेदवार जिल्हा परिषद गटात विजयी झाले. पंचायत समितीच्या १४ पैकी ९ जागांवर विजय मिळवत सांगोला तालुका विकास आघाडीने वर्चस्व मिळवले.

### मोहोळ तालुक्यावर भाजपाचा भगवा

मोहोळ तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ६ पैकी ४ जागा आणि पंचायत समितीच्या १२ पैकी ७ जागा जिंकून भाजपाने भगवा फडकवला. माजी आमदार राजन पाटील यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक होती. मागच्या वेळेत पंचायत समितीमध्ये सहा-सहा असे समसमान बलाबल होते. यावेळी त्यात फक्त एकाचा फरक पडला आहे.

### मंगळवेढ्यात भाजपाचे निर्विवाद वर्चस्व

आमदार समाधान आवताडे यांनी आपल्या राजकीय कौशल्याच्या जोरावर मंगळवेढ्यात भाजपाचे वर्चस्व सिध्द केले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत आवताडे गटाने विरोधकांचे बालेकिल्ले उद्‌ध्वस्त करत एकहाती सत्ता मिळविली. जि.प.च्या ४ गटात आणि पं.स.च्या ६ गणांवर भाजपाच्या उमेदवारांनी कमळ फुलविले.

### अक्कलकोटकरांचा भाजपा-शिवसेनेला कौल

अक्कलकोट तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक अत्यंत अटीतटीची झाली. अक्कलकोटकरांनी भाजपा-शिवसेनेला कौल दिल्याचे निकालाअंती दिसून आले. जि.प.गटातून भाजपा ४ तर शिवसेनेने २ आणि पं.स.गणातून भाजपा ८ तर शिवसेनेने ४ जागांवर विजय संपादन केला.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी ह्या चपळगाव जि.प.गटातून निवडून आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या भावी अध्यक्षा म्हणून त्यांच्या नावाची चर्चा होत आहे. चपळगाव गणात आ.सचिन कल्याणशेट्टी यांचे पुतणे सागर कल्याणशेट्टी यांनी यश संपादन केले.

### करमाळ्यात कमळासह राष्ट्रवादीची हवा

भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते गणेश चिवटे यांनी गेल्या काही वर्षापासून वीट गटात तयारी सुरु केली होती. त्यांनी पाटील गटाचे राजेंद्रसिंह राजेभोसले यांच्यावर मात करत वीट गटात कमळ फुलविले.

आ.नारायण पाटील गटाचे जिल्हा परिषद दोन, पंचायत समिती चार, माजी आमदार संजयमामा शिंदे गटाचे जिल्हा परिषद दोन, पंचायत समिती चार, गणेश चिवटे व रश्मी बागल गटाचे जिल्हा परिषद दोन, पंचायत समिती चार उमेदवार विजयी झाले आहेत.

राष्ट्रवादी जिल्हा परिषद २, पंचायत समिती ४ व भाजपा जिल्हा परिषद २, पंचायत समिती ४ व क.वि.आ जिल्हा परिषद २, पंचायत समिती ४ उमेदवार विजयी झाले आहेत.

# मोबाईल गेममुळे तरुणाचा मेंदूतील रक्तस्रावामुळे मृत्यू

**मेरठ, दि. ९ फेब्रुवारी -**

मोबाईल गेमिंगचे व्यसन किती जीवघेणे ठरू शकते याचे एक भयानक उदाहरण पाहायला मिळाले.

गाझियाबादमध्ये तीन बहिणींच्या आत्महत्येनंतर, आता मेरठच्या खैरनगर भागात पबजीच्या व्यसनाने मोहम्मद कैफ या २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. रात्री उशिरापर्यंत गे खेळत असताना, तरुणाचा रक्तदाब इतका वाढला की त्याला ब्रेन हॅरेज झाले आणि त्याचा मृत्यू झाला. मेरठमधील खैरनगर गुलर वाली गली येथील रहिवासी असलेल्या प्रॉपर्टी डीलर फारुकचा एकुलता एक मुलगा मोहम्मद कैफ (२२) त्याच्या खोलीत हेडफोन लावून मोबाईल फोनवर खेळत होता. कुटुंबातील सदस्यांच्या म्हणण्यानुसार, कैफला गेल्या चार महिन्यांपासून ऑनलाइन गेमिंगचे वेड लागले होते. मध्यरात्रीनंतर ३ वाजण्याच्या सुमारास तो गे खेळत असताना अचानक बेडवरून खाली पडला. जेव्हा कुटुंब खोलीत पोहोचले, तेव्हा कैफची प्रकृती गंभीर होती.

त्याला ताबडतोब स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले, जिथे त्याचा रक्तदाब ३०० पेक्षा जास्त असल्याचे पाहून डॉक्टरही थक्क झाले.

# जि.प. निवडणुकीत दिग्गजांच्या वारसांनी मारली बाजी

## वळसे पाटील, सावंत, गोगावले आणि जाधव कुटुंबांचे वर्चस्व कायम

**◆ मुंबई, ९ फेब्रुवारी**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. या निवडणुकीत सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रस्थापित राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांनी मिळवलेले घवघवीत यश. आपल्या कुटुंबाचा राजकीय वारसा पुढे नेत या वारसांनी विरोधकांना धूळ चारली असून, अनेक मतदारसंघांमध्ये घराणेशाहीचा प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

**पुणे जिल्हा : वळसे पाटील आणि पठारेंचा करिश्मा**

पुणे जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीत काँटे की टक्कर असताना, दिग्गज नेत्यांच्या नातेवाईकांनी आपली जागा सुरक्षित केली आहे. आंबेगाव मतदारसंघात माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या प्रतिष्ठेच्या लढतीत त्यांचे पुतणे विवेक वळसे पाटील यांनी पारगाव जरकवाडी गटातून २ हजार १३० मतांची निर्णायक आघाडी घेत विजय निश्चित केला.

**सोलापूर जिल्हा : सावंत आणि सातपुतेंचा विजय**

सोलापूर जिल्ह्यात हाय-व्होल्टेज ठरलेल्या लढतींमध्ये सावंतांच्या पुतण्याने विक्रमी बाजी मारली आहे. माढा तालुक्यातील मानेगाव गटातून माजी मंत्री तानाजी सावंत यांचे पुतणे पृथ्वीराज सावंत यांनी भाजपच्या तिकिटावर ६ हजार ८०० मतांच्या विक्रमी मताधिक्याने प्रतिस्पर्ध्याचा धुव्वा उडवला. भाजपा नेते राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनीही दहिगाव गटातून विजय मिळवत राजकीय क्षेत्रात यशस्वी एन्ट्री केली आहे.

**कोकणात भास्कर जाधव आणि गोगावलेंचा वारसा यशस्वी**

कोकणातील राजकीय बालेकिल्ल्यांमध्येही नेत्यांच्या मुलांनी आपला प्रभाव कायम ठेवला आहे. रत्नागिरीच्या गुहागरमध्ये आमदार भास्कर जाधव यांचे चिरंजीव विक्रांत जाधव यांनी असगोली गटातून पहिल्या फेरीपासूनच वर्चस्व राखत विजय संपादन केला. रायगडमध्ये आमदार भरत गोगावले यांचे चिरंजीव विकास गोगावले यांनीही आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पराभव केला. (वृत्तसंस्था)

### परभणीकरांनी वरपुडकरांची घराणेशाही नाकारली

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी मतदारांनी राजकारण्यांची थोपली जाणारी घराणेशाही नाकारली आहे. परभणी जिल्ह्यातील निवडणुकीत मतदारांनी भाजपा नेते तथा माजी मंत्री सुरेश वरपुडकर यांच्या कुटुंबातील ५ पैकी ४ उमेदवारांचा पराभव करून वरपुडकरांना जोरदार झटका दिला आहे. या निवडणुकीत वरपुडकर यांच्या केवळ एका पुतण्याचा विजय झाला आहे. त्यांनी कॉंग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती.

# चेष्टा मस्करी अन् वाद घालत एकाचा खून

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**



चेष्टा मस्करीत, मोबाईल देण्या-घेण्याच्या कारणावरून वाद घालून दोघांनी मिळून हाताने चपटा मारल्या व शिवीगाळ करून मोठा दगड उचलून एकाच्या डोक्यात घालून त्याला जीवे ठार मारल्याची घटना मध्यरातली घडली. दिनांक ९ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास राज बियर शॉपीच्या पाठीमागे समाधान नगर, अक्कलकोट रोड सोलापूर येथे श्रीकृष्ण देशमुख व मल्लिनाथ माशाळे राहणार समाधान नगर, अक्कलकोट रोड सोलापूर यांनी सायरा महबूब शेख यांचा मुलगा शेकुंबरला मेहबूब शेख याला चेष्टा मस्करीत, मोबाईल देण्या - घेण्याच्या कारणावरून वाद घालून मल्लिनाथ माशाळे याने हाताने चपटा मारल्या व श्रीकृष्ण देशमुख यांनी शेकुंबरला शिवीगाळ करून मोठा दगड उचलून शेकुंबरला च्या डोक्यात घालून त्याला जीवे ठार मारले. यामुळे कृष्ण श्रीकृष्ण देशमुख व मल्लिनाथ माशाळे यांच्या विरोधात सायरा शेख यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबतचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश इंगळे करीत आहेत.

# तिरुपती मंदिरातून राम मंदिराला पाठवले भेसळयुक्त लाडू

## उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांचा दावा

**◆ हैदराबाद, ९ फेब्रुवारी**

अयोध्येतील राम मंदिरात रामललांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली, तेव्हा तिरुमला तिरुपति देवस्थानांकडून एक लाख भेसळयुक्त लाडू पाठवले गेले, असा मोठा दावा करण्यात आला आहे.

आंध्रप्रदेशात तिरुपती लाडूंच्या भेसळीचा मुद्दा अधिकच तापला आहे. माजी मुख्यमंत्री वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांच्या कार्यकाळात राम मंदिराच्या लोकार्पणावेळी तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) येथून सुमारे १ लाख भेसळयुक्त लाडू अयोध्येत पाठवण्यात आल्याचा आरोप विद्यमान उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी केला आहे. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी म्हटले आहे की, जगन मोहन रेड्डी यांच्या सरकारने लाडूंमध्ये शुद्ध तुपाऐवजी बाथरूम साफ करणारे रसायन मिसळले होते. ही भगवान वेंकटेश्वरांच्या श्रद्धेशी तडजोड असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संपूर्ण देश राम मंदिराच्या लोकार्पणाचा आनंद सोहळा साजरा करत असताना जगन मोहन रेड्डी सरकारने तिरुमला तिरुपती देवस्थानातून अयोध्येत जवळजवळ एक लाख भेसळयुक्त लाडू पाठवले. त्यांनी याला एका पवित्र प्रसंगाला अपवित्र केले. (वृत्तसंस्था)



नवी दिल्लीतील डीटीए तमिळ शाळेला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर सुरक्षेचा उपाय म्हणून विद्यार्थ्यांना तातडीने वर्गाबाहेर काढण्यात आले

# बांगलादेशात हिंसाचार; पाच ठार

## बीएनपी-जमाती इस्लामीचे कार्यकर्ते भिडले, ६५ जखमी

◆ **ढाका, ९ फेब्रुवारी**

बांगलादेशात १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सुरू असलेल्या प्रचारादरम्यान हिंसाचार उफाळला. पटुआखली जिल्ह्यात बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपी आणि जमात-ए-इस्लामीच्या कार्यकर्त्यांत झालेल्या वादानंतर रविवारी रात्री दोन गटात हिंसक संघर्ष झाला, यात पाच नागरिक ठार, तर ६५ पेक्षा अधिक जखमी आहे. या भागात सोमवारीदेखील वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आल्याने संचारबंदी लागू करण्यात आली.

पटुआखली जिल्ह्यात बीएनपी कार्यकर्त्यांनी जमात-ए-इस्लामीवर मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप केला. पोलिसांनी हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांत हाणामारी झाली. घटनेची माहिती मिळताच बीएनपी कार्यकर्ते निषेध करण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. दरम्यान, जमात-ए-इस्लामीनेही आपल्या समर्थकांना बोलावले. दोन्ही बाजूंमध्ये हिंसक संघर्ष झाल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. हिंसाचाराचे पडसाद इतरही जिल्ह्यात पसरले असून, सोमवारी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी अनेक भागात तोडफोड आणि जाळपोळ केली. यामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. सध्या चार जिल्ह्यात तणावाची परिस्थिती असून संचारबंदी लागू करण्यात आली. हिंसाचाराच्या प्रकरणात दहा लोकांना अटक केली असून, इतरांचा शोध सुरू आहे. (वृत्तसंस्था)



### देशभरात अनेक ठिकाणी निदर्शने

निवडणुकांच्या घोषणेनंतर बांगलादेशात हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. देशभरात अनेक ठिकाणी निदर्शने सुरू आहेत. काही ठिकाणी भारतविरोधी घोषणा दिल्या जात आहेत. गेल्या सहा आठवड्यांत, बांगलादेशात निवडणुकीशी संबंधित ५० पेक्षा अधिक हिंसाचाराच्या घटना झाल्या असून, यात २५ नागरिकांचा मृत्यू तर, दीडशेहून अधिक लोक जखमी झाले.

### हिंदूंच्या सुरक्षेचे आश्वासन

हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांचे संरक्षण करण्यासाठी मानवाधिकार आयोगाच्या अंतर्गत एक विशेष स्वतंत्र तपास कक्ष स्थापन करण्याचे आश्वासन बीएनपीने दिले आहे. या कक्षाला धार्मिक द्वेष, सांप्रदायिकता, अल्पसंख्याकांचा छळ आणि सर्व प्रकारच्या ओळख-आधारित भेदभाव, हिंसाचार आणि दडपशाही प्रभावीपणे रोखण्यासाठी स्वतंत्र चौकशी करण्याचे अधिकार असतील.

### बीएनपीचे पारडे जड

निवडणुकीत बीएनपीला जोरदार आघाडी मिळण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांनी वर्तवली आहे. देशातील ३०० जागांपैकी २९२ जागांवर हा पक्ष निवडणूक लढवत आहे. वृत्तसंस्थेशी बोलताना बीएनपीचे प्रमुख तारिक रहमान म्हणाले की, त्यांच्या पक्षाला सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागा जिंकण्याचा विश्वास आहे. दुसरीकडे जमात-ए-इस्लामी, ११ पक्षांच्या युतीचा भाग म्हणून ही निवडणूक लढवत आहे.

# संसदेसह राजधानीतील शाळांना बॉम्बची धमकी

**दिल्लीला खलिस्तान बनवण्याचा इशारा**

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

राजधानी दिल्लीतील नऊ शाळांना सोमवारी सकाळी बॉम्बने उडवण्याच्या धमकीचे ई-मेल मिळाले. ई-मेलमध्ये दावा करण्यात आला होता की १३ फेब्रुवारी रोजी दुपारी १.११ वाजता संसदेत स्फोट होईल आणि दिल्लीला खलिस्तान बनवले जाईल.

ई-मेलमध्ये दहशतवादी अफजल गुरु आणि पंजाबला खलिस्तान संबोधण्याचाही उल्लेख होता. धमकी मिळाल्यानंतर शाळांमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

दिल्ली फायर सर्व्हिसनुसार, सकाळी वेगवेगळ्या भागांतील शाळांमधून आपत्कालीन कॉल आले. त्यानंतर अग्निशमन दलाचे बंब, बॉम्बशोधक पथक आणि श्वान पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले.

धमकीच्या ई-मेलमध्ये लिहिले होते, अफजल गुरुच्या स्मरणार्थ दिल्ली खलिस्तान बनेल. १:११ वाजता स्फोट होईल, १३ फेब्रुवारी रोजी १:११ वाजता संसदेत स्फोट होईल. ई-मेलचे स्थान आणि स्त्रोत शोधण्यासाठी सायबर पथके सक्रिय करण्यात आली. तसेच, राजधानीतील संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. कोणत्याही शाळेतून कोणतीही संशयास्पद वस्तू जप्त करण्यात आलेली नाही. (वृत्तसंस्था)

# एपस्टीन फाईल्सने जगभरात खळबळ

**● दहा देशांमध्ये राजीनामे, ८० जणांची चौकशी ● अमेरिकेपासून युरोपपर्यंत परिणाम**

◆ **न्यूयॉर्क, ९ फेब्रुवारी**

अमेरिकेत लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी संबंधित गुप्त कागदपत्रे समोर येताच जगभरात खळबळ उडाली आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने ३० जानेवारी रोजी सुमारे ३० लाख पानांची कागदपत्रे जारी केली आहेत. त्यानंतर १० देशांमधील १५ हून अधिक मोठ्या अधिकाऱ्यांना पद सोडावे लागले आहे. ८० हून अधिक शक्तिशाली लोकांवर चौकशी सुरू आहे.

या फाईल्समध्ये नेते, राजदूत, अब्जाधीश आणि शाही कुटुंबांची नावे समाविष्ट आहेत. ईमेल, फ्लाईट लॉग आणि संपर्क नोंदींमध्ये ७०० ते १००० प्रभावशाली लोकांचा उल्लेख आहे. अनेक प्रकरणांमध्ये अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाचे आरोपही आहेत. कागदपत्रांमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन आणि हिलरी क्लिंटन यांसारखी उच्च-प्रोफाइल नावे वेगवेगळ्या संदर्भांमध्ये समोर आली आहेत.

**सर्वाधिक हादरले युरोप**

एपस्टीनच्या खुलास्यानंतर युरोपमध्ये सर्वाधिक खळबळ उडाली आहे. सुमारे १० देशांमध्ये राजीनाम्यांचे सत्र सुरू झाले आहे. सर्वाधिक ब्रिटनमध्ये ३ अधिकाऱ्यांना पद सोडावे लागले. माजी राजदूत पीटर मँडेलसन, सल्लागार अ‍ॅडम पेरी आणि पंतप्रधान कीर स्टार्मर यांचे चीफ ऑफ स्टाफ मॉर्गन मॅक्स्वीनी यांनी राजीनामा दिला. नॉर्वेच्या राजदूत मोना जूल, अमेरिकेतील कामगार मंत्री अ‍ॅलेक्स एकोस्टा आणि एमआयटी लॅब प्रमुख जोइची इतो यांनी राजीनामा दिला. (वृत्तसंस्था)

### नायजेरियात भरधाव ट्रकचा अपघात; ३० ठार

**कानो :** नायजेरियाच्या उत्तर भागातील कानो राज्यात एका भीषण रस्ता अपघातात किमान ३० लोकांचा मृत्यू झाला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रवाशांना घेऊन जाणारा ट्रक महामार्गावर वेगाने जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. या घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत आणि त्यांना कानोमधील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात क्वानार बार्डे शहराजवळील गेझावा स्थानिक सरकारी क्षेत्रात झाला.

# नरगिस यांना सात वर्षांची शिक्षा

### देशाविरुद्ध अपप्रचार केल्याचा आरोप

◆ **तेहरान, ९ फेब्रुवारी**

इराणच्या रिव्होल्यूशनरी कोर्टाने नोबेल शांतता पुरस्कार विजेत्या आणि मानवाधिकार कार्यकर्त्या नरगिस मोहम्मदी यांना सात वर्षांपेक्षा जास्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. त्यांना राज्याविरुद्ध कट आणि प्रपोगंडा या प्रकरणांमध्ये दोषी ठरवण्यात आले आहे.

शिक्षेसोबत दोन वर्षांचा अंतर्गत हद्दपारी आणि प्रवास बंदीदेखील लादण्यात आली आहे. मोहम्मदी फेब्रुवारीपासून उपोषणावर आहेत. त्या २०२२ मध्ये महसा अमिनीच्या मृत्यूनंतर झालेल्या निदर्शनांच्या प्रमुख समर्थक राहिल्या आहेत.

यापूर्वी त्या १३ वर्षांची शिक्षा भोगत होत्या आणि आरोग्याच्या कारणांमुळे तात्पुरत्या सुटकेवर होत्या. मानवाधिकार संघटनांनी या शिक्षेचा निषेध केला आहे. हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा इराण अमेरिकेशी अणुकार्यक्रमावर चर्चा करत आहे.

नरगिस मोहम्मदी यांची २०२३ मध्ये नोबेल शांतता पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. हा पुरस्कार मिळवणाऱ्या त्या इराणमधील दुसऱ्या महिला आहेत. इराणमध्ये महिलांविरुद्ध होणारे अत्याचार आणि राजकीय कैद्यांशी होणारे गैरवर्तन याविरुद्ध लढा दिल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. त्यांनी इराणमध्ये फाशीच्या शिक्षेविरुद्धही आवाज उठवला होता. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानने मित्र देशांना विकली भंगार हत्यारे

## अजरबैजान, युक्रेन आणि सौदीला गंडा

◆ **इस्लामाबाद, ९ फेब्रुवारी**

आर्थिक डबघाईला आलेला पाकिस्तान आता शस्त्रास्त्र विक्रीच्या नावाखाली जगाची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानकडूनदारूगोळा आणि शस्त्रे खरेदी करणाऱ्या देशांची चिंता आता कमालीची वाढली आहे. एका नवीन अहवालानुसार, पाकिस्तानने अजरबैजानला पुरवलेला दारूगोळा केवळ निकृष्ट दर्जाचाच नाही, तर अनेक दशके जुना आणि गंजलेला असल्याचे उघड झाले आहे. या खुलाशामुळे जागतिक स्तरावर पाकिस्तानच्या डिफेंस एक्सपोर्टची अब्रू वेशीवर टांगली गेली आहे.

आर्मेनियासोबतच्या तणावामुळे अजरबैजान आपला मित्र देश असलेल्या पाकिस्तानकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे खरेदी करतो. मात्र, पाकिस्तानने या मैत्रीचा फायदा घेत अजरबैजानला चक्क गंजलेले गोळे धाडले आहेत. पाकिस्तानकडून आलेल्या शस्त्रास्त्रांमध्ये गंज लागणे, प्रोपेलेंट लोडमध्ये कमतरता आणि चुकीची मापे यांसारख्या गंभीर त्रुटी आढळल्या आहेत.

**रेंजमध्येही मोठी फसवणूक**

केवळ गुणवत्ताच नाही, तर तांत्रिक क्षमतेबाबतही पाकिस्तानने अजरबैजानची दिशाभूल केली आहे. पाकिस्तानने तोफेच्या गोळ्यांची जी रेंज सांगितली होती, प्रत्यक्षात युद्धाच्या मैदानात ते गोळे केवळ ४० ते ६० टक्केच अंतर कापू शकले आहेत. म्हणजेच, शत्रूवर लांबून मारा करण्याचा अजरबैजानचा डाव पाकिस्तानच्या निकृष्ट शस्त्रांमुळे सपशेल फसला आहे. (वृत्तसंस्था)

### सौदीने आता भारताला दिले प्राधान्य

पाकिस्तानच्या या ठकबाजीचा बळी केवळ अजरबैजानच ठरलेला नाही. रशियाविरुद्धच्या युद्धात युक्रेनने पाकिस्तानकडून १५५ मिमीचे गोळे खरेदी केले होते. मात्र, हे गोळे तोफेच्या नळीतच वेळेआधी फुटल्याने युक्रेनच्या महागड्या तोफांचे नुकसान झाले. एकेकाळी शस्त्रास्त्रांसाठी पाकिस्तानवर अवलंबून असलेला सौदी अरब आता सावध झाला आहे. पाकिस्तानची फसवणूक लक्षात आल्यानंतर सौदीने आता भारताकडून दारूगोळा खरेदी करण्यास सुरुवात केली आहे.



नागा समुदायाच्या व्यक्तीला मारहाण झाल्याच्या घटनेनंतर मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यातील लिटान गावात हिंसाचार उफाळून आला. समाजकंटकांनी जाळपोळ लुटालूट करीत अनेक घरांना आग लावली

# अयोध्या हल्ल्याचा कट रचणारा दहशतवादी फरिदाबाद तुरुंगात ठार

**काश्मिरी कैद्याकडून धारदार शस्त्राने हल्ला**

◆ **फरीदाबाद, ९ फेब्रुवारी**

फरीदाबादमध्ये एक मोठी घटना समोर आली आहे, जिथे जिल्हा कारागृहात बंद असलेल्या दहशतवादी आरोपी अब्दुल रहमानची हत्या करण्यात आली. अरुण चौधरी या काश्मिरी कैद्याने त्याच्या डोक्यावर धारदार वस्तूने अनेक वार केले. हल्ल्यानंतर लगेचच तुरुंग प्रशासन हादरले आणि जखमी अब्दुल रहमानला रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

मृत अब्दुल रहमान २० वर्षांचा होता आणि मूळचा उत्तरप्रदेशातील अयोध्या जिल्ह्यातील मिल्कीपूरचा रहिवासी होता. गुजरात आणि हरयाणा स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) च्या संयुक्त कारवाईत त्याला २ मार्च २०२५ रोजी फरिदाबादमधील पाली गावाजवळ अटक करण्यात आली होती. अटकेच्या वेळी त्याच्याकडून दोन हातबॉम्ब जप्त करण्यात आले होते, जे नंतर सुरक्षा यंत्रणांनी यशस्वीरित्या निकामी केले. (वृत्तसंस्था)

### दोघेही होते एकाच कोठडीत

तुरुंग प्रशासनाने सांगितले की, आरोपी अरुण चौधरी आणि अब्दुल रहमान यांना एकाच कोठडीत ठेवण्यात आले होते. दोघांमधील वाद कसा सुरू झाला याचा तपास सध्या सुरू आहे. हल्ल्यात वापरलेल्या धारदार वस्तूच्या उत्पत्तीबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. फरीदाबाद पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदन तपासणीसाठी पाठवला आहे आणि आरोपी अरुण चौधरीची कठोर चौकशी केली जात आहे.

## चित्रपट वार्ता

### मराठमोळ्या 'बालभारती'चे गाणे प्रदर्शित

**मुंबई :** शाळेमध्ये आपण प्रत्येकाने बालभारती या पुस्तकातूनच शिक्षण घेतले आहे. बालभारती हे पुस्तक महाराष्ट्र बोर्डामध्ये मराठी विषयासाठी आहे. बालभारतीच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त प्रेक्षकांच्या भेटीला बालभारती गीत आले आहे. बालभारतीला यावर्षी एकूण ६० वर्षे पूर्ण झाले आहे, त्यानिमित्त हे खास गाणे तयार करण्यात आले आहे. गेल्या अनेक पिढ्या बालभारतीच्या माध्यमातून आपले शिक्षण घेत आहेत.



प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये बालभारतीसोबत एक नाळ जोडली गेली आहे. आता त्याच बालभारतीचे एक गाणे नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले आहे. बालभारतीच्या गाण्याला लोकप्रिय गायिका वैशाली सामंतचा आवाज लाभला असून अवधूत गुप्तेने संगीत दिले आहे. तर दासू वैद्य यांनी या गाण्याला शब्द दिले आहेत. या गाण्याच्या माध्यमातून बालभारतीच्या पुस्तकासोबत प्रत्येकाच्या जोडलेल्या आठवणी आणि भावना या गाण्यातून सुंदरपणे उलगडण्यात आले आहेत.

### 'रणपती शिवराय'ची शिवजयंती योजना

**मुंबई :** आजकाल जाहिरातींचा आणि विविध योजनांचा जमाना आहे. अशीच एक आकर्षक योजना 'रणपती शिवराय स्वारी आग्रा' या चित्रपटाच्या टीमने आणली आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांचा समूह जितक्या मोठ्या संख्येने जाईल तितक्या जास्त संख्येने तिकीट दरात सवलत मिळेल. शिवजयंतीच्या निमित्ताने ही विशेष योजना आणली आहे. सध्या या चित्रपटाने थियेटरमध्ये बऱ्यापैकी गर्दी खेचण्यात यश मिळवले आहे. ६ फेब्रुवारीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात अभिजीत श्वेतचंद्रने शिवरायांची भूमिका साकारली आहे. ती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. त्याच्या जोडीला मृणाल कुलकर्णी, समीर धर्माधिकारी, अजय पूरकर, दिग्पाल लांजेकर, स्मिता शेवाळे, पुनीत इस्सर, विराजस कुलकर्णी, योगेश सोमण, अक्षय वाघमारे, ऋषी सक्सेना हे दमदार कलाकारही चित्रपटात आहेत.




### पुन्हा शाहिदसोबत झळकणार रश्मिका

**मुंबई :** शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना आगामी चित्रपट 'कॉकटेल २'मुळे चर्चेत आहेत, ज्याचे चित्रीकरण नुकतेच पूर्ण झाले. कृती सेनन देखील या चित्रपटाचा भाग आहे. ताज्या माहितीनुसार, शाहिद आणि रश्मिका आणखी एका चित्रपटासाठी एकत्र येत आहेत. शीर्षक नसलेल्या आगामी चित्रपटासाठी दोघांशी चर्चा केली असता, त्यांनी लगेच होकार दिला. शाहिद आणि रश्मिका 'बधाई हो आणि 'मैदान चे दिग्दर्शक अमित रविंद्रनाथ शर्मा यांच्या पुढील चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. या रोमँटिक चित्रपटाचे चित्रीकरण याच वर्षी ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यापासून सुरू करतील. सध्या अभिनेता शाहिद आपल्या आगामी 'ओ रोमियो' चित्रपटाच्या प्रचारात व्यस्त आहे, जो १३ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होत आहे.




### बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपीला जामीन मंजूर

◆ **मुंबई, ९ फेब्रुवारी**

माजी आमदार बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील आरोपी आकाशदीप सिंगला सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला. पंजाबचा रहिवासी आकाशदीप हा या प्रकरणात जामीन मिळालेला पहिला आरोपी आहे. न्यायालयीन सुनावणीदरम्यान आकाशदीपच्या वकिलांनी युक्तिवाद केला की एजन्सींकडे त्याच्याविरुद्ध कोणतेही ठोस पुरावे नाहीत. बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबईत गोळ्या घालून हत्या करण्यात आली.

न्यायाधीश नीला गोखले यांच्या खंडपीठाने स्पष्टपणे सांगितले की आरोपीला जामीन मंजूर केला जात आहे, परंतु त्याचा इतर आरोपींच्या जामीन अर्जांवर परिणाम होणार नाही. (वृत्तसंस्था)

# वर्षभरात ९९ टक्के नोकऱ्या गिळंकृत करणार एआय




◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. आज लोक एआय-संचालित उपकरणांच्या मदतीने सर्व प्रकारची कामे करत आहेत. तथापि, तो दिवस दूर नाही जेव्हा एआय, केवळ मदतनीस म्हणून आपल्याला मदत करण्याऐवजी, आपली जागा घेईल. तसेच एका वर्षात ९९ टक्के मानवी नोकऱ्या घेईल, असा इशारा प्रसिद्ध आर्टिफिशियल इंटेलिजेंस संशोधक डॉ. रोमन याम्पोल्स्की यांनी दिला आहे.

याम्पोल्स्की यांच्या मते, २०४५ पर्यंत समाज अशा तांत्रिक बिंदूवर पोहोचू शकतो जिथून परत येणार नाही. आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेंस, ऑटोमेशन आणि इतर मुद्यांवर विस्तृतपणे बोलताना, डॉ. रोमन याम्पोल्स्की म्हणाले की येणारे बदल मागील औद्योगिक परिवर्तनांपेक्षा पूर्णपणे वेगळे असतील. संगणक शास्त्रज्ञ डॉ. याम्पोल्स्की हे मूळचे लॅटवियाचे आहेत आणि सध्या ते लुईव्हिल विद्यापीठात प्राध्यापक आहेत. त्यांनी एआय सुरक्षा आणि जोखीम यावर १०० हून अधिक शैक्षणिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांनी अलिकडेच स्टीव्हन बार्टलेट यांनी आयोजित केलेल्या 'द डायरी ऑफ अ सीईओ' या विषयावर भाषण दिले. (वृत्तसंस्था)

### कोणतेही शारीरिक श्रम स्वयंचलित करणे शक्य

**डॉ. याम्पोल्स्की म्हणाले, पाच वर्षांत, कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम स्वयंचलित केले जाऊ शकतात. म्हणून, आपण अशा जगाकडे पाहत आहोत जिथे बेरोजगारी आपण यापूर्वी कधीही न पाहिलेल्या पातळीवर असेल. मी १० टक्के बेरोजगारीबद्दल बोलत नाही, तर ९९ टक्के बेरोजगारीबद्दल बोलत आहे.**

### हस्तकौशल्याचे उद्योग बचावणार

**मानवनिर्मित वस्तूंच्या प्रेमामुळे काही नोकऱ्या जाऊ शकतात. ज्यांना अजूनही हस्तनिर्मित वस्तू आवडतात त्यांच्यासाठी तुम्हाला एक छोटी बाजारपेठ मिळू शकते. दरम्यान, एआयचे निरीक्षण आणि नियमन करण्याशी संबंधित नोकऱ्या देखील राहतील. डॉ. याम्पोल्स्की म्हणाले की दीर्घकाळात एआयवर पूर्णपणे नियंत्रण ठेवणे अशक्य असू शकते, परंतु ते म्हणाले की मानवी देखरेखीमुळे बदलाची गती मंदावू शकते.**



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# 'प्रपोगंडा' आणि 'परसेप्शन'च्या पलीकडे

समाजाला संघटित करण्याचे काम वेळखाऊ आहे. ते झोकून देऊनच करावे लागते. हा फावल्या वेळेतील उद्योग नाही हे ज्याला कळले, त्याला संघकार्य समजले असा स्पष्ट संदेश संघकार्याशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या मनात व्रतस्थ भावनेतून रुजलेला असतो. संघकार्य आणि समाजसेवा यामधील अंतर या भावनेमुळे स्पष्ट होते. आजकाल समाजसेवा हा पूर्णवेळ व्यवसाय मानला जातो. त्यासाठी विशेष प्रशिक्षण घ्यावे लागते, पदव्या प्राप्त केल्या की समाजसेवक म्हणून 'पात्रता' प्राप्त होते, पण अशी समाजसेवा हा कदाचित उपजीविकेचा उद्योग असू शकतो. व्रतस्थ भावनेने समाजसेवा करावयाची असेल, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाच्या संघटनेच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करावयास हवा. संघ ही समाजसेवा 'शिकविणारी' संस्था नसून सेवेचा संस्कार 'घडविणारी' संघटना आहे, याची खात्री पटल्यानंतर संघकार्याचे समाजजीवनातील महत्त्व स्पष्ट होते. संघाच्या शताब्दीनिमित्त मुंबईत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या 'संघप्रवासाची १०० वर्षे- नवे क्षितिज' या संवाद व्याख्यानमालेचे मुंबईतील तिसरे दोन दिवसांचे सत्र ज्यांनी अनुभवले, त्यांना संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीची, संघविचारांची आणि संघसंस्कारांची ओळख करून घेण्यास मोठी मदत झाली असेल. आपल्याला संघ समजला असे मानणाऱ्यांनाही संघ संपूर्ण समजलेला नसतो, अशा स्थितीत, संघाविषयी प्रामाणिकपणे काही जाणून घ्यायचे असेल, तर संघकार्यात सहभागी होऊनच अनुभव घ्यावा लागेल. गेल्या शंभर वर्षांत संघाने देशात काय केले, हे जाणून घेण्याची उत्सुकता आता समाजात वाढत असताना, सरसंघचालकांच्या संवादात्मक व्याख्यानमालेतून अनेकांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे नेमकी उलगडत गेली आहेत. संघ हा राजकीय पक्ष नाही, त्यामुळेच, ही संघटना कोण्या एका राजकीय पक्षाचे काम करण्यासाठी स्थापन झालेली नाही. बऱ्याचदा संघाविषयीचा हा गैरसमज हेतुत: पसरविला जातो. संघ म्हणजे नेमके काय आहे, हे जाणून घ्यायचे असेल, तर, संघ म्हणजे नेमके काय नाही, हे समजून घेणे आवश्यक आहे. सरसंघचालकांच्या या संवाद कार्यक्रमातून संघ म्हणजे नेमके काय नाही, याचीही उत्तरे मिळून गेल्याने, संघाविषयी वाद-प्रवाद पसरवून नाहक समाजात संभ्रम माजविण्याचे राजकीय डावपेचदेखील यापुढे फारसे प्रभावी ठरणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. देशात आजवर अनेक चांगली कामे झालीत. यापुढेही ती होत राहतील. ती सर्व कामे एकट्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने केली असे नाही. चांगली कामे करणाऱ्या अनेक व्यक्ती, संस्था, संघटनांनी या देशाला सत्कार्याचे संस्कार दिले आहेत. ही चांगली कामे अखंडपणे पुढे चालत राहावी आणि व्यवस्थितपणे पूर्ण व्हावीत यासाठी अन्य कोणाशीही स्पर्धा न करता, कोणाचाही विरोध न करता, देशासाठी काम करणाऱ्या संघटनेचे नेमके रूप, कार्य आणि उद्दिष्ट शतकपूर्तीच्या निमित्ताने समाजासमोर आले आहे. सरसंघचालकांची ही व्याख्यानमाला म्हणजे केवळ संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आढावा नव्हता आणि संघकार्याची ओळख समाजाला करून देण्याचा प्रचारकी कार्यक्रमही नव्हता. भारताच्या अनेक शतकांच्या इतिहासाची, सामाजिकतेची, संस्कृतीची आणि परंपरेच्या वारशाची ओळख करून देताना, हाच वारसा सोबत घेऊन भारताच्या भविष्याच्या वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या विचारांची देवाणघेवाण होती. नवी दिल्ली, बंगळुरू, कोलकाता या महानगरांपाठोपाठ सरसंघचालकांच्या उद्बोधन मालिकेचे अखेरचे सत्र मुंबईत पार पडले आणि संघाच्या वाटचालीसोबतच, देशाच्या भविष्याविषयीची संघदृष्टीदेखील स्पष्ट झाली आहे. संघाच्या प्रेरणेतून सुरू असलेल्या एक लाख ३० हजारांहून अधिक सेवाकार्यातून संघाने ही वाटचाल नि:संदिग्धपणे आचरणातही आणली आहे, हेदेखील या संवादातून स्पष्ट झाले आहे. जे जे देशहिताचे, देशासाठी चांगले, ते काम करत राहणे हा सरसंघचालकांच्या शब्दांतील संघविचार मोजक्या शब्दांतील असला, तरी त्यातील नेमकेपणा मात्र, शंभर वर्षांच्या वाटचालीची आणि भविष्यातील निर्धाराची व्यापक ओळख करून देतो. दोन दिवसांच्या या सत्रामध्ये श्रोता या नात्याने सहभागी झालेल्यांना संघकार्याची गरज नेमकी स्पष्ट व्हावी, यासाठी सरसंघचालकांचे हे उद्बोधन महत्त्वाचे ठरले आहे.

हा देश ज्ञान, विज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर असेल, आर्थिकदृष्ट्या संपन्न असेल आणि कोणत्याही परकीय आक्रमणास समर्थपणे परतवून लावण्याच्या शक्तिसंपन्नतेने अजिंक्य ठरेल, ही संघाची धारणा आहे. असा देश घडविणे हे संघकार्य आहे, ही संघाच्या कार्यकर्त्यास मिळणारी शिकवण आहे. भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी जखडलेला एक भूभाग नाही, तर या देशाला संस्कृतीचा वारसा आहे, इथल्या जनजीवनाला विचारांची बैठक आहे आणि इथल्या जीवनशैलीचे एक वेगळेपण आहे. संस्कृती, समाजगट, उपासनापद्धती आणि भाषा, यामध्ये प्रांतशः भेद असूनही ही जीवनशैली एकात्म आहे. ही एकात्मता म्हणजे भारताचे राष्ट्रजीवन आहे आणि ते समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रतिबिंबित होईल असा समाज निर्माण करणे हे संघाचे ध्येय आहे. कारण, कोणत्याही राष्ट्राचे श्रेष्ठत्व, तेथील समाज किती सुसंस्कृत, शक्तिशाली आणि वैचारिकदृष्ट्या संपन्न आहे, यावर निर्भर होत असते. अशा समाजनिर्मितीचे काम संघाने हाती घेतले आहे. केवळ राजसत्तेच्या माध्यमातून हे काम साधता येत नाही, ही संघाची भावना असल्यामुळेच संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी राजकारणापासून अलिप्त राहून संघकार्यासाठी स्वत:स समर्पित केले होते. जागरूक, संघटित लोकशक्तीचा राजसत्तेवर अंकुश राहावा आणि नैतिकतेच्या आधारावर उभ्या असलेल्या राजसत्तेकडून नैतिक भावाने देश चालविला जावा, असे संघ मानतो. देश चालविण्याकरिता ज्या काही वेगवेगळ्या व्यवस्था आवश्यक असतात, त्यापैकी राजसत्ता ही एक आवश्यक व्यवस्था असल्यामुळे, समाजजीवनात नैतिकतेच्या बळावर चालविल्या जाणाऱ्या व्यवस्था उभ्या करण्याच्या कामाप्रमाणेच, राजसत्तेत सहभागी होऊन संघाच्या स्वयंसेवकांनी ही व्यवस्था राबवावी असे संघाने ठरविले, पण भारतीय जनता पक्ष नावाचा राजकीय पक्ष म्हणजे संघ नव्हे आणि तो पक्षदेखील संघाचा नव्हे. या पक्षामध्ये संघाचे अनेक स्वयंसेवक आहेत आणि संघसंस्कार ही त्यांच्या राजकारणाची दिशा आहे. संघ आणि भाजप यांच्या नात्याचे हे नि:संदग्ध नेमकेपण सरसंघचालकांनी स्पष्ट केल्याने, संघाविषयी संभ्रम पसरविणाऱ्या राजकारणाची धार बोथट होणार यात शंका नाही. संघ आणि भाजप यांच्यातील नात्याबाबतची ही संघाची भूमिका नवी नाही. स्वयंसेवकांनी नैतिकतेच्या बळावर राजसत्तेत सहभागी होऊन देश चालवावा ही संघाची भूमिकादेखील नवी नाही. तरीही, आजदेखील संघ म्हणजे काय नाही, हे माहीत नसलेल्यांकडूनही संघाविषयी संभ्रम माजविला जात असताना, ही भूमिका नव्याने अधोरेखित होणे गरजेचे होते. सरसंघचालकांच्या या उद्बोधनातून ती मांडली गेली आहे. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्वबोध व स्वदेशी आणि नियम-कायद्याचे पालन ही समाजपरिवर्तनाची सहजसाध्य साधने आहेत, हा विचार समाजसेवेच्या पुस्तकी शिक्षणातून शिकविला जाणार नाही. सज्जनशक्तीला बळ देण्यासाठी आवश्यक असलेले हे संस्कार म्हणजेच 'पंचपरिवर्तन' आहे आणि केवळ भाषणे देऊन असे परिवर्तन होणार नाही. त्यासाठी घराघरांत जावे लागेल, आपल्या घरापासून सुरुवात करावी लागेल आणि त्यासाठी अधिकचा वेळ न देता, आपल्या जीवनशैलीचा भाग म्हणून त्याकडे पाहावे लागेल. भाषा, भूषा, भजन, भोजन, भ्रमण आणि भवन हे आपले स्वत:चे असले पाहिजे, हा आपल्या जीवनशैलीचा, आपल्या घरापासून सुरू झालेला संस्कार अमलात आणला की स्वबोध होऊन परिवर्तनाची सुरुवात होते. संघ काय करतो, याचे नेमके उत्तर देणाऱ्या या उद्बोधनातून समाजपरिवर्तनाचा सोपा मार्ग सहजपणे उलगडला आहे. जे काही करावे ते प्रामाणिकपणे, उत्कृष्टपणे आणि नि:स्वार्थबुद्धीने देशहितासाठी करावे आणि त्या कृतीचा प्रारंभ स्वत:पासून करावा हा संघसंस्कार घेऊन परतलेल्या श्रोत्यांना या उद्बोधनातून मिळालेली नवी दृष्टी परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरेल, यात शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

# बलुचिस्तानमधील धुमसती आग

प्रा. जयसिंग यादव

बलुचिस्तानात नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर ४० तास चाललेल्या प्रत्युत्तर कारवाईत पाकिस्तानी सुरक्षा दलांनी दोनशे जणांना ठार मारले आहे. यामध्ये ३१ नागरिक, १७ सुरक्षा कर्मचारी आणि 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए)'च्या १४५ लढवय्यांचा समावेश आहे. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी राजधानी क्वेटा येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, दहशतवादाविरुद्धच्या युद्धात हा पाकिस्तानचा आतापर्यंतचा सर्वाधिक बळींचा आकडा आहे. बलुची लोक 'बीएलए' लढाऊंना रसद पुरवत आहेत. व्हायरल व्हिडीओने पाकिस्तान सरकारचे दावे उघड केले. यापूर्वी क्वेटा, ग्वादर, मुस्टुंग आणि नोशकी अशा अनेक जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी बलूच हल्ले झाले होते. 'बलूच लिबरेशन आर्मी' (बीएलए) ने हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे सैन्य, पोलिस आणि दहशतवादविरोधी युनिट्सनी मोठ्या प्रमाणात ऑपरेशन सुरू केले. या हल्ल्यानंतर लगेच पाकिस्तानी सैन्याने कोणताही पुरावा न देता हे हल्ले भारत पुरस्कृत आहेत, असा आरोप केला होता. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी या दाव्याचा पुनरुच्चार केला आणि म्हटले की, हल्लेखोरांचे भारताशी संबंध आहेत. भारताने पाकिस्तानचे निराधार आरोप फेटाळून लावले आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, हे दावे केवळ पाकिस्तानच्या अंतर्गत अपयशांवरून लक्ष विचलित करण्यासाठी करण्यात आले असून पाकिस्तानची ही जुनी युक्ती आहे. प्रत्येक हिंसक घटनेनंतर निराधार आरोप करण्याऐवजी, पाकिस्तानने या प्रदेशातील आपल्या लोकांच्या दीर्घकालीन मागण्यांकडे लक्ष केंद्रित करावे. पाकिस्तानची दडपशाही, क्रूरता आणि मानवी हक्कांचे उल्लंघन करण्याची परंपरा सर्वज्ञात आहे. 'बीएलए'ने म्हटले आहे की, त्यांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून 'ऑपरेशन हेरोफ'चा दुसरा टप्पा सुरू केला आहे. लष्कराने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ४१ बंडखोरांना ठार मारल्याचा दावा केल्यानंतर एका दिवसात ही घोषणा करण्यात आली. त्यांच्या सैनिकांनी नोश्की येथील 'काऊंटर टेररिझम डिपार्टमेंट' (सीटीडी) मुख्यालय ताब्यात घेतले आणि 'फ्रंटियर कॉर्प्स युनिट' उद्ध्वस्त केले. त्यात अनेक पाकिस्तानी सैनिकांचा मृत्यू झाला.

१९४७ मध्ये मोहम्मद अली जिना यांनी मीर अहमद खान यांच्यासह बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्यासाठी प्रयत्नांचे नेतृत्व केले. १२ ऑगस्ट १९४७ रोजी बलुचिस्तानला स्वतंत्र म्हणून घोषित केले; परंतु सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. मार्च १९४८ मध्ये पाकिस्तानने बलुचिस्तानला आपल्यात विलीन केले. त्यामुळे तेथील लोक संतप्त झाले. जिनांनी आपले जीवन भारताचे दोन भागांत विभाजन करण्यासाठी समर्पित केले. एकेकाळी महात्मा गांधी यांचे अनुयायी असलेले जिना १९०६ ते १९२० पर्यंत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. १९२० मध्ये काँग्रेसच्या नागपूर



अधिवेशनानंतर ते काँग्रेसपासून वेगळे झाले आणि मुस्लिम लीगशी त्यांनी पूर्णपणे जुळवून घेतले. येथेच जिना भारताचे दोन भागांत विभाजन करण्याच्या वेडेपणात अडकले. बलुचिस्तानदेखील याचा बळी पडला. दुसऱ्या महायुद्धानंतर, ब्रिटिश आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले. ते आता भारतावर राज्य करू शकत नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले. संपूर्ण भारतात स्वातंत्र्यासाठी बंड सुरू झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी भारत सोडण्याचा निर्णय घेतला. जिना मुस्लिमांसाठी वेगळ्या देशाच्या मागणीवर ठाम होते. त्याच वेळी, कलातमध्ये, नंतर बलुचिस्तानमध्येही वेगळ्या देशाच्या स्वातंत्र्याची मागणी तीव्र झाली. १९४६ मध्ये ब्रिटिशांनी भारत सोडत असल्याचा निर्णय घेतला तेव्हा कलातचे खान मीर अहमद खान यांनी जिना यांना ब्रिटिशांसमोर आपला खटला सादर करण्यासाठी सरकारी वकील म्हणून नियुक्त केले. त्यांना विश्वास होता की, मुस्लिम मातृभूमीची मागणी करणारे जिना ब्रिटिशांसमोर त्यांची मागणी चांगल्या प्रकारे मांडू शकतील. ४ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीमध्ये बलुचिस्तान नावाचा एक नवीन देश स्थापन करण्यासाठी एक बैठक बोलावण्यात आली. मीर अहमद खानसह जिना आणि जवाहरलाल नेहरूदेखील या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत जिना यांनी कलातच्या स्वातंत्र्याची बाजू मांडली. ब्रिटिश व्हाईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनीही कलातला भारत किंवा पाकिस्तानचा भाग बनण्याची आवश्यकता नाही, हे मान्य केले. स्वतंत्र बलुचिस्तान तयार करण्यासाठी कलात, खारान, लास बेला आणि मकरन हे चार जिल्हे विलीन करण्याचा सल्ला जिना यांनी दिला होता. ११ ऑगस्ट १९४७ रोजी कलात आणि मुस्लिम लीग यांच्यात बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून स्थापित करण्याचा करार झाला. तथापि, एक अडचण अशी होती की, बलुचिस्तानची सुरक्षा पाकिस्तानकडे सोपवण्यात आली. शेवटी, १२ ऑगस्ट रोजी कलातच्या खानने बलुचिस्तानला स्वतंत्र देश घोषित केले.

'बलूच नॅशनॅलिझम' या आपल्या पुस्तकात खान मोहम्मद जिना आणि खान यांच्यातील भेटीचे वर्णन करतात. बैठकीत जिना यांनी खान यांना बलुचिस्तान पाकिस्तानात विलीन करण्याचा आग्रह केला. कलातच्या शासकाने नकार दिला. त्यांनी सांगितले की, बलुचिस्तान हा अनेक जमातींमध्ये विभागलेला देश आहे आणि तो एकटाच निर्णय घेऊ शकत नाही. बलुचिस्तान स्वतंत्र देश राहावा की पाकिस्तानात सामील व्हावा हे तेथील लोकांचे निर्णय असेल. वचन दिल्याप्रमाणे, खान बलुचिस्तानला गेले आणि त्यांनी विधानसभेची बैठक बोलावली. त्यात पाकिस्तानात विलीन होण्यास विरोध होता. पाकिस्तानकडून दबाव वाढू लागला. परिस्थिती समजून घेत खान यांनी 'कमांडर-इन-चीफ' ब्रिगेडियर जनरल परवेझ यांना सैन्याची जमवाजमव करण्याचे आणि शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा व्यवस्था करण्याचे आदेश दिले. जनरल परवेझ डिसेंबर १९४७ मध्ये शस्त्रे मिळविण्यासाठी लंडनला आले. ब्रिटिश सरकारने सांगितले की, पाकिस्तानच्या परवानगीशिवाय त्यांना कोणतीही लष्करी मदत मिळणार नाही. १८ मार्च १९४८ रोजी जिना यांनी खारान, लास बेला आणि मकरन वेगळे करण्याची घोषणा केली. दुष्का एच. सय्यद यांनी त्यांच्या 'द ॲक्सेक्शन ऑफ कलात : मिथ ॲण्ड रिॲलिटी' या पुस्तकात लिहिले आहे की, जिना यांच्या निर्णयाने कलातला सर्व बाजूंनी वेढले होते. जिना यांनी अनेक बलूच सरदारांना त्यांच्या बाजूने एकत्र केले. त्यामुळे खान यांना कोणताही मार्ग उरला नाही. त्यानंतर खान यांनी भारतीय अधिकाऱ्यांना आणि अफगाण शासकांना मदतीसाठी आवाहन केले; परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. २७ मार्च १९४८ रोजी 'ऑल इंडिया रेडिओ'ने परराष्ट्र विभागाचे सचिव व्ही. पी. मेनन यांनी उद्धृत केले, की कलातच्या खानने विलयासाठी भारताशी संपर्क साधला होता; परंतु भारत सरकारने ही विनंती नाकारली. तथापि, तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल आणि तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी नंतर हे विधान नाकारले. २६ मार्च रोजी पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानात प्रवेश केला. खान यांच्याकडे जिना यांच्या अटी मान्य करण्याशिवाय पर्याय नव्हता; परंतु या ताब्यामुळे बलुचिस्तानच्या लोकसंख्येच्या मोठ्या वर्गात पाकिस्तानबद्दल द्वेष निर्माण झाला. बलुचिस्तान केवळ २२७ दिवस स्वतंत्र राहिला. खान यांचे भाऊ प्रिन्स करीम खान यांनी नंतर बलूच राष्ट्रवादींचा एक गट संघटित केला. त्यांनी १९४८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध पहिले बंड सुरू केले. पाकिस्तानने १९४८ चे बंड चिरडले. करीम खानसह अनेक लोकांना अटक करण्यात आली. बंड दडपले गेले असेल; पण ते कधीच संपले नाही. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी सुरू झालेल्या या बंडाला नवीन नेते मिळत राहिले. त्यांनी १९५०, १९६० आणि १९७० च्या दशकात पाकिस्तानी सरकारला आव्हान देणे सुरू ठेवले. २००० पर्यंत, पाकिस्तानविरुद्ध बलुचिस्तानची चार बंड झालीत. २००५ मध्ये, बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) ची स्थापना झाली आणि आजपर्यंत बलुचिस्तानचे लोक त्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# सुंदर स्वच्छ गाव, शहर आणि शाळा

गेल्या दशकात अनेक मूलभूत बदल घडताना दिसत आहेत. पायाभूत सुविधा, शिक्षण, तंत्रज्ञान, प्रशासन आणि सामाजिक जाणीव या सगळ्या पातळ्यांवर नव्या धोरणांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. २०१६ मध्ये सुरू झालेल्या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटीज मिशनअंतर्गत १० वर्षांत देशातील ३१ शहरे पूर्णपणे 'स्मार्ट' झाली असून महाराष्ट्रातील पुणे आणि सोलापूर या दोन शहरांचा या यशस्वी यादीत समावेश आहे. स्मार्ट सिटी संकल्पनेपासून ते 'मिशन निर्लेखन'सारख्या शिक्षणप्रधान मोहिमांपर्यंत तसेच ग्रामपंचायतींच्या आदर्श ठरावांपासून ते मोबाईल-टीव्हीपासून मुक्त सायंकाळ घडविण्याच्या निर्णयांपर्यंत हा सगळा प्रवास केवळ योजनांचा नसून मानसिकतेतील बदलाचाही आहे. बुलढाणा जिल्हा या बदलांचा साक्षीदार ठरत आहे. पुणे व सोलापूरसारख्या महाराष्ट्रातील शहरांचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश होणे ही बाब राज्यासाठी महत्त्वाची मानावी लागेल. सुरुवातीला केवळ महानगरांपुरती मर्यादित असलेली स्मार्ट सिटी संकल्पना आता मध्यम आणि लहान शहरांपर्यंत विस्तारताना दिसते.

स्मार्ट सिटी म्हणजे केवळ डिजिटल फलक, सीसीटीव्ही कॅमेरे किंवा ॲप्स नव्हेत तर नागरिकांना मूलभूत सुविधा, सुरक्षितता, पारदर्शक प्रशासन आणि पर्यावरणपूरक विकास यांचा समन्वय साधणारी जीवनपद्धती आहे. या पृष्ठभूमीवर स्मार्ट राज्य ही संकल्पना केवळ शहरांपुरती मर्यादित न राहता ग्रामीण व निमशहरी भागांपर्यंत पोहोचली तर त्याचा थेट लाभ बुलढाण्यासारख्या जिल्ह्यांनाही होऊ शकतो. जिल्ह्यात मोठे आयटी पार्क किंवा मेट्रो नसतील पण इथे जर शिक्षण व्यवस्था सक्षम झाली, ग्रामपंचायतींचा कारभार पारदर्शक झाला आणि समाजात संवाद वाढला तर हा जिल्हा स्वतःच्या पातळीवर स्मार्ट ठरू शकतो. स्मार्टनेस म्हणजे काचांच्या इमारती नव्हेत तर माणसाच्या विचारातील बदल आहे, ही जाणीव बुलढाण्यात हळूहळू रुजताना दिसते. बुलढाणा जिल्ह्यातील तब्बल १ हजार ४०० शाळांमध्ये मिशन निर्लेखन मोहीम राबवली जात आहे ही बाब आशादायक आहे. प्राथमिक शिक्षणात वाचन-लेखन-गणित या मूलभूत कौशल्यांवर भर देण्याचा हा प्रयत्न आहे. देशभरात साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी गुणवत्तेचा प्रश्न आजही ऐरणीवर आहे. अनेकदा विद्यार्थी शाळेत जातात परंतु वाचन किंवा साधे गणित नीट जमत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मिशन निर्लेखनमुळे शिक्षक प्रशिक्षण विद्यार्थ्यांचे स्तरनिहाय मूल्यमापन आणि पालकांचा सहभाग वाढवण्याचा प्रयत्न होत आहे. ग्रामीण भागात ही मोहीम केवळ शैक्षणिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरू शकते. ग्रामीण विकास विभागाच्या निर्देशांनुसार जिल्ह्यातील १,४०० शाळांमधून जीर्ण आणि असुरक्षित संरचना काढून टाकण्यासाठी एक व्यापक मिशन निर्लेखन मोहीम सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन जुन्या वर्गखोल्या, इमारती, शौचालये आणि पाण्याच्या टाक्या ३१ मार्च २०२६ पर्यंत काढून टाकण्याचे उद्दिष्ट आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था शालेय व्यवस्थापन समित्या आणि पालकांची भूमिका महत्त्वाची ठरते. सामाजिक शिस्तीचा प्रयोग करण्यासाठी सायंकाळी ठरावीक वेळेला मोबाईल व टीव्ही बंद ठेवण्याचा तसेच त्यासाठी दररोज सायरन वाजवण्याचा ठराव हा निर्णय अनेकांच्या भुवया उंचावणारा असला तरी विचार करायला भाग पाडणारा आहे. दररोज सायंकाळी ७ ते ८.३० या दीड तासाच्या कालावधीत कुटुंब वेळ पाळण्याचा ठराव राहुरी (जिल्हा अहमदनगर) नगरपरिषदेने एकमतांने मंजूर केला आहे. आजच्या डिजिटल युगात स्क्रीनवर घालवला जाणारा वेळ प्रचंड वाढला आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळेच याच्या आहारी जात आहेत. या पृष्ठभूमीवर काही काळ का होईना कुटुंबाने एकत्र बसावे, संवाद साधावा, मुलांनी अभ्यास करावा किंवा मैदानी खेळ खेळावेत हा उद्देश नाकारता येणार नाही. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात असलेल्या टाकरखेड ग्रामपंचायतीने विधवांच्या उन्नतीसाठी पाऊल टाकले. विधवा प्रथामुक्त गाव ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मानस फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी. एस. लहाने यांनी केले. ग्रामपंचायत सरपंच लता डहाके व ग्रामसेविका एस. पी. माने यांनी पुढाकार घेत महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या तालुक्यातील वळती ग्रामपंचायतीने घेतलेला 'आदर्श संवाद ठराव' हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासातील उल्लेखनीय म्हणावा लागेल. ग्रामसभांमध्ये केवळ ठराव मंजूर करण्यापुरते मर्यादित न राहता ग्रामस्थांमध्ये संवाद चर्चा आणि मतभेद मोकळेपणाने मांडण्याची परंपरा रुजवण्याचा हा प्रयत्न आहे. लोकशाही केवळ मतदानापुरती नसून सततच्या संवादातून ती समृद्ध होते.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# अर्थसंकल्पातून रोजगार संधी...!

दत्तात्रेय आंबुलकर

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात नमूद केलेल्या महत्त्वपूर्ण तरतुदींमध्ये उद्योग-व्यवसायाच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्ससह सेमीकंडक्टर क्षेत्राला चालना देणे, निवड उद्योग क्षेत्राला उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहनपर राशी देणे, एमएसएमई क्षेत्राच्या वाढीसाठी दहा हजार कोटी रुपयांची केलेली विशेष तरतूद इ.चा प्रामुख्याने समावेश करता येईल. याशिवाय, क्षेत्रनिहाय आरोग्य क्षेत्र व उपचार - औषध निर्माणाद्वारे आरोग्यसेवा क्षेत्राला मोठे पाठबळ देण्यात आले असून, अर्थसंकल्पीय तरतुदींनुसार, नव्या व्यवसाय संधींसह रोजगारवाढीला निश्चितपणे चालना मिळणार आहे. याशिवाय, विविध व्यवसायांशी निगडित अशा मूलभूत सुविधा व बांधकाम, रस्तेबांधणी, वाहतूकसेवा, उत्पादन-विक्री याद्वारे नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यासंदर्भात 'क्वेस कॉर्प'चे मुख्य कार्यकारी अधिकारी लोहित भाटिया यांच्या मते, नव्या अर्थसंकल्पामध्ये एकूणच मूलभूत बांधकाम व सुविधा क्षेत्रात व्यापक व्यवसायवाढ करून, त्यासाठी आवश्यक अशा कौशल्य विकासाद्वारे विविध क्षेत्रांमध्ये रोजगारांची वाढ निश्चितपणे होणार आहे. त्यांच्या मते, नव्या व महत्त्वपूर्ण तरतुदींमध्ये संगणक-सेवा क्षेत्रांतर्गत डेटा सेंटर्स, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नवे व्यवसाय, आरोग्यसेवांसह वृद्धांवरील उपचार, हायस्पीड कॉरिडॉर्स यासारखे मोठे व महत्त्वाकांक्षी प्रकल्प, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासह विदेशातील पर्यटन यासारख्या उद्योगांना मोठा वाव मिळणार आहे. यातूनच आपली व्यावसायिक अर्थव्यवस्था नजीकच्या भविष्यात कौशल्यांवर आधारित रोजगार देण्यासाठी अधिक सक्षम होण्याचा दावा लोहित भाटिया यांनी केला आहे. जागतिक स्तरांवर पाकिस्तानसह विविध देशांशी झालेल्या अथवा अद्याप सुरू असणाऱ्या युद्धांच्या पृष्ठभूमीवर आपल्या अर्थव्यवस्थेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात सावधपूर्ण भूमिका घेत यशस्वीपणे मात केली, असे मत 'रॅनस्टॅड इंडिया'चे मुख्य आर्थिक सल्लागार नागेश बेस्कूर यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, नव्या अर्थसंकल्पातील नव्या आर्थिक तरतुदींचा फायदा बायोफार्मा, सेमीकंडक्टर्स, वस्त्रोद्योग व त्याची निर्यात, प्रगत जाहिरात क्षेत्र, याशिवाय नव्या क्षेत्रातील संशोधन क्षेत्राला होणार आहे.



नागेश बेस्कूर यांच्या मते, सरकारने नव्याने घोषित केलेल्या 'बायोफार्मा शक्ती' यांसारख्या प्रगत उद्योगांना पूरक अशा धोरणांमुळे मोठा लाभ मिळणार आहे. हीच बाब 'सेमीकंडक्टर - मिशन २' यासारख्या उद्योगांना प्रामुख्याने लागू असून, केंद्रीय स्तरावर नजीकच्या काळात आरोग्यसेवा क्षेत्राचा विस्तार, टेक्सटाईल पार्क, प्रगत तंत्रज्ञान विकास केंद्र इत्यादींना लागू असून, त्यांच्यानुसार ही सारी नवी व नव्याने विकास होणारी व्यवसाय क्षेत्रे नव्या कौशल्य विकासाच्या माध्यमातून वाढत्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणारी ठरणार आहेत. अर्थसंकल्पात स्पष्टपणे नमूद केल्यानुसार, उत्पादन क्षेत्राला नव्याने दिलेले पाठबळ, प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञानावर देण्यात आलेला भर, कौशल्य विकासवाढीच्या माध्यमातून उद्योगपूरक वातावरणाची निर्मिती इ.मुळे रोजगाराच्या नव्या संधींची भर पडणार आहे. या नव्या धोरणात्मक निर्णयांच्या परिणामी, उद्योगांसाठी गुंतवणुकीची भर व त्यातून रोजगारनिर्मिती या उभयतांना चालना मिळेल. या संदर्भात अधिक तपशिलात गेल्यास असे स्पष्ट होते की, अर्थसंकल्पीय तरतुदींचा थेट परिणाम ज्येष्ठांसाठी आरोग्यसेवा क्षेत्र, विविध प्रकारचे अद्ययावत मनोरंजन व्यवसाय व त्याशिवाय उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने वाढत्या प्रमाणावर आवश्यक ठरलेले डिझाईन क्षेत्रामध्ये मोठ्या संख्येने व विविध स्तरांवर रोजगार उपलब्ध होऊ शकतात. हे निवडक व्यवसाय इतर उद्योग-व्यवसायांच्या तुलनेत माफक आर्थिक गुंतवणुकीतून सुरू करता येतात. त्यामुळे नवागतांसह स्टार्टअप उद्योगांना आता मिळणाऱ्या प्रोत्साहनातून विविध स्तरांवर रोजगार निश्चितपणे उपलब्ध होऊ शकतात.

'केपीएमजी'चे ज्येष्ठ विषयतज्ज्ञ नारायणन रामस्वामी यांनी स्पष्ट केल्यानुसार, नव्या व प्रगत तंत्रज्ञान आणि संगणकीय पद्धतींवर आधारित व्यवसायवाढीला आता चालना मिळणार आहे. त्यांच्या मते, या वयोगटात अव्वल क्षमतेसह नावीन्य व सुधारणांवर आधारित बौद्धिक क्षमता मोठी असते. त्याच वेळी त्यांच्या नव्या, छोटेखानी; पण महत्त्वाच्या अशा स्टार्टअप स्वरूपातील लघु; पण महत्त्वाच्या व्यवसायांची सुरुवात करण्यासाठी कमी आर्थिक गुंतवणुकीसह सुरुवात करता येते. त्यामुळे लवकरच अशा नावीन्यपूर्ण स्टार्टअप उद्योगांची संख्या वाढून रोजगारनिर्मिती नक्कीच होणार आहे.

नारायणन रामस्वामी यांच्यानुसार, या नव्या व बदलत्या औद्योगिक-व्यावसायिक बदलांमुळे भारत आणि भारतीयांच्या कौशल्यांद्वारे मिळणाऱ्या नव्या व मोठ्या रोजगार संधींचा लाभ भारतासह इतर विकसित आणि विकसनशील देशांना पण निश्चितपणे होणार आहे. याच्याच परिणामी, आता भारतीयांच्या कौशल्य-कामगिरीला जागतिक पातळीवर मान्यता मिळू लागली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या मुद्द्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योग-व्यवस्थापनासाठी उच्च व्यवस्थापकीय पदांवर भारतीय व्यवस्थापक-विषयतज्ज्ञांची निवड करणाऱ्या प्रमुख कंपन्यांनी पण या मुद्द्याला दुजोरा दिला आहे. 'टीमलीज'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीती शर्मा यांच्यानुसार, प्रगत भारतातील विकसित कौशल्य-कामगिरीमुळेच भारताच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळाली, याची नेमकी दखल जागतिक पातळीवरील उद्योग-व्यवसायासह वित्तीय संस्थांनी घेतली असून, त्याचे पडसाद यापूर्वीच दिसायला लागले असून, त्याचे दूरगामी व सकारात्मक परिणाम निश्चितपणे दिसणार आहेत. दरम्यान, यावेळच्या अर्थसंकल्पात 'एमएसएमई' क्षेत्रासाठी दहा हजार कोटी रुपयांच्या विशेष तरतुदींसह मोठे आर्थिक पाठबळ दिले आहे. लघुउद्योगांमध्ये रोजगारनिर्मिती क्षमता असते, हे एक अनुभवसिद्ध सत्य आहे. त्यातही नव्या व बदलत्या व्यावसायिक स्थितीनुसार भारतीय लघुउद्योग क्षेत्राने, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राने जी मोठी मजल गाठली, त्याचा उपयोग आता नव्या अर्थसंकल्पामुळे रोजगारवाढीसाठी होऊ घातला आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### प्रेम की भ्रम? व्हॅलेंटाईन संस्कृतीमागील वास्तव

आज खरे प्रेम हे एका विशिष्ट दिवसापुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्यभर जपले जाणारे मूल्य असायला हवे. प्रेम म्हणजे केवळ आकर्षण, जवळीक किंवा शारीरिक ओढ नसून त्यामागे जबाबदारी, आदर आणि निष्ठा असणे आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीत प्रेमाला संयम, त्याग आणि कर्तव्याची जोड दिली गेली आहे. मात्र आजच्या घडीला या सगळ्या मूल्यांकडे दुर्लक्ष करून क्षणिक भावना आणि भावनात्मक आवेगालाच प्रेम समजले जात आहे, ही चिंतेची बाब आहे. युवक-युवतींनी समाजमाध्यमांवर दिसणाऱ्या चमकदार चित्रांमागील वास्तव ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक नातं सोशल मीडियावर दाखवण्यासारखं किंवा प्रदर्शनासाठी नसतं. खरे नाते हे गुप्त, सुरक्षित आणि दोघांच्या सन्मानावर आधारलेले असते. त्यामुळे भावनांच्या भरात कोणताही निर्णय न घेता, विचारपूर्वक आणि सजगपणे वागणे हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे. हल्लीच्या तरुण वर्गासाठी फेब्रुवारी महिना विशेष महत्त्वाचा मानला जातो. हा महिना 'प्रेमाचा महिना' म्हणून ओळखला जातो. विशेष म्हणजे पाश्चात्त्य देशांनाही आश्चर्य वाटेल असा 'प्रेमाचा सप्ताह' भारतात ७ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारीदरम्यान मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. रोझ डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग डे, किस डे आणि शेवटी व्हॅलेंटाईन डे असा हा संपूर्ण आठवडा साजरा केला जातो. प्रत्यक्षात, एवढ्या प्रमाणात हे दिवस विदेशातही साजरे केले जात नाहीत. यावरून भारतीय तरुणाईवर पाश्चात्त्य संस्कृतीचा किती खोलवर प्रभाव पडलेला आहे, हे स्पष्ट होते. मात्र प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे साजरे केलेले प्रेम खरोखर टिकते का? प्रेम म्हणजे जिथे आपुलकी, विश्वास आणि समजूतदारपणा असायला हवा, तिथे आज बाजारूपणाची अंध स्पर्धा सुरू आहे. प्रेम व्यक्त करण्यासाठी चॉकलेट, महागड्या भेटवस्तू आणि आकर्षक शुभेच्छापत्रांनाच अधिक महत्त्व दिले जात आहे. आजच्या तरुण पिढीला आपले ऐतिहासिक दिवस आठवण करून द्यावे लागतात, पण हे विदेशी 'डे' मात्र मोठ्या उत्साहाने आणि न चुकता साजरे केले जातात, ही खेदाची बाब आहे. १४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डेच्या पृष्ठभूमीवर प्रेमाच्या नावाखाली अनेक आक्षेपार्ह आणि बीभत्स प्रकार घडताना दिसत आहेत. 'लव्ह जिहाद'सारख्या गंभीर आणि संवेदनशील घटना समाजात घडत असताना देखील या दिवसाचे अंधानुकरण थांबताना दिसत नाही. त्यामुळे व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा दिवस नसून अनेक अर्थांनी 'काळा दिवस' ठरत असल्याचे म्हणणे गैर ठरणार नाही. या दिवसांच्या निमित्ताने विदेशी कंपन्या मोठ्या प्रमाणावर आपला व्यवसाय वाढवत आहेत आणि भारतीय जनता मात्र भावनिक पातळीवर फसवली जात आहे. या फसवणुकीला बळी केवळ तरुणीच नाहीत, तर तरुणांनाही यामध्ये सावध राहण्याची गरज आहे. कारण या डेच्या आडून आमिष दाखवून लव्ह जिहाद, धर्मांतरण तसेच विविध प्रकारच्या फसवणुकीचे प्रकार वाढताना दिसत आहेत. म्हणूनच आता वेळ आली आहे की तरुणांनी स्वत: जागरूक राहून आपल्या मित्रमंडळींनाही जागरूक करावे. समाजात पसरत चाललेल्या या अपप्रवृत्तींना रोखण्यासाठी सजगता आवश्यक आहे.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

## वाचक पत्रे

### महाशिवरात्रीला शिवभक्ती करूया

माघ वद्य चतुर्दशी हा भगवान शिव देवतेचा ध्यानातून समाधीकडे जाण्याचा काळ असतो. या काळात शिव तत्त्व वातावरणातील हलाहल म्हणजे रज-तम स्वीकारत नाही. साहजिकच रज-तमाचे वातावरणातील प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढते आणि त्याचा त्रास मानवाला होऊ नये, यासाठी हिंदू धर्मात महाशिवरात्री हे व्रत सांगितले आहे. व्रतस्थ राहणे, पवित्र जलाने स्नान करणे, संकल्प सोडून उपवास व जागरण करणे आणि शिवपूजन करणे ही या व्रताची प्रमुख अंगे आहेत. या दिवशी शिवोपासना अधिकाधिक करावी ज्यामुळे आपल्याकडून शिवतत्त्व अधिक प्रमाणात ग्रहण होईल व रज-तमयुक्त वातावरणापासून आपले रक्षण होईल. शिवतत्त्व आकर्षित करणारी रांगोळी काढणे, ॐ नमः शिवाय हा नामजप सतत करणे, शिव मंदिरात जाऊन नंदी दर्शन, शृंगदर्शन, शिवपूजन करणे, शिवाला थंड जल, दूध किंवा पंचामृताने स्नान व अभिषेक करणे, पांढऱ्या अक्षता, पांढरी फुले, बिल्वदल, भस्म यासह शिवाचे पूजन करणे, केवडा किंवा चमेलीचे अत्तर अर्पण करून उदबत्तीने ओवाळणे, शिवपिंडीला सोमसूत्री प्रदक्षिणा घालणे या कृतींमुळे शिवतत्त्व अधिक आकर्षित होते. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि व्रत हा विज्ञानावर आधारित आणि ईश्वरप्राप्तीच्या दिशेने पुढे नेणारा आहे. पण तो साजरा करताना आपण अंतर्मुख असणे अपेक्षित आहे. उंची, रंगीबेरंगी वस्त्रे, चित्रविचित्र केशभूषा, प्रेक्षणीय दिसण्यासाठीच्या हालचाली व चेहऱ्यावरील रंगरंगोटी यामुळे स्वत:सह इतरांचीही वृत्ती बहिर्मुख होते. यापेक्षा शबरी, भक्त प्रल्हाद, धृव बाळ यांचे चेहरे आठवून आपण त्यांच्यासारखी भक्ती एक दिवस तरी करूया.

**छाया मिराशी**/पुणे

## महत्वाचे...

### मोफत बॉक्सिंग शिबिर गुरुवारपासून

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त सोलापूर शहर व जिल्ह्यातील खेळाडूंसाठी मोफत बॉक्सिंग शिबीर आयोजित केले आहे. हे शिबिर छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये गुरुवार १२ फेब्रुवारीपासून दररोज सायंकाळी पाच ते आठपर्यंत आयोजित केलेले आहे. सर्व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बॉक्सिंग शिबिरासाठी संपर्क प्रा. संतोष गवळी (९४२१०२२१६९) अथवा सोहेल पठाण (७७६९८१४१०९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. नितीन मोटे यांनी केले आहे.



### भारत स्काऊट गाईडच्या राज्य पुरस्कार परीक्षेत के.एल.ई.चे तीन विद्यार्थी यशस्वी

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड आयोजित 'राज्य पुरस्कार परिक्षा' दि. २७ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ रोजी भोर, पुणे येथे घेण्यात आली. या राज्य पुरस्कार परीक्षेत के. एल. ई. इंग्लिश मिडीयम स्कूल च्या तीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व ही परीक्षा उत्तीर्ण झाले. यामध्ये इयत्ता ९ वी च्या केदार सुभाष भांगे, देवांश मिलिंद कदम व हर्ष राजकुमार हाळमळी या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना स्काऊट मास्टर स्वाती साखरे तसेच गाईड कॅप्टन सविता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.माननीय प्राचार्य श्री. सतीश हिरेमठ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची हॅटट्रिक

## महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट

### शिवाजी विद्यापीठ उपविजेते; डॉ. आंबेडकर मराठवाडा तृतीय

### आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक चौथ्या स्थानी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू करंडक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकाविले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने तृतीय तर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकने चौथे स्थान संपादिले.

इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सकाळच्या तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विद्यान विद्यापीठ संघाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने ११६ धावांनी पराभव केला. दुपारच्या अंतिम सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर वर ६ गड्यांनी विजय मिळविला. तृतीय क्रमांकाच्या सामन्याचे वैशिष्ट्य म्हणजे हा सामना अगदीच एकतर्फी ठरला. उपांत्य फेरीत पुणे विद्यापीठाकडून पराभव पत्करावा लागल्यानंतर मराठवाडा विद्यापीठाने १७० धावांचा डोंगर उभा केला आणि बदल्यात नाशिक विद्यापीठाला केवळ ५४ धावांवर गुंडाळले ज्यात ४ खेळाडू शून्य धावांवर बाद झाले. यात ५ बळी घेणाऱ्या कार्तिक चव्हाणने सामनावीर पुरस्कार पटकाविला तर अंतिम सामन्यात पुन्हा एकदा स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरलेला मनीष गायकवाड हा हिरो ठरला ते त्याने झळकावलेले अर्धशतक आणि घेतलेले २ बळी मुळे.

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठ शिक्षक व कर्मचारीवृंद यांच्यासाठी ही स्पर्धा सोलापुरात अतिशय उत्साहात दिमाखात संपन्न झाली. पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर, प्र.कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा, सोलापूर महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र संचालक डॉ.राजीव मराठे, उच्चशिक्षण सोलापूर विभागीय सहसंचालक डॉ. अजयकुमार जाधव व जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव श्री.चंद्रकांत रेम्बर्सू यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला. प्र.कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे आणि डॉ. अंबादास भासके यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी यांनी आभार मानले.

अंतिम सामन्यासाठी सोहेल शेख, महेश सोनवणे यांनी पंच तर गुणलेखक म्हणून मजहर मंगोली, शंकर पवार यांनी समोलोचक म्हणून आणि संपूर्ण स्पर्धेचे वृत्तांकन मिलिंद गोरे यांनी काम पाहिले.




### पुणे विद्यापीठास वर्धापन दिनाच्या पूर्व संध्येला चषक

१० फेब्रुवारी रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचा वर्धापन दिन असून त्याच्या पूर्व संध्येला त्यांच्या संघाने चषक जिंकला हे विशेष. स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाज म्हणून महाराष्ट्र आरोग्य विद्यान विद्यापीठ नाशिकच्या पुष्कर तऱ्हाळ याला, सर्वोत्तम फलंदाज म्हणून पुण्याच्या मनीष गायकवाड याला गौरविण्यात आले.

### संक्षिप्त धावफलक :

**तृतीय स्थान : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ :** १७०/७ (२०) जितेंद्र पाटील ५४ बलभीम मरकड ५४ सचिन गायकवाड नाबाद १६, संतोष जधाळ ३९/३, महेंद्रनाथ चौधरी २९/२ व संदीप चौधरी १ बळी **विजयी विरुद्ध महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक :** सर्वबाद ५४ (१८.२) संदीप चौधरी १३, योगेश राऊत ८ संतोष जधाळ १५ धावा,कार्तिक चव्हाण ४/५, रंजीत तांगडे रवींद्र खताळ बलभीम मारकड रोहित सलामपुरे प्रत्येकी १ बळी.

**अंतिम सामना : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर :** १४३/८ (२०) हरी मस्के नाबाद ३६, विशाल हिळगे योगेश दळवी १३, योगेश दळवी २१, विक्रम कोंढावळे १७, विनायक शिंदे ३३ धावा, संतोष सुगावे २५/३, मनीष गायकवाड १७/२, विनोद नरके शंतनु काशिद प्रत्येकी १ बळी. **पराभूत विरुद्ध सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे :** १४७/४ (१८.२) नितीन प्रसाद २२, मनीष गायकवाड ५४, बसवंत गजलवार ३०, दीपक गजरमल व शंतनु काशिद १२, अवांतर १७ धावा, विनायक शिंदे १७/३, अनिल पाटील १ बळी.

# दै. 'तरूण भारत'चे श्याम जोशी यांना आदर्श पत्रकार पुरस्कार



### व्यंकटेश विद्यालय व स्व.दिगंबरबुवा कुलकर्णी ट्रस्टचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

येथील व्यंकटेश संगीत विद्यालय व स्व. दिगंबरबुवा कुलकर्णी ट्रस्टतर्फे यंदापासून सुरू करण्यात आलेला आदर्श पत्रकार पुरस्कार दै.'तरूण भारत'चे उपसंपादक प्रमोद ऊर्फ श्याम जोशी यांच्यासह रविंद्र देशमुख, विनोद कामतकर, नंदकुमार येच्चे, कृष्णकांत चव्हाण व संगमेश जेऊरे यांना देण्यात आला.

येथील हि.ने. वाचनालयाच्या लो. टिळक सभागृहात रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या कार्यक्रमात वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय आठवले व माजी नगरसेवक रमेश व्हटकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह व भेटवस्तू असे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी ट्रस्टच्या अध्यक्षा तृप्ती कुलकर्णी, सचिव संदिप कुलकर्णी, सदस्य संजय नोगजा, सुरूची जोशी, प्रभाकर कुलकर्णी, मिनाक्षी हनदंडी, पुरूषोत्तम कुलकर्णी, संतोष कुलकर्णी, नियती कुलकर्णी उपस्थित होते.

सन १९३३ साली स्थापन झालेल्या व्यंकटेश संगीत विद्यालयाची शताब्दीकडे वाटचाल सुरू आहे. १९८४ पासून सोलापूरात शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम विद्यालयातर्फे घेतले जातात. विद्यालयाचे संस्थापक दिगंबर कुलकर्णी यांच्या निधनानंतर त्यांच्या नावे स्थापन केलेल्या ट्रस्टच्यावतीने सहा वर्षापासून विविध सांगितीक कार्यक्रम घेतले जातात. यंदापासून स्व. दिगंबर कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आदर्श पत्रकार पुरस्कार देण्यात येणार आहे. त्याअंतर्गत सहा पत्रकारांना गौरविण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल यांनी संगीतबध्द केलेल्या गाण्यावर आधारीत सोलापुरातील हौशी कलाकारांनी कराओके स्वरूपात गाण्यांचे सादरीकरण केले. श्रुती गुजर, हीना सिंगी, अरुणा गुजर, तृप्ती कुलकर्णी, भरत शहा, उमेश थोब्बी, निशिथ मेहता, संजय नोगजा यांनी गाण्यांचे सादरीकरण केले. श्रुती गुजर यांनी गायलेल्या सत्यम शिवम सुंदरम या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संजय नोगजा यांनी बासरीवर वाजवलेले हिरो चित्रपटातील 'लंबी जुदाई' हे गीत विशेष कौतुकास्पद झाले. धर्मेश राडिया यांनी खुमासदार शैलीत निवेदन केले. यावेळी रसिक श्रोत्यांची लक्षणीय उपस्थिती होती. किरण सुतार, श्रीकांत सुतार व अभिजीत सरवदे यांनी परिश्रम घेतले.



# 'खो-खो'चा आधारवड गेला

## पुण्यात खो-खो परिवारातर्फे स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**पुणे, दि. ९ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष, महाराष्ट्राचे लाडके लोकनेते व उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण क्रीडा क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. क्रीडा क्रांतीचा महामेरू हरपल्याची भावना प्रत्येक मैदानातून व्यक्त होत असून, खो-खो परिवाराने पुण्यात आयोजित केलेल्या शोकसभेत ही हानी शब्दातीत असल्याचे भावनिक चित्र पाहायला मिळाले.

यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, माजी सरचिटणीस प्रा. जे. पी. शेळके, अर्जुन पुरस्कार प्राप्त श्रीरंग इनामदार, सतीश देसाई, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्राचे खजिनदार ॲड. गोविंद शर्मा, श्रीरंग गोडबोले, राजेंद्र बलकवडे, प्रशांत पाटणकर, बाळासाहेब तोरसकर, विजय जाहेर, जयांशु पोळ, शैलजा पटवर्धन, किरण वाघ, सचिन चव्हाण, रफिक शेख, उमेश शिंदे, उमेश आटवणे, श्रीकांत ढेपे, प्रविता माने, डॉ. प्रशांत इनामदार आदी मान्यवरांनी शब्दसुमनांनी आदरांजली वाहिली.

**आठवणींनी दाटलेले क्षण**

पुण्यात पार पडलेल्या या विशेष शोकसभेत राज्यभरातून आलेले क्रीडा संघटक, प्रशिक्षक, पंच, खेळाडू व पदाधिकारी उपस्थित होते. सुरुवातीला दोन मिनिटे मौन पाळून स्व. अजितदादांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी दादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

**खेळाडूंचे कैवारी, शिस्तप्रिय नेतृत्व**

मनोगत व्यक्त करताना वक्त्यांनी दादांची खेळाप्रती असलेली ओढ, शिस्तप्रिय कार्यपद्धती आणि निर्णयक्षमता अधोरेखित केली. ''दादा शब्दाला जागणारे होते; एकदा शब्द दिला की काम पूर्ण,'' असा अनुभव अनेकांनी सांगितला. खो-खो खेळाला आधुनिक स्वरूप देत त्याला व्यावसायिक उंचीवर नेण्यात दादांचा सिंहाचा वाटा असल्याचे नमूद झाले.

**निधी, सुविधा आणि थेट संवाद**

राज्यातील क्रीडा संकुले, मैदाने, स्पर्धा व खेळाडूंसाठी निधी उपलब्ध करून देताना दादांनी कधीही आखडता हात घेतला नाही. सोलापूर, नाशिक, सांगली, कोल्हापूर, रायगड आदी जिल्ह्यांतील प्रतिनिधींनी अडचणीच्या काळात दादांनी मोठ्या भावाप्रमाणे मदतीचा हात दिल्याच्या आठवणी सांगितल्या. मैदानावर थेट येऊन खेळाडूंशी संवाद साधण्याची त्यांची शैली सर्वांच्या मनात कोरली गेली.

**महिला खेळाडूंना बळ**

महिला खेळाडूंना संधी, सन्मान आणि नेतृत्वाच्या पातळीवर पुढे आणण्यात दादांचे योगदान मोलाचे असल्याचे रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनच्या प्रतिनिधींनी नमूद केले. ''महिलांना विश्वासाने पुढे नेणारा नेता आज आपल्यात नाही,'' ही भावना सर्वत्र उमटली.

**न भरून निघणारी हानी**

''दादा केवळ अध्यक्ष नव्हते, तर प्रत्येक खेळाडूचे पालक होते,'' असे ज्येष्ठ प्रशिक्षकांनी सांगितले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या क्रीडा विश्वाचा खंदा आधारवड कोसळल्याची भावना व्यक्त झाली.

**संकल्प : अपूर्ण स्वप्नांची पूर्तता**

महाराष्ट्राचा खेळाडू जागतिक स्तरावर चमकावा, ऑलिम्पिकमध्ये अधिकाधिक पदके मिळावीत आणि खो-खोला जागतिक व्यासपीठ मिळावे, हे दादांचे स्वप्न होते. या स्वप्नांची पूर्तता करण्याचा संकल्प शोकसभेत व्यक्त करण्यात आला. दोन मिनिटे मौन पाळून स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

### डब्ल्यू.आय.टी. 'स्ट्रोक २०२६'चा जल्लोषात समारोप

# संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागास सर्वसाधारण विजेतेपद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

विविध क्रीडा प्रकारातील डब्ल्यू.आय.टी. 'स्ट्रोक २०२६' मध्ये संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाने ५५ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. सिव्हिल विभाग ३५ गुणांसह उपविजेता, तर आयटी विभागाने ३५ गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेबल-टेनिस, बास्केटबॉल, फुटबॉल आणि बुद्धिबळ या सर्व खेळांत चुरशीची स्पर्धा झाली.

शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या श्री ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळेच्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या क्रीडा महोत्सवाचा बक्षीस वितरण समारंभ वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, वैभव गांधी व पराग शहा यांच्या शुभेच्छांसह प्राचार्य डॉ. विजय आठवले, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

**अंतिम निकाल : सांघिक (विजेता, उपविजेता) :** बुद्धिबळ मुले : आयटी विभाग, सीएसई विभाग. मुली : एफवाय सॉफ्ट विभाग, सीएसई. टेबल-टेनिस मुले व मुली : सीएसई विभाग. बास्केटबॉल मुले : एफवाय कोर विभाग, मुली : सीएसई विभाग. व्हॉलीबॉल मुले व मुली : सीएसई विभागा. क्रिकेट मुले : सिव्हिल विभाग, ईएनटीसी. मुली : एफवाय सॉफ्ट विभाग, सिव्हिल.

**वैयक्तिक (प्रथम) :** बुद्धिबळ : रोशन दगडे (मेकॅनिकल), मुली : रेनी पलसापुरे (सीएसई). अमेय फुलंबरकर व डिंपल कोंडेकर (मौल्यवान खेळाडू). यश पाटील व प्रियल त्यारल (मालिकावीर). फुटबॉल (मुले) : अंकुर चौगुले (सीएसई विभाग). आविष्कार तीर्थकर (मालिकावीरचा) प्राची जगताप (सामनावीर व सर्वाधिक षटकार)

महावितरण

## जाहीर निवेदन

विभागीय कार्यालय बार्शी अंतर्गत सर्व ठेकेदार व खाली दिलेल्या विविध कारणास्तव जे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे लेनदार आहेत, अशा सर्वांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे 3 वर्षापेक्षा जास्त कालावधीची (1) सुरक्षा ठेव (Security Deposit) (2) बयाना रक्कम (EMD) (3) धारणा रक्कम (Retention) ही निर्लेखित करावयाची आहेत. बार्शी विभाग अंतर्गत काम केलेल्या सर्व ठेकेदार व विविध कारणास्तव लेनदार यांनी त्याची दखल घ्यावी व आपल्याकडील मूळ जमा पावती तसेच आवश्यक मूळ दस्तऐवजांसह रक्कम परताव्यासाठी संबंधित कार्यालयाकडे अर्ज करावयाचा आहे. या बाबतची यादी खाली दर्शविलेल्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध आहे. तरी याबाबत हरकत असल्यास **दि.20.02.2026 पर्यंत** विभागीय कार्यालय बार्शी येथे संपर्क साधावा. **दि. 20.02.2026** नंतर सदरची रक्कम निर्लेखित केली जाईल, त्यानंतर कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही तसेच विभागीय कार्यालय बार्शी यास जबाबदार राहणार नाही. **संपर्कासाठी:-** 1.श्री.डी.जी. कदम उपव्यवस्थापक (विवले) विभागीय कार्यालय बार्शी

**कार्यकारी अभियंता**
**महावितरण विभागीय कार्यालय बार्शी**
**PRO/BMTZ/188/2025-26**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-Tender (1st call) Notice

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038809 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 11/2025-2026, Particulars:** Work of rate contract for supply of required of spares, repairing & testing of healthiness of NIFPS along with demonstration at various EHV substation under EHV O&M Circle Solapur. **Estimated cost:** Rs. 25,00,000/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 25,000/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 09.02.2026 to 24.02.2026 **Last Date of Submission:** 24.02.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 25.02.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer -7447440608 For further details

**Subsequent call intimations (2nd / 3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in. 2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी येथील मिळकत यांसी जु.स.नं. ३१७/१, न.स.नं. १२७/१ यापैकी प्लॉट नं. ४७ याचे क्षेत्र ३२५ चौ.मी. यावर बांधलेल्या गॅलक्सी अपार्टमेंट मधील प्लॅट नं. ६०२ सहावा मजला याचे कारपेट क्षेत्र ६८.०२९ चौ.मी, यांसी चतुःसिमा- पूर्वेस :- प्लॉट नं.५१, पश्चिमेसः- अंतर्गत रस्ता, दक्षिणेस :- प्लॉट नं.१०, उत्तरेस :-प्लॉट नं.८. या वर्णनाची मिळकत यात नळ व लाईट मीटरची कनेक्शन इत्यादी सोयी उपलब्ध आहे. येणेप्रमाणे चतुःसीमेतील फ्लॉट जागा आतील बांधकाम तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या सर्व हक्कासह व इजमेंटच्या सर्व हक्कासह अपार्टमेंट ॲक्ट प्रमाणे मिळालेल्या हक्कासह नळ कनेक्शन, विद्युत कनेक्शन, लाईट मीटर कुझुमरसह तसेच कव्हर्ड पार्कीग नं. - VP-L (६०२ बी) याचे मालकी हक्कासह. या वर्णनाची मिळकत व यातील तदंगभूत वस्तुसह

२) सदरची मिळकत ही **सविता किरण राठोड, रा. मु.पो. लवंगी, पो. सलवर वु ता. मंगळवेढा, जि. सोलापूर** यांच्या मालकी वहिवाटीची आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री मिळकत मालक यांनी आमच्या अशिलांना करुन दिल्यामुळे आमच्या अशिलांनी सदरची मिळकत खरेदी करण्याचे ठरवून तसा जागा मालकांबरोबर लेखी करारही केलेला आहे. आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहारही पुर्ण करणार आहेत.

३) तरी सदरच्या मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी योग्य त्या अस्सल कागदपत्रांसह खालील पत्यावर आणुन दाखवून ते निदर्शनास आणून द्यावे. सदर मिळकतीबाबत कोणाचाही वाद, लवाद, गहाण, जप्ती, हुकूमनामा, बोजा, टाच, मालकी, कब्जेहक्क, भाडेहक्क इत्यादी व अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क असेल तर त्यांनी ०८ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रत्यक्ष भेटून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कळवून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही वाजवी हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. ०९/०२/२०२६.

सही/-
**ॲड दिपाली बी. मडूर (आडम)**
बी.ए., एल एल. बी.,
''पदमाई'' निवास, प्लॉट नं.३३,
आदर्श नगर, सोलापूर ९८२३४३०२२२
विनोद नामदेव राठोड तर्फे ॲडव्होकेट

# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### जम्मू-काश्मीर संघाने घडविला इतिहास

**इंदूर** : जम्मू काश्मीरने चौथ्या दिवशी मध्य प्रदेशवर ५६ धावांनी विजय नोंदवून प्रथमच प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण केल्याच्या ६७ वर्षांनंतर आणि शेवटच्या वेळी बाद फेरीत पोहोचल्यानंतर सहा वर्षांनी, जम्मू आणि काश्मीरने इंदूरमध्ये मध्य प्रदेशवर ५६ धावांनी विजय मिळवून आपल्या पहिल्या उपांत्य फेरीत प्रवेश करत इतिहास रचला. या विजयात अकीब नबीने महत्त्वाची भूमिका बजावली, त्याने सामन्यात ११० धावांत १२ बळी घेऊन हा ऐतिहासिक विजय निश्चित केला. या रणजी करंडकात सर्वाधिक बळी घेणाऱ्या पहिल्या पाच गोलंदाजांच्या यादीतील एकमेव वेगवान गोलंदाज असलेल्या नबीने या हंगामातील आपली बळींची संख्या ४६ पर्यंत नेली आहे. तो ५२ बळी घेणाऱ्या उत्तराखंडच्या मयंक मिश्रानंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२४-२५ च्या रणजी हंगामाच्या सुरुवातीपासून नबीने आतापर्यंत अविश्वसनीय ९७ प्रथम-श्रेणी बळी घेतले आहेत. मध्य प्रदेशने चौथ्या दिवसाची सुरुवात ५ बाद ८७ धावांवरून केली होती आणि विजयासाठी त्यांना आणखी २०४ धावांची गरज होती, परंतु पहिल्या अर्ध्या तासातच उपकर्णधार व्यंकटेश अय्यरची विकेट गमावल्याने त्यांना मोठा धक्का बसला. त्यानंतर अष्टपैलू खेळाडू सारांश जैनने ६४ धावांची वेगवान खेळी करत संघाच्या आशा कायम ठेवल्या आणि शुभम शर्मा व रामवीर गुर्जर यांच्यासोबत काही महत्त्वपूर्ण धावांची भागीदारी केली.



### बंगालचा ६२९ धावांचा डोंगर, आंध्र २७० धावांनी पिछाडीवर

**कल्याणी** : येथे सुरू असलेल्या रणजी करंडकाच्या तिसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात चौथ्या दिवशी आंध्र प्रदेशच्या २९५ धावांच्या प्रत्युत्तरात बंगालने १९९.१ षटकांत सर्वबाद ६२९ धावांचा डोंगर उभा केला. याबरोबरच बंगालने पहिल्या डावांत ३३४ धावांची भक्कम आघाडी मिळविली. दिवस अखेर आंध्र प्रदेशने २४ षटकांत ३ बाद ६४ धावा केल्या असून ते अजून २७० धावांनी पिछाडीवर आहे. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून बंगालला डावाने विजय मिळविण्यासाठी तसेच उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित करण्यासाठी आंध्र प्रदेशला पिछाडी भरून काढण्याआधीच त्यांच्या उर्वरित सात फलंदाजांना झटपट बाद करणे आवश्यक आहे. बंगालच्या धावांच्या डोंगरात सुदीप कुमार घरामीने ५९६ चेंडूंत २९९ धावांचे योगदान दिले, यात त्याने ३१ चौकार व ६ षट्कार हाणले. सुमंता गुप्ता (८१), हबीब गांधी (९६) व मोहम्मद शमी (५३) यांनीही भरीव योगदान दिले.

### नेमबाज संभाजी पाटीलचा भीषण अपघातात मृत्यू

**मुंबई** : पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघर जिल्ह्यातील मनोरजवळ झालेल्या भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी २७ वर्षीय शिवाजी पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. मनोरजवळील दुर्वेश गावाच्या हद्दीत त्यांची भरधाव फॉर्च्युनर कार एका अवजड वाहनावर पाठीमागून आदळल्याने हा अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की कारचा पुढचा भाग अक्षरशः चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले असून, त्यांचा सहकारी यश प्रशांत चौधरी हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पालघर येथील दुर्वेश गावाच्या हद्दीत सकाळी १० वाजताच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. मित्र प्रणय प्रशांत चौधरी याने आपली भरधाव कार दुसऱ्या मार्गिकेतून पहिल्या मार्गिकेत घेताना समोरच्या हायवा ट्रकचा अंदाज न आल्याने ही जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले.

### कोहली, रोहितचा ब श्रेणीमध्ये समावेश

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोमवारी २०२५-२६ हंगामासाठी वरिष्ठ पुरुष आणि महिला संघांसाठी वार्षिक खेळाडू करारांची घोषणा केली. तीस वरिष्ठ पुरुष क्रिकेटपटूंना केंद्रीय करार देण्यात आले, तर बीसीसीआयने ए-प्लस श्रेणी रद्द केली आहे. शिवाय, कसोटी आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेले भारताचे माजी कर्णधार विराट कोहली आणि रोहित शर्माला यादीत ब श्रेणी मध्ये स्थान देण्यात आले आहे. कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिल, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा हे पुरुषांच्या केंद्रीय करारांच्या यादीत अ श्रेणीमध्ये असलेले एकमेव खेळाडू आहेत.

# स्कॉटलंडचा इटलीवर ७३ धावांनी विजय

### अष्टपैलू मायकेल लीस्क सामनावीर

◆ **कोलकाता, ९ फेब्रुवारी**

जॉर्ज मुन्सीच्या ५४ चेंडूंतील ८४ धावा, ब्रँडन मॅकमलेन व मायकल लीस्कच्या उपयुक्त खेळींची साथ, आणि त्यानंतर लीस्कच्या चार बळींच्या कामगिरीमुळे स्कॉटलंडने आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत इटलीचा त्यांच्या पदार्पणातील सामन्यात ७३ धावांनी पराभव केला. ५ चेंडूंत नाबाद २२ धावांची खेळी व १७ धावांत ४ बळी टिपणारा अष्टपैलू मायकेल लिस्क सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

इटलीने नाणेफेक जिंकून स्कॉटलंडला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. स्कॉटलंडच्या ४ बाद २०७ धावांना प्रत्युत्तर देताना इटलीचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत १३४ धावांतच गारद झाला.

गत वेळी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात इटलीविरुद्ध खेळताना स्कॉटलंडला जरी काहीसा धक्का बसला असला तरी, ईडन गार्डन्सवरच्या प्रभावी कामगिरीनंतर त्यांनी २०२६ च्या टी-२० विश्वचषक मोहिमेतील पहिले गुण मिळवले. दोन दिवसांपूर्वी कोलकाता येथे वेस्ट इंडीजकडून झालेल्या पराभवानंतर स्कॉटलंडने इटलावर ७३ धावांनी विजय मिळविल. या विजयाबरोबरच त्यांनी दोन गुणांची कमाई केली.



मायकेल लीस्क सामनावीर

जॉर्ज मुन्सी स्कॉटलंडचा सर्वाधिक धावा काढणारा जॉर्ज मुन्सीने ५४ चेंडूंत १३ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ८४ धावांची खेळी केली. मुन्सीने मायकेल जोन्स (३७) याच्यासोबत १२६ धावांची सलामी भागीदारी करून स्कॉटलंडच्या डावाची चांगली सुरुवात केली.

८४ धावांच्या कामगिरी बरोबरच जॉर्ज मुन्सी स्कॉटलंडकडून सर्वाधिक धावा काढणारा फलंदाज ठरला. मुन्सीने एकूण २४०५ धावा केल्या असून त्याने बेरिंग्टनच्या २३९२ धावांच्या विक्रमाला मागे टाकले.

पुढे ब्रँडन मॅकमुलेनने कर्णधार रिची बेरिंग्टन (१५), टॉम ब्रुस (१) व मायकल लिस्कच्या (नाबाद २२) साथीने स्कॉटलंडला २० षकांत ४ बाद २०७ धावांची नोंद करून दिली. ब्रँडनने १८ चेंडूंत ४ षट्कारांच्या मदतीने नाबाद ४१ धावांची खेळी केली.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सलामीवीर जस्टीन मोस्का भोपळा न फोडताच बाद झाला, परंतु त्यानंतर ॲन्थोनी मोस्का (१३), जे. जे. स्मिट्स (२२), हॅरी मनेंटी (३७) व बेन मनेनीने (५२) संयमाने फलंदाजी करत संघाच्या विजयाचा आशा जीवंत ठेवल्या, परंतु तळाच्या फळीतील फलंदाज स्कॉटलंडच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाही आणि त्यांचा डाव १६.४ षटकांत १३४ धावांतच आटोपला.

स्कॉलंडकडून अष्टपैलू मायकेल लिस्कने १७ धावंत ४ बळी टिपले. मार्क वॅटने २ बळी, तर ब्रॅड करी, ब्रॅड व्हील व ऑलिव्हर डेव्हिडसनने प्रत्येकी एक बळी टिपला.

◂(वृत्तसंस्था)

# नेदरलॅण्डचा सामना नामिबियाशी

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत गट अ मध्ये मंगळवारी

नेदरलॅण्ड व नामिबिया यांच्यादरम्यान साखळी सामना खेळल्या जाणार आहे. पाकिस्तानला कडवी झुंज दिल्यानंतर नेदरलॅण्ड संघ धोकादायक असलेल्या नामिबियाविरुद्ध आपल्या क्षमतेची कसोटी लावेल.

आपण उच्च मानांकित प्रतिस्पर्धी संघांना अडचणीत आणू शकतो, हे नेदरलॅण्ड संघाने अलीकडेच पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यातून दाखवून दिले. या सामन्यातून आत्मविश्वास घेत नेदरलॅण्ड संघ नवी दिल्लीत दाखल झाला आहे.आता ते आफ्रिकन संघ - नामिबियाविरुद्ध खेळताना त्या आत्मविश्वासाचे रूपांतर गुणांमध्ये करण्याचा प्रयत्न करेल.

याउलट, नामिबिया आपला अभियान एका अनुभवी संघाविरुद्ध सुरू करत आहे. परंतु नामिबियाच्या निसटत्या पराभवाने त्यांच्या काही कमकुवत बाजू देखील उघड झाल्या आहेत.

नेदरलॅण्डसाठी, पाकिस्तानविरुद्ध केलेल्या १४७ धावा एकाच खेळाडूच्या प्रभावी कामगिरीवर आधारित नसून, अनेक खेळाडूंच्या विखुरलेल्या योगदानावर उभारल्या होत्या.

स्कॉट एडवर्ड्सच्या ३७ धावांनी डावाला आधार दिला, तर बास डी लीड (३०) व कॉलिन ॲकरमनने (१४ चेंडूत २०) मधल्या षटकांमध्ये गती दिली. आमच्याकडे प्रमुख फलंदाजांच्या पलीकडे जाऊन गोलंदाजी आक्रमणाला आव्हान देण्याची क्षमता आहे, हे नेदरलॅण्ड संघाने दाखवून दिले आहे.





नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मस | नेदरलॅण्डचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्स

नामिबियाच्या वैविध्यपूर्ण पण कमी अनुभवी गोलंदाजी आक्रमणासमोर, मधल्या षटकांचा तो टप्पा पुन्हा एकदा सामन्याचा निकाल ठरवू शकतो.

अनुभवी गेरहार्ड इरास्मसच्या नेतृत्वाखालील नामिबिया संघात युवा खेळाडू आणि अनुभवी खेळाडूंचा मिलाफ आहे, ज्यांनी विश्वचषकांमध्ये आपल्या क्षमतेपेक्षा सरस कामगिरी करण्याची सवय लावली आहे. इरास्मस, जॅन फ्रायलिंक आणि जेजे स्मिट हे एक मजबूत अष्टपैलू त्रिकूट असून ते फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीने सामन्यांना कलाटणी देण्यास सक्षम आहेत. फ्रायलिंकची डावखुरी वेगवान गोलंदाजी आणि स्मिटची वैविध्यपूर्ण गोलंदाजी नवी दिल्लीच्या खेळपट्ट्यांवर विशेषतः उपयुक्त ठरू शकतात.

फलंदाजीच्या बाबतीत नामिबिया लॉरेन स्टिनकॅम्प व मालन क्रुगर यांच्याकडून वरच्या फळीत स्थैर्याची अपेक्षा करेल, तर यष्टिरक्षक झेन ग्रीन मधल्या फळीची जबाबदारी सांभाळेल.

जेसी बाल्ट व डिलन लीचरसारख्या युवा फलंदाजांच्या उपस्थितीमुळे संघात अनिश्चितता येते. गोलंदाजी ही नामिबियाची पारंपरिक ताकद राहिली आहे. रुबेन ट्रम्पेलमन व बर्नार्ड शॉल्ट्झसारखे अनुभवी गोलंदाज आहे. ◂(वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**कॅनडा वि. दक्षिण आफ्रिका**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**नामिबिया वि. नेदरलॅण्ड**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

**न्यूझीलंड वि. युएई**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**पाकिस्तान वि. अमेरिका**
**स्थळ** : सिंहली स्पोर्ट्स क्लब स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# न्यूझीलंडचे अव्वल स्थान मजबूत करण्याचे लक्ष्य

◆ **चेन्नई, ९ फेब्रुवारी**

न्यूझीलंडचा संघ मंगळवारी येथे टी-२० विश्वचषक सामन्यात संयुक्त अरब अमिरातीचा (यूएई) सामना करताना सलग दुसऱ्या विजयासह ड गटातील आपले अव्वल स्थान मजबूत करण्यास उत्सुक असेल.

न्यूझीलंडने रविवारी अफगाणिस्तानवर पाच गडी राखून विजय मिळवून महत्त्वाचे दोन गुण मिळवले, आणि आता तुलनेने सोप्या प्रतिस्पर्ध्याविरुद्धच्या सामन्यात आपल्या कामगिरीचा पुरेपूर फायदा घेण्याचा त्यांचा प्रयत्न असेल.

अफगाणिस्तानविरुद्धच्या विजयाने न्यूझीलंडच्या अनुभवी फलंदाजी फळीची उपयुक्तता दाखवून दिली. संथ खेळपट्टीवर १८३ धावांचा पाठलाग करताना १४ धावांवर दोन गडी गमावल्यानंतर त्यांनी प्रभावीपणे डाव सावरला.

परंतु मिचेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील संघाला त्यांच्या फलंदाजीतील दोन महत्त्वाचे





न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सॅण्टनर | यूएईचा कर्णधार मोहम्मद वसीम

खेळाडू, फिन ॲलन व रचिन रवींद्रकडून आत्मविश्वास वाढवणारी कामगिरी अपेक्षित असेल.

ॲलन व रवींद्र गत सामन्यात मुजीब उर रहमानच्या फिरकीच्या जाळ्यात अडकले होते, परंतु यूएईकडे तशाच दर्जाचे गोलंदाज नाहीत. त्यामुळे, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यापूर्वी हे दोन्ही आघाडीचे फलंदाज आखाती संघाविरुद्ध मोठी धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न करतील.

परंतु अफगाणिस्तानविरुद्धच्या न्यूझीलंडच्या विजयातील एक दिलासादायक बाब म्हणजे मुजीबच्या दुहेरी धक्क्यांनंतर डाव सावरताना ग्लेन फिलिप्सने दाखवलेली परिपक्वता.

फिलिप्स लय कायम ठेवण्यासाठी आणखी एक चांगली खेळी खेळेल, अशी न्यूझीलंडला आशा आहे.

यूएईच्या संघात कर्णधार मोहम्मद वसीम, आक्रमक फलंदाज अलीशान शराफू आणि अनुभवी वेगवान गोलंदाज जुनैद सिद्दीकी यांसारखे काही अनुभवी खेळाडू आहेत.

वसीमने केवळ ८४ डावांमध्ये ३००० टी-२० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या. तो विराट कोहली व बाबर आझम यांच्यापेक्षा थोडाच मागे आहे.

सामन्याचा निकाल बऱ्यापैकी अपेक्षित असला तरी, यूएईचे खेळाडू न्यूझीलंडसारख्या दिग्गज संघाविरुद्ध खेळण्याच्या अनुभवातून शिकण्याची संधी साधतील. हाच त्यांच्यासाठी सर्वात मोठा फायदा असेल.

◂(वृत्तसंस्था)

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी www.tarunbharat.net वर भेट द्या!

# पाकने घेतली अमेरिकेची धास्ती

◆ **कोलंबो, ९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी पाकिस्तान आणि अमेरिका यांच्यादम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

नेदरलॅण्डविरुद्ध विजय मिळविताना पाकिस्तानला बराच संघर्ष करावा लागला. पाकिस्तान संघाला २० महिन्यांपूर्वी अमेरिकेकडून अपमानास्पद पराभव पत्करावा लागला होता, या पराभवाचा वचपा काढण्याचा आणि भुतकाळातील कटूस्मृतीला मूठमाती देण्याचा पाकिस्तानचा संघ प्रयत्न करेल.

२०२४ च्या विश्वचषकातील पदार्पणात अमेरिकेने पाकिस्तानी संघावर संस्मरणीय विजय मिळवून मोठ्या मंचावर आपल्या आगमनाची घोषणा केली होती.

२०२६ च्या सलामीच्या सामन्यात भारताकडून पराभव पत्करल्यानंतर अमेरिका संघ येथील सिंहली स्पोर्ट्स क्लबमध्ये सायंकाळच्या सामन्यात पाकिस्तानविरुद्ध त्याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्यासाठी अधिक प्रेरित असेल.





सलमान अली आगा | कर्णधार मोनांक पटेल

दोन्ही संघांना फलंदाजीच्या आघाडीवर खूप काम करायचे आहे.

नेदरलॅण्डविरुद्ध १४८ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ सहजपणे पुढे जात होता, पण त्यानंतर मधल्या फळीतील फलंदाजांनी आत्मघातकी खेळ केला. फहीम अश्रफमुळे त्यांना विजय मिळवता आला, पण या पडझडीमुळे संघ पूर्णपणे हादरला असेल.

वानखेडे स्टेडियमवर अमेरिकेने गतविजेत्या भारतावर दबाव आणला होता, परंतु त्यांच्या फलंदाजांना प्रभावी गोलंदाजीच्या कामगिरीला साथ देता आली नाही.

पाकिस्तानच्या पुनरागमन केलेल्या बाबर आझमवर सर्वांचे लक्ष असेल. सलामीवीर सईम अयुबकडूनही फलंदाजीत अधिक योगदानाची अपेक्षा असेल. अयुबने अलीकडच्या काळात फिरकी गोलंदाज म्हणून अधिक चांगली कामगिरी केली आहे.

पाकिस्तानच्या खेळाडूंनी नेदरलॅण्डविरुद्धच्या सामन्यापेक्षा दबावाला अधिक चांगल्या प्रकारे हाताळण्याची गरज आहे, असे कर्णधार सलमान अली आगाला वाटते. ◂(वृत्तसंस्था)

### कर्नाटकने केले मुंबईला बाहेर

**मुंबई** : वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्समधील शरद पवार अकादमीमध्ये झालेल्या रणजी करंडक उपांत्यपूर्व सामन्यात के.एल. राहुलच्या १३० धावांच्या सर्वोच्च खेळीच्या जोरावर कर्नाटकने ३२५ धावांचे मोठे लक्ष्य गाठून मुंबईला स्पर्धेतून बाहेर केले.



कर्नाटकचा सामना १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या उपांत्य फेरीत प्रथमच सहभागी झालेल्या उत्तराखंड संघाशी होईल. पहिल्या डावांत मुंबईच्या १२० धावांच्या प्रत्युत्तरात कर्नाटकने १७३ धावा काढल्या आणि ५३ धावांची आघाडी घेतली. मुंबईने दुसऱ्या डावांत ३७७ धावा काढून कर्नाटक समोर विजयासाठी ३२५ धावांचे लक्ष्य ठेवले. कर्नाटकने चौथ्या दिवशी ७३.४ षटकांत ६ बाद ३२५ धावा केल्या. केएल राहुलने १८२ चेंडूंत १४ चौकार व एका षट्कारसह १३० धावांची विजयी खेळी केली.

# नक्वी सामन्यासाठी शरीफ यांची परवानगी घेणार

◆ **कराची, ९ फेब्रुवारी**

पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी हे बांगलादेश क्रिकेट मंडळाच्या त्यांच्या समकक्षांनी केलेल्या विनंतीनंतर, भारतासोबतच्या टी-२० विश्वचषक सामन्यावरील बहिष्कार मागे घेण्यासाठी त्यांचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना विनंती करणार आहेत, अशी माहिती पीसीबीच्या एका सूत्राने दिली आहे. नक्वी सोमवारी नंतर या विषयावरील नवीनतम घडामोडींची माहिती शरीफ यांना देणार आहेत. भारतासोबतचा हा सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणार आहे. नक्वी पंतप्रधान शरीफ यांना बांगलादेश, श्रीलंका आणि अमिराती क्रिकेट मंडळासोबत व आयसीसीसोबत झालेल्या संवादाबद्दल माहिती देतील, असे सूत्राने सांगितले.

बांगलादेश क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष अमीन उल इस्लाम हे रविवारी आयसीसीचे उपाध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक इम्रान ख्वाजा यांच्यासोबत नक्वी यांनी केलेल्या चर्चेसाठी लाहोरमध्ये उपस्थित होते. ◂(वृत्तसंस्था)

# आयपीएलनंतर काशीमध्ये होणार रिंकू-प्रियाचा विवाह सोहळा

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

क्रिकेटपटू रिंकू सिंग व सपा खासदार प्रिया सरोज याच वर्षी



जूनमध्ये विवाहबंधनात अडकणार आहे. दोघांचा विवाहसोहळा काशीमध्ये होणार आहे.

गत वर्षी ८ जून रोजी लखनौमध्ये रिंकू आणि प्रियाचा साखरपुडा झाला होता. त्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये लग्नाची तारीख निश्चित झाली होती. पण, लग्न होऊ शकले नव्हते. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ ची तारीख ठरली होती. पण टी-२० विश्वचषक आणि आयपीएलमुळे आता ते जूनसाठी नियोजित करण्यात आले आहे.

विवाहासाठी आधी ११ व १२ जूनच्या तारखांवर चर्चा झाली होती, पण क्रिकेटच्या व्यस्ततेमुळे रिंकूने नवीन तारीख काढायला सांगितली आहे. २६ मार्च ते ३१ मे दरम्यान प्रस्तावित आहे. जेव्हा रिंकू मधून मोकळा होईल, तेव्हाच सनई वाजेल. लग्न काशीमध्ये होईल आणि स्वागत समारंभ अलीगढमध्ये ठेवले जाईल, असे रिंकूचे मोठे भाऊ सोनू सिंह यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# झिम्बाब्वेचा ओमानवर ८ गड्यांनी एकतर्फी विजय




तीन बळी टिपणारा सामनावीर ब्लेसिंग मुझारबानी

◆ **कोलंबो, ९ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येथे खेळल्या गेलेल्या ब गटाच्या साखळी सामन्यात अनुभवी झिम्बाब्वेने ओमानवर ३९ चेंडू शिल्लक ठेवित ८ गड्यांनी एकतर्फी विजय नोंदविला. १६ धावांत ३ बळी टिपणारा झिम्बाब्वेचा ब्लेसिंग मुझारबानीला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

झिबाब्वेने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला व ओमान संघाला १९.५ षटकांत १०३ धावांत गुंडाळले. त्यानंतर १३.३ षटकांत ३ गडी गमावित १०६ धावा काढून आपला विजय साकार केला. झिम्बाब्वेच्या गोलंदाजांनी प्रभावी मारा करत ओमनच्या फलंदाजांना झटपट बाद करून आपल्या फलंदाजांसाठी, परिणामी संघासाठी विजय सोपा केला. रिचर्ड नागरवा, ब्लेसिंग मुझारबानी व ब्रॅड इव्हान्सने प्रत्येकी ३ बळी घेतले, तर सिकंदर रझाने एक बळी घेतला आणि ओमना संघाला १०३ धावांत बाद केले. ओमानकडून सुफियान मेहमूद (२६), विनायक शुक्ला (२८) व नदीम खान (२०) हे तिघेच दोन अंकी धावा काढू शकले, तर इतर फलंदाज एक अंकी धावेवरच बाद झालेत.



ब्रायन बेनिटची नाबाद ८४ धावांची विजयी खेळी

झिम्बाब्वेला विजय मिळवून देताना सलामीवीर ब्रायन बेनिटने एकाकी झुंज देत नाबाद ४८ धावांची विजयी खेळी केली. त्याला तडीवनाशे मारुमणी (२१) व ब्रेंडन टेलरची (जखमी निवृत्त, ३१ धावा) व कर्णधार सिकंदर रझाची (नाबाद ५) उत्तम साथ मिळाली. ◂(वृत्तसंस्था)


# सूर्याच्या शांत नेतृत्वामुळे काम सोपे : गंभीर

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

कर्णधार म्हणून प्रत्येक बाबतीत सरस असलेल्या सूर्यकुमार यादवच्या 'शांत नेतृत्वामुळे' टी-२० फॉरमॅटमध्ये माझे उच्च-दबावाचे काम थोडे सोपे झाले आहे, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले.

सध्या सुरू असलेल्या टी-२० विश्वचषकासाठी भारताला या धडाकेबाज खेळाडूच्या रूपात सूर्यकुमार यादवसारखा कर्णधार मिळाल्याने संघ भाग्यवान आहे, असेही ते म्हणाले.

या फॉरमॅटमध्ये सूर्याने माझे आयुष्य खूप सोपे केले आहे. तो खेळाडूंचा एक विलक्षण नेता आहे, मैदानावरील त्याच्या कामगिरीमुळे नाही, किंवा तो फलंदाज म्हणून कसा आहे किंवा या फॉरमॅटमध्ये त्याचे फटके कसे आहेत यामुळे नाही, तर त्याचे शांतपणे नेतृत्व कमालीचे आहे, असे गंभीर म्हणाले.





"त्या सर्व गोष्टी तुम्ही बाजूला ठेवू शकता, पण तो ज्या प्रकारे खेळाडूंशी संवाद साधतो, ज्या प्रकारे तो खेळाडूंशी बोलतो, ज्या प्रकारे तो खेळाडूंसोबत वेळ घालवतो, तो मैदानात किती शांत असतो. कधीकधी प्रशिक्षक म्हणून, तुम्ही इतर अनेक गोष्टींचा विचार करू शकता, कारण तुम्हाला माहित आहे की तो वातावरण खूप शांत ठेवणार आहे, जे कोणत्याही प्रशिक्षकाचे स्वप्न असू शकते," असे ते पुढे म्हणाले.

भारताने शनिवारी या स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यात अमेरिकेचा पराभव केला, यात सूर्यकुमारने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्याने ४९ चेंडूत ८४ धावांची खेळी करून एका जिगरबाज प्रतिस्पर्ध्याविरुद्ध आघाडीच्या फळी कोसळल्यानंतर संघाला सावरले. भारत आता गुरुवारी येथे नामिबियाविरुद्ध खेळणार आहे.

सूर्यकुमारने कर्णधार म्हणून, माझ्या मते त्याने प्रत्येक बाबतीत स्वतःला सिद्ध केले आहे. तो एक विलक्षण नेता आहे, त्यामुळे माझे आयुष्य खूप सोपे झाले आहे, याचा त्यांनी पुनरूच्चार केला.

दोन वर्षांपूर्वी टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग असलेल्या ३५ वर्षीय सूर्यकुमारने, रोहित शर्माने आंतरराष्ट्रीय स्तरावर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर काही आठवड्यांतच कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतली होती. ◂(वृत्तसंस्था)


CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सांगोल्यात दासनवमीनिमित्त आज कार्यक्रम



**सांगोला, दि. ९ फेब्रुवारी-**
सांगोला येथील श्रीराम मंदीरामध्ये श्री रामदास नवमी (दासनवमी) निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आज मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी सायं.६ वा. महिलांचे सामुदायिक मनाचे श्लोक व दासबोध समास वाचन कार्यक्रम तसेच बुधवार दि.११ फेब्रुवारी रोजी स.६.३० वा. नामसाधना महिला व पुरुष यांचा जप, स. १०.३० वा. हभप.शुभांगी कवठेकर यांचे श्री रामदास स्वामी यांचे जीवनकार्य यावर किर्तन होणार आहे. त्यानंतर १२ वा. फुले व प्रसाद होणार आहे. तरी या भक्तीमय सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्रीराम मंदीरातर्फे करण्यात आले आहे.

### शिव्या देण्याच्या कारणावरून काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
शिव्या देण्याच्या कारणावरून दोघांना काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याने त्यांना शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल करण्यात आले.८ फेब्रुवारी रोजी राहत्या घरासमोर शिव्या देण्याच्या कारणावरून ईश्वर इद्राम शिंदे व प्रकाश अंबिका शिंदे यांनी काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याने रेखा रवींद्र शिंदे वय ४७ रा. खांदेवाडी ता. करमाळा जि. सोलापूर डोक्यात जखम व सर्वांगास मुका मार लागला आहे आणि रवींद्र हरिचंद्र शिंदे वय ४९ यांना सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना करमाळा येथे दाखल करण्यात आले होते तेथून पुढील उपचारासाठी आई मंगल शिंदे यांनी दि. ९ फेब्रुवारी रोजी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले याची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

### समोरच्या गाडीने वेग कमी केल्याने ऑटो रिक्षा पलटी

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
रिक्षाने प्रवास करत असताना समोरच्या गाडीने वेग कमी केल्याने ऑटो रिक्षाचे ब्रेक जोरात दाबल्यानंतर रिक्षा पलटी होऊन हातास व पायास जखम झाल्याने शासकीय रुग्णालयात एकाच दाखल करण्यात आले. राजेश शंकर कडावत वय ३० रा. हैदराबाद हे दि. ९ फेब्रुवारी रोजी हैदराबाद ते सोलापूर असे ऑटो रिक्षाने येत असताना इटकळच्या अलीकडे तलावाजवळ समोरच्या गाडीने अचानक वेग कमी केल्याने ऑटो रिक्षाचे ब्रेक जोरात दाबल्याने ऑटो रिक्षा पलटी होऊन अपघात झाल्याने त्यांना डावा पायास व उजव्या हातात जखम झाल्याने बहीण पार्वती यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

### शेतीच्या वादातून एकास मारहाण

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
शेतीच्या वादातून एकास मारहाण केल्याने त्यांना सर्वांगास मुका मार लागल्याने ते स्वतः शासकीय रुग्णालय येथे झाले.सूर्यकांत आनंदप्पा कुंभार वय ७५ राहणार सदलापूर (ता. अक्कलकोट जि. सोलापूर) हे दि. ८ फेब्रुवारी रोजी बदलापूर येथील गजानन पाटील शेताजवळ शेतीच्या जागेच्या वादावरून उल्हास पाटील यांनी हाताने मारहाण केल्याने त्यात सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे दाखल करण्यात आले होते. शिफारसीने पुढील उपचारासाठी ते स्वतः शासकीय रुग्णालय येथे दि. ९ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथे दाखल झाले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे

## निधन वृत्त...

### 'रास्वसं'च्या कार्यकर्त्या प्रभाताई सारोळकर



**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**
राष्ट्रीय स्वयंसेविका संघच्या जुन्या कार्यकर्ता प्रभाताई बापूराव सारोळकर यांचे सोमवारी निधन झाले. संपूर्ण आयुष्य त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यासाठी अर्पण केलेले असे महान राष्ट्रभक्त सारोळकर काकू होत्या. त्या असंख्य बजरंग दलाच्या संघाच्या कार्यकर्त्यांना त्याकाळी जेवणाच्या हक्काचं घर होतं

### माजी महापौर जनार्दन कारमपुरी



**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**
सोलापूर महापालिकेचे माजी महापौर, 'राष्ट्रवादी'चे ज्येष्ठ नेते तथा पद्मशाली ज्ञाती संस्थेचे विश्वस्त जनार्दन यल्लय्या कारमपुरी यांचे रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी निधन झाले. मृत्युसमयी ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या शांतीधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### बालम्मा गादम



**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**
येथील बालम्मा नारायण गादम यांचे अल्पशा आजाराने सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे.

### सुशीला कत्ती



**बार्शी, दि. ९ फेब्रुवारी-**
येथील रहिवासी सुशीला संगप्पा कत्ती यांचे रविवार ८ फेब्रुवारी रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या. त्या झाडबुके महाविद्यालयाचे प्रा. विश्वनाथ कत्ती यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### मल्लिनाथ दर्गोपाटील



**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
बाळीवेस येथील उत्तर कसब्यातील श्रीमंत मानाचा कसबा गणपतीचे ज्येष्ठ सदस्य मल्लिनाथ आनंदराव दर्गोपाटील वय (८६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. तरी त्यांची अंत्ययात्रा त्यांच्या उत्तर कसबा होटगी मठा जवळील राहत्या घरापासून सायंकाळी ठीक ४ वाजता निघणार आहे. तुळजापूरवेस विश्रांती चौक येथील लिंगायत रुद्रभूमीत येथे होणार आहे.

# नरेंद्र काळे हे सभागृह चांगल चालवतील

## महापौर कोंड्याल; महापालिका सभागृह नेतेपदाचा नरेंद्र काळे यांनी घेतला पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
सोलापुरातील जनतेने भरघोस मताने भाजपाला सत्ता मिळवून दिली विरोधी पक्ष नेत्यासह चांगला अनुभव असलेले नरेंद्र काळे यांच्याकडे पक्षाने सभागृह नेते पदाची जबाबदारी दिली आहे. सोलापूरच्या विकासासाठी आणि अनेक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोनातून नरेंद्र काळे हे सभागृह चांगल्या पद्धतीने चालवतील, असा विश्वास महापौर विनायक कोंड्याल यांनी व्यक्त केला.

सोलापूर महानगरपालिकेतील सत्ताधारी गटाच्या सभागृह नेतेपदाचा पदभार नगरसेवक नरेंद्र काळे यांनी आज पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृहात स्वीकारला. त्याप्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, सरचिटणीस नगरसेवक प्रा. डॉ. नारायण बनसोडे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, रंजीता चाकोते यांची प्रमुख उपस्थिती होती.

पदभार स्वीकारल्यानंतर नरेंद्र काळे यांनी सभागृहातील काज अधिक प्रभावी, शिस्तबद्ध आणि जनहिताभिमुख ठेवण्याचा संकल्प व्यक्त करत सभा शास्त्राचे धडे दिले. शहराच्या विकासाला गती देणे, नागरिकांचे प्रश्न ठामपणे मांडणे आणि प्रशासनाशी समन्वय साधून विकासकामे मार्गी लावणे यास प्राधान्य राहील. सर्वांची साथ महत्त्वाची ठरणार आहे. महापालिका सभागृहात पक्षाची मते तयार होतात. सभागृहातील भूमिकेवरच जनमत तयार होते. सभागृहात आपण सर्व सदस्यांनी चांगले वागले पाहिजे. मोठ्या जागा जिंकून दिल्या आहेत. यामुळे काम करणे गरजेचे आहे. लोकांच्या अनेक अपेक्षा आहेत, त्या पूर्ण केल्या पाहिजेत. पक्षामुळे आपण आहोत याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे, असे नरेंद्र काळे म्हणाले.



### पहिल्या सभेत वातावरण बरोबर नव्हते : काळे

पहिल्याच विशेष सभेत सभागृहात वातावरण बरोबर नव्हते. कुणीही उठून बोलत होते. योग्य शिस्त पाळणे गरजेचे आहे. कोणतीही चूक होऊ नये. परवानगी घेऊनच बोलावे. सदस्यांचे वर्तन चांगले हवे. वर्तन चुकले तर ते पक्षावर येते. चुकांमुळे पक्षाचे नुकसान होऊ नये. यामुळे पक्षाची प्रतिमा उंचावणे. ती टिकवणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे आवाहन नूतन सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी केले.

### दोघांना लोखंडी रॉडने व लाथा बुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
रानात असताना गाडीचा हॉर्न का वाजला असे विचारणा केली असता लोखंडी रॉडने व लाथाबुक्क्यानी दोघांना मारहाण केल्याने हातास व सर्वांगास मार लागल्याने त्यांना शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. कुरूल शिवारात रानात असताना गाडीचा हॉर्न का वाजवला म्हणून विचारणा केली असता त्यांना नागनाथ जाधव, रामा जाधव व इतर जणांनी मिळून लोखंडी रॉडनेवल लाथा बुक्क्यांनी मारहाण केली असता त्यांत संध्याराणी विकास पाटील वय ३८ रा. कुरुल ता. मोहोळ जि. सोलापूर यांच्या उजव्या हातास मार लागला तर सतीश मल्लिकार्जुन खंदारे वय ३८ यांच्या सर्वांगास मार लागल्याने त्यांना सरकारी दवाखाना कामती येथे दाखल करण्यात आले होते. पुढील उपचारासाठी शिफारसीने नातेवाईक पवन शेंडगे यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# राज्यस्तरीय व्यासपीठावर शिक्षकसेवेचा गौरव

## बार्शीचे डॉ. महादेव ढगे यांना 'महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक जीवनगौरव पुरस्कार'

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ९ फेब्रुवारी**
शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची चळवळ अधिक बळकट करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणारा 'राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार २०२६' हा भव्य सोहळा साऊ ज्योती सामाजिक संस्था व श्लोक फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण, निष्ठावंत व मूल्याधिष्ठित कार्याची दखल घेत डॉ. महादेव अशोक ढगे, सहा. प्राध्यापक, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांना 'महात्मा ज्योतिराव फुले आदर्श शिक्षक जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

पुण्यातील गंज पेठ येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात रविवार, ८ फेब्रुवारी रोजी हा राज्यस्तरीय सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन सुभेदार महेंद्र गोवर्धन गवई (इंडियन आर्मी) यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शंकर अंदानी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रामजीत गुप्ता (उइख), सिने अभिनेते बाळराजे वाळूंजकर, अभिनेत्री केतकी गावडे यांची उपस्थिती लाभली.

तसेच कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून प्रा. शशिकांत वेदशास्त्री शिरोळे, विशेष प्रमुख पाहुणे म्हणून वि. प. देशमुख, संदीप शर्मा, सौ. संजीवनी हाडके, भगवान सुर्यवंशी, दीपक बडगुजर यांच्यासह शिक्षण, प्रशासन, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते डॉ. महादेव ढगे यांचा शाल, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य, शैक्षणिक मूल्यांची जोपासना आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यामुळे डॉ. महादेव ढगे यांचा हा सन्मान शिक्षणक्षेत्रासाठी गौरवाचा मानला जात आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करुन समाजात सकारात्मक विचारांची जाणीव निर्माण करण्यात आली. राज्याच्या विविध भागांतून शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, शिस्त व प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य आयोजक सचिन हळदे व विकास उबाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा नूतनीकरण पूर्ण करा

## श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ ट्रस्टतर्फे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**
१९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सव साजरा करण्याकरिता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये असलेल्या पुतळा नूतनीकरणाची अर्धवट कामे त्वरित पूर्ण करून देण्यात यावीत. डाळिंबी आड, इंदिरा कन्या प्रशाला लगत शिंदे चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व चौकामधील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा परिसरामधील सर्व कामे त्वरित मार्गी लावावीत, अशा मागणीचे निवेदन श्री शिवजन्मोसो मध्यवर्ती महामंडळ ट्रस्टच्या वतीने नूतन महापौर विनायक कोंड्याल यांना देण्यात आले आहे.



यावेळी ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बचुटे-बरडे, उपाध्यक्ष किरण भंडारी ब्रह्मदेव पवार, मिरवणूक प्रमुख विजय पूकाळे, ट्रस्टी सदस्य प्रकाश ननवरे, सचिव प्रीतम परदेशी, देविदास घुले, राजू काकडे, सुभाष पवार, नागेश वडणे, सतीश महाले, अथर्व शिंदे प्रसिद्धीप्रमुख दीपक शेळके, कृष्णकांत चव्हाण उपस्थित होते डाळिंब आड येथे मनपाकडून सालाबादप्रमाणे मैदानाची साफसफाई करून मिळावी, मंडप टाकने, रोलिंग करणे, मलमा टाकने, मरंगरंगोटी करणे, लाइटिंग करणे, कुस्तीचा आखाडा तयार करून देणे, प्रेक्षकांना बसण्यासाठी गॅलरी तयार करणे या कामाची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. १८ फेब्रुवारी रोजी पाळणा कार्यक्रमास महिलांना येणे सुलभ व्हावे यासाठी शहरातील सुचवलेल्या मार्गावरून बसेस सोडण्याची व्यवस्था करावी. मिरवणूक पाहण्याकरिता आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी गॅलरीची व्यवस्था करण्यात यावी, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

# निर्भया पीडितेवरील अत्याचाराच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपीस अटक

## घटनेत शहर काझी कार्यालयाचा सहभाग नाही : पोलिस आयुक्त एम. राजकुमार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**
सदर बाझार पोलीस ठाणे येथे निर्भया पीडित हिच्यावर झालेल्या अत्याचाराच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपींना तात्काळ अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. यामध्ये गुन्ह्याच्या फिर्यादीमध्ये पिडितेकडून शहर काझी कार्यालय असा उल्लेख करण्यात आलेला होता परंतु गुन्ह्यातील विवाह संदर्भात झालेल्या घटनेत शहर काझी कार्यालयाचा कोणत्याही प्रकारचा सहभाग नसल्याचे पोलीस आयुक्त एन.राजकुमार यांनी सांगितले.

सन २०२३ ते दि.२३ जानेवारी २०२६ चे कालावधीत आरोपी इसराईल अहमद शेख, रा. तालुका पोलीस ठाणे जवळ, गुरुनानक चौक, सोलापूर हा निर्भया पिडीतेस नेहमी आर्कषीत करण्याचा प्रयत्न करायचा, मागे-मागे शाळे पर्यंत जात, निर्भया पिडीत ही अल्पवयीन असल्याचे माहीत असुन देखील त्याने निर्भया पिडीतेस प्रपोज केले, त्यास नकार देवून देखील त्याने वेळोवेळी पीडितेचा पाठलाग करून, तिच्याशी ओळख वाढवून तिला डिसेंबर २०२४ मध्ये त्याचा मित्र उजेब उर्फ म. हनिफ सादीक शेख याच्या घरी बोलावुन फोटो, व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवन जबरदस्तीने तिच्याशी शरिरसंबंध केले. त्यानंतर पिडीतीने आरोपी इसराईल शेख याच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करित असताना तो पीडिता ही शिकत असलेल्या कॉलेज येथे तिचा पाठलाग करून तिच्याशी संपर्क वाढवुन एके दिवशी तिला कारमध्ये बसवून अज्ञात ठिकाणी नेवून इसराईलने तिच्याशी जबरदस्तीने शरिर संबंध केले.

दि.१२ डिसेंबर २०२५ रोजी तिला पतंजली मॉल विजापूर रोड येथून कारमध्ये घेवून जावून कोर्टासमोरील खतीब वकिलाच्या ऑफिसमध्ये नेवून त्यांच्या मदतीने दिशाभूल करून धर्मातर करून लग्न केले व गुलबर्गा येथे जबरदस्तीने पळवून कारमध्ये नेले. तेथे त्याचा आतेभाऊ फिरोज व त्याचे आईचे ओळखीचे इसमाची रूम करून तेथे पिडीतेला कोंडून ठेवून वारंवार जबरदस्तीने पिडीतेशी शरीर संबंध केले.

पिडीतेच्या फिर्यादीवरून आरोपीत इसराईल अहमद शेख, उजेब उर्फ महनिफ सादिक शेख, अब्दुल सलीम खतीब, फिरोज (आरोपी क्र-०१ याचा आत्ते भाऊ) फिरोजची आई, दोघे रा. गुलबर्गा (पूर्ण नांव व पत्ता माहित नाही) यांचे विरुद्ध सदर बझार पोलीस ठाणे गु.रनं-८६/२०२६ बी.एन.एस-६४(१),३४(२) ७४,७८,७९,३५१(२),४९, ८७ सह पोस्को कलम - ४, ८,१२,१६ प्रमाणे दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला आहे.

या गुन्ह्याच्या तपासात आरोपी नामे इसराईल आमद शेख, उजेब उर्फ म.हनिफ सादिक शेख, अब्दुल सलीम खतीब यांना दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी १९.१५ वाजता अटक करून मुदतीत न्यायालया समक्ष रिमांड रिपोर्टसह हजर केले असता न्यायालयाने यातील गारोपी इसराईल शेख यास ०५ दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड दिलेली असून आरोपी उजेब उर्फ महनिफ सादिक शेख, अब्दुल सलीम खतीब यांची न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली. उर्वरित दोन आरोपीतांचा शोध घेण्यासाठी तपास पथक रवाना करण्यात आले आहेत.

सदर गुन्ह्याचे तपासाचे दरम्यान बातील आरोपी अब्दुल सलीम खतीब याने पिडीत व आरोपी इसराईल अहमद शेख यास त्याचे स्वतःच्या कोर्टासमोरील १३०, सिद्धेश्वर पेठ सोलापूर येथील ऑफिसमध्ये बोलावून तेथे पीडित हिला बॉण्ड पेपर आणणेस सांगुन प्रथम पिडीतेचे नांव आयेशा शेख असे करून त्यानुसार कागदपत्रे तयार करून मुस्लीम धर्माचे रितीरिवाजा प्रमाणे पीडितेचे इसराईल शेख याचे सोबत लग्न लावून दिले आणि यातील आरोपी अब्दुल सलीम खतीब याने पीडितेची आरोपी इसराईल शेख याचे सोबत विवाह केले चाबत , या नावाचे सर्टीफिकेट दिले असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्ह्याचे फिर्यादीमध्ये पिडितेने शहर काझी कार्यालय असा उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु गुन्ह्यातील विवाह संदर्भात झालेल्या घटनेत शहर काझी कार्यालयाचा कोणत्याही प्रकारचा सहभाग नाही. सदर गुन्हयाचा तपास चरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक अनिल राजगुरु, सदर बझार पोलीस ठाणे हे करीत आहेत.

# शांती चौकातील हिंदू स्मशानभूमीची अवस्था वेदनादायी

## डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी वेधले महापौरांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**
शहरातील पाणी टाकी, शांती चौकनजीकच्या महापालिकेच्या हिंदू स्मशानभूमीची अवस्था अतिशय दयनीय झाली असून नागरिकांच्यादृष्टीने ती वेदनादायी आहे. नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी या गंभीर बाबीची त्वरित दखल घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी नागरिक या नात्याने केली आहे.

यासंदर्भात त्यांनी महापौरांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, या हिंदू स्मशानभूमीची सध्याची अवस्था अत्यंत दयनीय, अस्वच्छ व नागरिकांसाठी वेदनादायक आहे.या स्मशानभूमीमध्ये पुढील विविध गंभीर त्रुटी आढळून येत आहेत. स्मशानभूमीचा योग्य व स्पष्ट नावफलक उपलब्ध नाही.

संरक्षक भिंत व प्रवेशद्वार नसल्याने परिसर उघडा व असुरक्षित आहे.सर्वत्र कचरा, घाणीचे ढिगारे, दुर्गंधी व अस्वच्छता आहे.



अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षित, स्वच्छ व सन्मानजनक प्रवेशमार्ग उपलब्ध नाही.अंत्यसंस्कारासाठी आवश्यक मूलभूत सुविधा व सुरक्षित प्रवेशमार्ग उपलब्ध करून द्यावा. याबाबत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित आदेश द्यावेत, असे डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### महापौरांची सकारात्मक दखल



डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी निवेदन पाठविल्यानंतर महापौर विनायक कोंड्याल यांनी त्याची सकारात्मक दखल घेतली. या संदर्भात त्यांनी या स्मशानभूमीमध्ये आवश्यक उपाययोजना राबवण्याची ग्वाही डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांना दिली. महापौरांनी या निवेदनाची दखल घेतल्याबद्दल डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी समाधान व्यक्त केले.

### पायास साप चावल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-** शेतात काम करत असताना एकास पायाला साप चावल्याने त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. विजयकुमार हिरालाल कोळेकर (वय ६५ रा. बागवान चौक, मोहोळ) गाढवे वस्ती येथील शेतात काम करत असताना उजव्या पायास साप चावल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना मोहोळ येथे दाखल करण्यात आले होते तेथून पुढील उपचारासाठी पुतण्या महावीर यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दीतील कसबे सोलापूर येथील जुना सर्वे नं. १२२/१ड, नविन सर्व्हे नं. १२०/१ ड पैकी कृष्णवेणी नगरमधील प्लॉट नं. १०९ याचे एकूण क्षेत्र ६०० चौरस फुट इतकी आहे. यासी चतुःसीमा :- पुर्वेस - प्लॉट नं. १०१, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ११०, उत्तरेस - प्लॉट नं. १०८ येणेप्रमाणे चतुःसीमेतील वर्णनातील प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभुत वस्तूंसह.

ही प्लॉट जागा - मन्नान मेहबुब शेख, रा.स.नं. ३५४, भैरवनाथ मंदिर काटे चाळ, कोंढवा, खुर्द पुणे - यांचे मालकीची असून त्यांचेकडून ही प्लॉट जागा आमचे अशिल हे खरेदीने घेणार आहेत. त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे. तरीही नमूद प्लॉट जागेवर अथवा मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चार दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०९/०२/२०२६

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२८, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## तालुका व गटनिहाय जि.प.चे विजयी उमेदवार

| क्र. | गट | नाव | पक्ष |
|---|---|---|---|
| | | **करमाळा** | |
| १ | पांडे | रश्मी बागल | भाजपा |
| २ | वीट | अश्विनी चिवटे | भाजपा |
| ३ | कोर्टी | वनिता गुळवे | राष्ट्रवादी (अ.प. गट) |
| ४ | चिखलठाण | प्रशांत पाटील | राष्ट्रवादी (अ.प. गट) |
| ५ | वांगी | रुपाली गोडसे | विकास आघाडी |
| ६ | केम | कल्याणी तळेकर | विकास आघाडी |
| | | **माढा** | |
| ७ | भोसरे | अश्विनी दळवी | राष्ट्रवादी (अ.प. गट) |
| ८ | मानेगाव | पृथ्वीराज सावंत | भाजपा |
| ९ | उपळाई बु. | माधुरी मोरे | भाजपा |
| १० | कुर्डू | संभाजी ढाणे | राष्ट्रवादी (अ.प. गट) |
| ११ | टेंभुर्णी | अमृता वाघे | भाजपा |
| १२ | बेंबळे | सविता कोकाटे | सेना शिंदे गट |
| १३ | मोडनिंब | वंदना कांबळे | भाजपा |
| | | **बार्शी** | |
| १४ | उपळाई ठोंगे | दीपक वैद्य | भाजपा |
| १५ | पांगरी | रेश्मा डोके | भाजपा |
| १६ | उपळे दुमाला | भारती दराडे | भाजपा |
| १७ | पानगांव | नंदकुमार काळे | भाजपा |
| १८ | मालवंडी | सुजाता डोईफोडे | भाजपा |
| १९ | शेळगाव आर | सोनाली बोधले | भाजपा |
| | | **उत्तर सोलापूर** | |
| २० | नान्नज | चैताली मुळे | भाजपा |
| २१ | दारफळ बीबी | इंद्रजित पवार | भाजपा |
| २२ | कोंडी | पृथ्वीराज माने | भाजपा |
| | | **मोहोळ** | |
| २३ | आष्टी | विजयराज डोंगरे | राष्ट्रवादी |
| २४ | नरखेड | लखन शिंदे | भाजपा |
| २५ | कामती बु. | विमल खताळ | भाजपा |
| २६ | पोखरापूर | बालाजी नरोटे | भाजपा |
| २७ | पेनुर | चरण चवरे | सेना शिंदे गट |
| २८ | कुरुल | सचिन जाधव | भाजपा |
| | | **पंढरपूर** | |
| २९ | करकंब | आदीनाथ देशमुख | भाजपा |
| ३० | भोसे | षण्मुखी कोरके | राष्ट्रवादी |
| ३१ | रोपळे | शिवांजली साळुंखे | राष्ट्रवादी |
| ३२ | गोपाळपूर | दुर्गा अंकुशराव | भाजपा |
| ३३ | वाखरी | मयुरी बागल | राष्ट्रवादी |
| ३४ | भाळवणी | सुप्रिया गायकवाड | राष्ट्रवादी |
| ३५ | टाकळी | नंदकुमार वाघमारे | भाजपा |
| ३६ | कासेगाव | व्यंकट भालके | तिर्थक्षेत्र वि.आघाडी |
| | | **माळशिरस** | |
| ३७ | दहिगांव | संस्कृती सातपुते | भाजपा |
| ३८ | मांडवे | गौतम माने | राष्ट्रवादी (शरद पवार) |
| ३९ | फोंडशिरस | अर्जुनसिंह मोहिते-पाटील | राष्ट्रवादी (शरद पवार) |
| ४० | संग्रामनगर | सुषमा नारनवर | राष्ट्रवादी (अ.प.) |
| ४१ | माळीनगर | मारुती लोंढे | राष्ट्रवादी (शरद पवार) |
| ४२ | बोरगांव | नागनाथ भोसले | राष्ट्रवादी (शरद पवार) |
| ४३ | वेळापूर | मिनाक्षी सरतापे | राष्ट्रवादी (शरद पवार) |
| ४४ | निमगाव | निलावती ठवरे | शिवसेना |
| ४५ | पिलीव | चंद्रकांत जाधव | भाजपा |
| | | **सांगोला** | |
| ४६ | महुद ब. | दादासाहेब लवटे | शिवसेना शिंदे गट |
| ४७ | एखतपूर | सिंधुताई आलदर | विकास आघाडी |
| ४८ | जवळा | अतुल पवार | महायुती |
| ४९ | कडलास | शोभाताई खटकाळे | महायुती |
| ५० | चोपडी | चेतनसिंह केदार | महायुती |
| ५१ | कोळा | केरप्पा पांढरे | स्थानिक आघाडी |
| ५२ | घेरडी | संगिता मोटे | विकास आघाडी |
| | | **मंगळवेढा** | |
| ५३ | दामाजीनगर | रमेश भांजे | भाजपा |
| ५४ | हुलजंती | संगीता दुधाळ | भाजपा |
| ५५ | लक्ष्मी दहिवडी | करुणा शिवशरण | भाजपा |
| ५६ | भोसे | प्रदीप खांडेकर | भाजपा |
| | | **दक्षिण सोलापूर** | |
| ५७ | बोरामणी | नेताजी खंडागळे | भाजपा |
| ५८ | कुंभारी | श्रुती भोरगुंडे | भाजपा |
| ५९ | वळसंग | रामप्पा चिवडशेट्टी | भाजपा |
| ६० | हत्तुर | लक्ष्मीबाई पाटील | शिवसेना शिंदे गट |
| ६१ | मंद्रुप | सोनाली कडते | भाजपा |
| ६२ | भंडारकवठे | सविता उंबरजे | भाजपा |
| | | **अक्कलकोट** | |
| ६३ | चपळगाव | शांभवी कल्याणशेट्टी | भाजपा |
| ६४ | वागदरी | प्रवीण तानवडे | शिवसेना शिंदे गट |
| ६५ | जेऊर | विकास बुळ्ळा | भाजपा |
| ६६ | पानमंगरुळ | शिवानी स्वामी | भाजपा |
| ६७ | नागणसूर | सिध्दाराम शिवमुर्ती | भाजपा |
| ६८ | सलगर | शिवराज म्हेत्रे | शिवसेना शिंदे गट |

# करमाळा तालुक्यात भाजप-राष्ट्रवादीचा झेंडा

## जिल्हा परिषद व पंचायत समितीवर सत्ता; प्रमुख नेत्यांचे बळ समसमान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.९ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून, भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीने तालुक्यात वर्चस्व राखत सत्ता मिळवली आहे. भाजप महिला प्रदेश उपाध्यक्ष रश्मी दीदी बागल, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार संजयमामा शिंदे मार्गदर्शक विलासराव घुमरे माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या साथीने लढवण्यात आलेल्या या निवडणुकांमध्ये भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व करमाळा तालुका विकास आघाडी या तिन्ही राजकीय प्रवाहांना संमिश्र यश मिळाले आहे.

या निवडणुकांमध्ये विद्यमान आमदार नारायण आबा पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे तसेच भाजप नेत्या रश्मी बागल-कोलते यांच्या गटांचे प्रतिनिधी समसमान प्रमाणात निवडून आल्याने करमाळा तालुक्यातील राजकीय समीकरणे अधिकच रंजक ठरली आहेत.





**सत्ता वाटपात समतोल**

निकालानुसार, आमदार नारायण आबा पाटील यांच्या गटाचे दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती सदस्य निवडून आले आहेत. माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती जागांवर यश मिळवले आहे. तर भाजप महिला प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल यांच्या नेतृत्वाखाली भाजप मार्गदर्शक विलासराव घुमरे युवा नेते दिग्विजय बागल जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपनेही दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती जागांवर विजय मिळवत आपली ताकद कायम ठेवली आहे.

**जिल्हा परिषद गटांचे सविस्तर निकाल**

पांडे जिल्हा परिषद गटातून भाजपच्या रश्मी दीदी बागल यांनी ९ हजार २४७ मते मिळवत विजय संपादन केला.

वीट जिल्हा परिषद गटातून भाजपच्या अश्विनी गणेश चिवटे विजयी झाल्या.

चिखलठाण जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रशांत पाटील यांनी ९ हजार ७३९ मते मिळवत बाजी मारली.

कोर्टी जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वनिता गुळवे यांनी १३ हजार ३७२ मते मिळवत घवघवीत विजय मिळवला.

वांगी जिल्हा परिषद गटातून करमाळा तालुका विकास आघाडीच्या रूपाली गोडसे यांनी १० हजार ३३४ मते मिळवली.

केम जिल्हा परिषद गटातून कल्याणी अजित तळेकर यांनी १० हजार ६६२ मते मिळवत विजय मिळवला.

**पंचायत समिती गणांचे निकाल**

पांडे पंचायत समिती गणातून करमाळा तालुका विकास आघाडीचे स्वप्निल काळे यांनी ४ हजार ३६ मते मिळवत विजय मिळवला.

कोर्टी गणातून भाजपचे नाना झाकणे यांनी ५ हजार ३६१ मते मिळवली.

साडे गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे दशरथ घाडगे यांनी ४ हजार ९३३ मते मिळवत निवडणूक जिंकली.

वीट गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या पूजा ढेरे यांनी ५ हजार ३४० मते मिळवली.

चिखलठाण गणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वनमाला चंद्रकांत सरडे यांनी ४ हजार ८९४ मते मिळवली.

उमरड गणातून करमाळा तालुका विकास आघाडीच्या आदिती अतुल पाटील यांनी ६ हजार २५८ मते मिळवत विजय संपादन केला.

जेऊर गणातून करमाळा तालुका विकास आघाडीच्या ललिता शिरस्कर यांनी ५ हजार ६५६ मते मिळवली.

हिसरे गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे भरत आवताडे यांनी ५ हजार ९३८ मते मिळवत बाजी मारली.

केतुर गणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे ड. अजिनाथ विघ्ने यांनी ६ हजार ४३४ मते मिळवली.

केम गणातून करमाळा तालुका विकास आघाडीचे ज्ञानेश्वर बिचितकर यांनी ५ हजार ४६३ मते मिळवली.

वांगी गणातून भाजपच्या सोनाली ताकिक यांनी ५ हजार १६७ मते मिळवत विजय संपादन केला. रावगाव गणातून भाजपच्या संध्या कांबळे यांनी ४ हजार ५५३ मते मिळवली.

**राजकीय चित्र अधिक स्पष्ट**

या निकालांमुळे करमाळा तालुक्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व करमाळा तालुका विकास आघाडी यांची ताकद जवळपास समसमान असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, आमदार नारायण आबा पाटील यांनी दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती जागा जिंकत आपला बालेकिल्ला अबाधित ठेवला आहे. एकूणच, करमाळा तालुक्यात भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव कायम असल्याचे या निवडणुकीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# माळशिरसमध्ये राष्ट्रवादी आघाडीची सरशी

## गटात राष्ट्रवादी आघाडी ७ भाजप २ तर गणात राष्ट्रवादी १२ व भाजप ६

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.९ फेब्रुवारी-**

दहिगाव गट : संस्कृती राम सातपुते विजयी (भाजपा १३२५०) जीवन उत्तमराव जानकर (राष्ट्रवादी शप १२०७६) ऋषिकेश ईश्वर गायकवाड (अपक्ष ४०१) गुरसाळे गण : दत्तात्रय विठोबा शेळके विजयी (भाजपा ६०६३) अर्जुनसिंह मदनसिंह मोहिते-पाटील (राष्ट्रवादी शप ५७४८) अर्जुन हनुमंत पवार (अपक्ष ११५४) दहीगाव गण : तनुजा बाळू खिलारे विजयी (भाजपा ६५१२) कमल खिलारे (राष्ट्रवादी शप ६२९३) सोनाली सचिन झेंडे (अपक्ष ४१४). मांडवे गट : गौतम नामदेव माने विजयी (राष्ट्रवादी शप १३७२५) धर्मराज वसंत माने (भाजपा १२६४२) मांडवे गण : राजश्री राहुल रुपनवर विजयी (भाजपा ६६२३) नागरबाई जयवंत पालवे (राष्ट्रवादी शप ५८०२) कण्हेर गण : आनंदराव नामदेव शेंडगे विजयी (भाजपा ७१२२) देशमुख यशराज रामदास (राष्ट्रवादी शप ६५८४) रमेश भालचंद्र पाटील (अपक्ष १८४) फोंडशिरस गट : मोहिते-पाटील अर्जुनसिंह मदनसिंह विजयी (राष्ट्रवादी शप ११८८५) हरीदास काशिनाथ वाघमोडे (भाजपा १०९२०) बाळासाहेब सिताराम शिंदे (अपक्ष १७५). फोंडशिरस गण : सोनाली राजेंद्र पाटील विजयी (राष्ट्रवादी शप ६०५७) शैला चंद्रकांत वाघमोडे (भाजपा ५८६१) भांबुर्डी गण : प्रवीण हनुमंत वाघमोडे विजयी(राष्ट्रवारी शप ५९३५) देविदास नारायण वाघमोडे (भाजपा ४८६५). संग्राम नगर गट : सुषमा विष्णू नारनवर (राष्ट्रवादी अप १२४५९) मेघा रामचंद्र कचरे (भाजपा १२०९५). मेडद गण : युवराज झांजे विजयी (राष्ट्रवादी अप ७०९६) नाथा पाटील (भाजप ५८९५) शंतनू सरगर (अपक्ष १५०) संग्रामनगर गण : गिरमे निशा किशोर विजयी (राष्ट्रवादी अप ६२३२) राजेश्वरी कृष्णराज माने-पाटील (भाजपा ५११६). माळीनगर गट : मारुती हरीदास लोंढे विजयी (राष्ट्रवादी शप ११२६०) किशोरराजे दादासाहेब गाडे (कॉंग्रेस १०४९) श्री नागेश संपत तूपसौंदर्य (भाजपा ८४१७) माळीनगर गण : महादेव साबळे ,विजयी (राष्ट्रवादी शप ५२६५) विजय खंडागळे (भाजप ३६०४२)संजय शिंदे (अपक्ष ११२५) लवंग गण : ऋतुजा विक्रम पराडे पाटील विजयी (भाजपा ५८७१) सौ कोमल निशांत पाटील (राष्ट्रवादी शप ५८५२)सुशांता गणेश जगताप (अपक्ष १५०) बोरगाव गट : भोसले नागनाथ पांडुरंग विजयी(राष्ट्रवादी श प १२७ २९) राजू मारुती गायकवाड (कॉग्रेस ५४५) संजय नामदेव साठे (भाजप ७ ६७३) निवृत्ती नाईकनवरे विजयी (राष्ट्रवादी श प ६३८ ७) हेमलता अनिल जावीर (भाजपा ४२४६) बोरगाव गण : मनिषा निवृत्ती नाईकनवरे विजयी (राष्ट्रवादी श प ६३८ ७) हेमलता अनिल जावीर (भाजपा ४२४६). जांबूड गण : अप्पासो नामदेव पाटील विजयी (राष्ट्रवादी श प ६३४१)राहुल लक्ष्मण खटके (भाजपा ४१३७) नौरालाल तांबोळी (अपक्ष १९२). वेळापुर गट : मीनाक्षी मिलिंद सरतापे विजयी (राष्ट्रवादी श प १३७६९) प्रेरणा जयंत खंडागळे (भाजपा ७७९४). वेळापुर गण : विमल उत्तमराव जानकर विजयी(राष्ट्रवादी शप ५९९१)इसाक अबूबकर पठाण (कॉंग्रेस २२९) अमृतराज सूर्यकांत माने देशमुख (भाजपा ५६२९). यशवंतनगर गण : पाटील वैष्णवी अर्जुनसिंह विजयी (राष्ट्रवादी शप ७५६०) अशोक मधुकर एकतपुरे (भाजपा १८३१)शिवराम रामदास गायकवाड . निमगाव गट : निलावती मच्छिंद्र ठवरे (शिवसेना १४६४०) ज्योती विनायक ठवरे (भाजपा १०१६२) ऋतुजा धनाजी मस्के (कॉंग्रेस १८१) निमगाव गण : दत्तात्रेय रावसो मगर विजयी (शिवसेना ७३४७) गोरख विठोबा पवार (अपक्ष ३५७) किरण वसंतराव पाटील (भाजपा ४०१७) गोरडवाडी गण : रेश्मा जगन्नाथ माने विजयी (शिवसेना ७४१८) चांगुणाबाई साहेबराव गोरड (भाजपा ५४२४)रेश्मा जगन्नाथ माने (शिवसेना ७४१८) पिलीव गट : चंद्रकांत ज्ञानेश्वर जाधव विजयी (भाजपा १२९०३) रणजीतसिंह जयसिंगराव जाधव (राष्ट्रवादी श प १२२५६) पृथ्वीराज शहाजीराव पाटील (कॉंग्रेस २३३) पिलीव गण : नम्रता शिवराज पुकळे विजयी (भाजपा ६९३१)जयश्री शिवराज कदम (अपक्ष १९२) यज्ञासेना संग्राम सिंह जहागीरदार (राष्ट्रवादी श प ६४९१), तांदुळवाडी गण : वैशाली किसन फुलारे (भाजपा ५६३०) जयश्री शिवराज कदम (कॉंग्रेस ३८५) मनीषा अमोल पाटील विजयी(राष्ट्रवादी श प ५६६२).

# अक्कलकोटमध्ये भाजपाच वरचढ

## जि.प.च्या भाजपाने ४ तर सेना २; प.सं. भाजपा ८ सेना ४

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.९ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक अत्यंत अटीतटीची झाली. सोमवारी मतमोजणीचे निकाल हाती आले. भाजपाने जिल्हा परिषद- ४ व पंस ८ शिवसेना शिंदे गटाने जिप दोन पसं ४ जागा जिंकल्या. जिल्हा परिषद चप्पळगाव गट भाजपा शांभवी कल्याणशेट्टी १६२३८ विजयी, शिवसेना सुजाता भरमशेट्टी ९०८० प्राप्त केली. जिल्हा परिषद वागदरी गट भाजपा राजश्री शेळके ९०६५ व शिंदे शिवसेना प्रविण तानवडे विजयी १२४९३ मते प्राप्त केली. जिल्हा परिषद जेऊर गट कांग्रेसचे अश्वघोष बनसोडे ९७७१ २)भाजपाचे विकास बुळ्ळा १०६८०. जिल्हा परिषद मंगरूळ गट राष्ट्रवादी अजित पवारगट. सुज्ञानी बनसोडे, १०१३१ भाजपाकडे शिवानी स्वामी. १२७४२ (विजयी) मते प्राप्त केली. जिल्हा परिषद नागणसुर गट भाजपाकडून सिद्धाराम शिवमुर्ती ११९४५ विजयी, शिंदे शिवसेनेकडून धनराज धनशेट्टी ११८६४ मते प्राप्त केली. जिल्हा परिषद सलगर गट भाजपाकडून सिद्धाराम बाके ११६१७ मते व शिंदे शिवसेनेकडून माजी आमदार पुत्र शिवराज म्हेत्रे १३९४३ मते घेऊन विजय संपादन केला.

**पंचायत समिती गण**

चप्पळगाव गणा मध्ये भाजपाकडून सागर कल्याणशेट्टी ७३५०, (विजयी )शिंदे शिवसेनेकडून अश्पाक अगसापुरे ४७०९ मते प्राप्त केली. पंचायत समिती गण कुरनुर मधुन भाजपाकडून विनोद मोरे ७२५० विजयी. शिंदे शिवसेनेकडून व्यंकट मोरे ५२६३ मते मिळाली. पंचायत समिती वागदरी गण भाजपाकडून अप्पासाहेब किवडे ५२२२ विजयी शिंदे शिवसेनेकडून संजय होळे ५०७६ मते मिळाली.

पंचायत समिती गण शिरवळ भाजपाकडून राजेंद्र बंदिछोडे ४१७६ शिंदे शिवसेनेकडून गणेश मोरे ६२ ९९ विजयी मते मिळाली पंचायत समिती गण दहिटणे मध्ये भाजपाकडून आशा इंगळे ५४५८ विजयी कॉंग्रेसकडून अनिता नडगम ३६८ ४ मते प्राप्त कैली. पंचायत समिती गण जेऊर भाजपाकडून पंचायत समितीचे माजी सभापती विमल गव्हाणे ५८९७ विजयी कॉंग्रेसकडून श्रृती पाटील ५७६२ मते प्राप्त केली. पंचायत समिती गण सुलेरजवळगेमध्ये भाजपाकडून उत्तम वाघमारे ६६७४ विजयी राष्ट्रवादी कॉंग्रेस पऱ्हाद वाघमारे ४६२८ मते मिळाली. पंचायत समिती गण मंगरूळ मध्ये भाजपाकडून रश्मी हिप्परगी ६२८७ विजयी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीकडून भुवनेश्वरी कौरशेट्टी ४९१२ मते प्राप्त केली. पंचायत समिती गण नागणसुरमध्ये भाजपाकडून वैष्णवी सलगरे ५४८४ विजयी शिवसेनेकडून स्वाती उडचाण ४६२४ मते मिळाली. पंचायत समिती गण तोळणुर मधुन भाजपाकडून सविता सोलंकर ६३६२ मते शिंदे शिवसेनेकडून माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची कन्या शितल म्हेत्रे ७२४५ विजयी मते मिळाली. पंचायत समिती गण सलगर मधुन भाजपाकडून शिवराज बिराजदार ६४०७ शिंदे शिवसेनेकडून भिमण्णा सोलापुरे ६५५८ विजयी मते मिळाली. पंचायत समिती गण मुगळी भाजपाकडून पंचायत समितीचे माजी सदस्य मोतीराम राठोड यांची कन्या समृद्धी राठोड ५००६ मते शिंदे शिवसेनेकडून संगीता पाटील ७४४४ विजयी मते प्राप्त केली.

नातं विश्वासाचं..श्रध्देचं..!
श्री रेणुकामाता मल्टिस्टेट
को-ऑप अर्बन क्रेडिट सोसा. लि., अहिल्यानगर
ठेवीवर आकर्षक व्याजदर १०.००%
एका कॉलवर बँकिंग सेवा आपल्या दारी
सर्व बँकेचे कार्ड स्वॅपिंग सुविधा
मोबाईल बँकींग सुविधा
RENUKAMATA WEB SITE QR CODE
प्रधान कार्यालय : रेणुकाभवन, एकविरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर(महाराष्ट्र) ४१४००३. फोन : ०२४१-२४३२००३
Website : www.renukamatamultistate.com email : callcentre@renukamatamultistate.com
Toll Free No : 1800-233-4140
।। श्री रेणुकामाता प्रसन्न ।।
स. न. वि. वि. आमचे येथे श्री रेणुकामाता कृपेकरुन
उद्घाटन समारंभ
शाखा - उदगीर
मंगळवार दि. १०/०२/२०२६ रोजी
सकाळी ११ ते आपल्या आगमनापर्यंत
सर्वांशी अतुट, जिव्हाळ्याच नातं जपत...आपल्या विश्वासाचे छत्र जोपासत... आज आम्ही यशाच्या दिशेने वाटचाल करीत आहोत आणि ते आपल्या सर्वांच्या सदिच्छा, पाठबळ व आशिर्वादामुळेच.. शाखेच्या उद्घाटन दिनानिमित्त आयोजित केलेल्या तिर्थप्रसाद व पानसुपारी कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

।। प्रेषक ।।
डॉ. प्रशांत चंद्रकांत भालेराव
संस्थापक चेअरमन
श्री रेणुकामाता
मल्टिस्टेट को-ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि. अ.नगर.
मलगे बिल्डिंग, मोढा रोड, उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर
उदगीर-संपर्क नं. मो. ९२२५३२००७६

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक **:प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# माढा तालुक्यात ‘भाजपा’चा बोलबाला



## जि.प.च्या ४ तर पं.स.च्या ७ जागांवर विजय

## तालुक्यात पृथ्वीराज सावंत यांना सर्वाधिक मताधिक्क्य

## आमदार अभिजीत पाटील यांना शिंदे ठरले वरचढ

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.९ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये ‘भाजपा’चा बोलबाला झाल्याचे निकालाअंती स्पष्ट झाले. जिल्हा परिषदेच्या ४ तर पंचायत समितीच्या ७ जागांवर भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांने विजय संपादन केला. मानेगाव व मोडनिंब जिल्हा परिषद गट ही निवडणूक लक्षवेधी झाली होती.

मानेगाव गटातून प्रा.शिवाजीराव सावंत यांचे पुत्र पृथ्वीराज सावंत हे तालुक्यातील सर्वाधिक ६ हजार ८१७ मताने विजयी झाले आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुहास पाटील यांचा पराभव केला आहे. मोडनिंब जिल्हा परिषद गटातून जिल्हा परिषदेचे माजी सभापती शिवाजीराजे कांबळे यांच्या पत्नी वंदना कांबळे ह्या ४ हजार ९०७ मताने विजयी झाल्या आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रभावती शिंदे यांचा पराभव केले आहे.

माढा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या एकूण ७ जागांपैकी ‘भाजपा’ने ४, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने २ तर शिवसेनेने १ जागा पटकावले. पंचायत समितीच्या एकूण १४ जागांपैकी भाजपा ७, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट ५, राष्ट्रवादी शरद पवार गट व अपक्ष प्रत्येकी एक याप्रमाणे पक्षीय बलाबल झाले आहे. दरम्यान, या निवडणुकीत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील यांना शिंदे, सावंत आणि साठे यांनी शह दिल्याचे दिसून येत आहे.

### गणनिहाय विजयी उमेदवार व पक्ष याप्रमाणे

मानेगाव : पंडित देशमुख (भाजप)
दारफळ : सोनाली साठे (अपक्ष)
भोसरी : आशिष रजपूत (राष्ट्रवादी काँग्रेस)
रोपळे क : छायादेवी कारंडे (राष्ट्रवादी काँग्रेस)
उपळाई बुद्रुक : नितीन झाडबुके (भाजपा)
भुताष्टे : स्वाती गिड्डे (भाजप पुरस्कृत)
कुर्डू : अमृता पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
अकोले खुर्द : संभाजी पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
टेंभुर्णी : प्रतिभा खरात (भाजपा)
रांझणी : सुनीता पाटील (भाजपा)
बेंबळे - पोपट अनपट (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार)
पिंपळनेर : बिभीषण डांगे (भाजपा)
मोडनिंब : प्राजक्ता पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
लऊळ : सोनाली माळी (भाजपा)

### गटनिहाय विजयी उमेदवार व पक्ष याप्रमाणे

मानेगाव : पृथ्वीराज सावंत (भाजप)
मोडनिंब : वंदना कांबळे (भाजप)
टेंभुर्णी : अमृता वाघे (भाजप)
उपळाई बु : माधुरी मोरे (भाजप)
कुर्डू : संभाजी ढाणे (राष्ट्रवादी अजित पवार गट)
भोसरे : अश्विनी दळवी (राष्ट्रवादी अजित पवार गट)
बेंबळे : सविता कोकाटे (शिवसेना शिंदे गट)



# ‘उत्तर’ भाजपा च्या ताब्यात

## ● माने-पवार वर्चस्व कायम

## ● ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे पराभूत





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती ‘भाजपा’च्या ताब्यात आली. या निवडणुकीच्या निमित्ताने माजी आमदार दिलीप माने, ‘भाजपा’चे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या संयुक्त गटाने वर्चस्व निर्माण केले. तालुक्यातील जिल्हा परिषदेचे ३ गट आणि पंचायत समितीच्या ४ गणांवर ‘भाजपा’चे उमेदवार निवडून आले आहेत. या तालुक्यात सरासरी ६५.७९ टक्के मतदान झाले होते. सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे यांना पहिल्यांदाच पराभवाला सामोरे जावे लागले.

उत्तर सोलापूर तालुक्यात ८८ हजार ९९२ इतके मतदान होते. त्यापैकी ३१ हजार १३५ पुरुष आणि २७ हजार ४१५ स्त्री असे एकूण ५८ हजार ५५१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. नान्नज जि.प.गटातील ‘भाजपा’च्या उमेदवार चेताली श्रीकांत मुळे यांनी ९ हजार २०१ मते घेत तालुक्यात सर्वाधिक मते मिळविण्याचा मान पटकावला. त्यांचे प्रतिस्पर्धी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अनिल माळी यांना ७ हजार ५६१ मते पडली.

वडाळा गणातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वैशाली नरेंद्र शिलवंत यांनी ४ हजार ८४० मते घेवून विजयश्री मिळविली. त्यांच्या प्रतिस्पर्धी राहिलेल्या शिल्पा माळी यांना ४ हजार ३२९ मते पडली. नान्नज गणातील ‘भाजपा’चे सुनील दगडू भोसले यांनी ३ हजार ९९८ इतकी मते घेवून विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रकाश चोरेकर यांना ३ हजार ७५० इतकी मते मिळाली.

दारफळ बीबी गटात ‘भाजपा’चे जिल्हा कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी ‘राष्ट्रवादी’चे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे यांचा ४ हजार ३६३ इतक्या मतांनी दारुण पराभव केला. इंद्रजित पवार यांना ११ हजार २७४ मते तर बळीराम काका साठे यांना ६ हजार ९११ मते मिळाली. बळीरामकाका साठे यांचा पहिल्यांदाच पराभव झाल्याने त्यांच्या समर्थकांतून खंत व्यक्त करण्यात येत आहे.

मार्डी गणातून ‘भाजपा’च्या तेजस्विनी बोराडे यांनी ५ हजार ३३७ मते घेवून विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या काजल जगताप यांना २ हजार ९२३ मते मिळाली. दारफळ बीबी गणातून ‘भाजपा’च्या सुनीता बारसकर यांनी सर्वाधिक ५ हजार ०७२ मते मिळवित विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीचे (शप) पूनम उर्फ अंबिका लामकाने यांना ३ हजार ५८२ इतकी मते मिळाली.

कोंडी गटातून माजी आमदार दिलीप माने यांचे चिरंजीव तथा ‘भाजपा’चे उमेदवार पृथ्वीराज माने यांनी १० हजार ९४८ मते मिळवित विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे भारत जाधव यांना ५ हजार ३२६ मतांवर समाधान मानावे लागले. कोंडी गणातून शिवसेनेचे (शिंदे गट) धनाजी भोसले यांनी ३ हजार २५३ इतके मतदान मिळवून विजयश्री मिळविली. त्यांचे प्रतिस्पर्धी ‘भाजपा’चे रवींद्र शिंदे यांनी २ हजार ६५२ इतकी मते मिळविली.तिऱ्हे गणातून ‘भाजपा’च्या ऋतुजा महेश बंडगर यांनी ५ हजार २३० मते मिळवून निवडणूक जिंकली. त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या सुरेखा पाटील यांना २ हजार ६७४ इतकी मते मिळाली.

### तिसऱ्या पिढीची जोरदार इंट्री

कोंडी गटातून बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांचे चिरंजीव पृथ्वीराज माने यांनी विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी तथा चुलत मामा असलेले काँग्रेसचे उमेदवार भारत जाधव यांचा पराभव केला. पृथ्वीराज माने यांना १० हजार ९४८ मते तर भारत जाधव यांना ५ हजार ३२६ मते मिळाली. पृथ्वीराज माने यांच्या माध्यमातून माने परिवारातील तिसऱ्या पिढीची राजकारणात जोरदार इंट्री झाल्याचे दिसून आले.

### तेव्हा पवार, आता साठे

उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ गटातून भारतीय जनता पार्टीचे जिल्हा कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे यांचा ४ हजार ९६१ मतांनी पराभव करुन विजय संपादन केला. साठे हे सातव्यांदा निवडणुकीला सामोरे गेले होते. २००८ मध्ये झालेल्या निवडणुकीतही त्यांचा सामना भाजपाचे इंद्रजीत पवार यांच्यासोबत झाला होता. त्यावेळी पवार यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते.

# सांगोला : ‘महायुती’ ४ तर तालुका विकास आघाडीकडे ३ गट

## पंचायत समितीवर विकास आघाडीचे वर्चस्व

**सांगोला,दि.९ फेब्रुवारी -**

सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ७ गटांपैकी ‘महायुती’कडे ४ तर सांगोला तालुका विकास आघाडीकडे ३ गट आल्याचे निकालाअंती स्पष्ट झाले. पंचायत समितीच्या एकूण १४ पैकी ९ जागा पदरात पाडून घेत सांगोला तालुका विकास आघाडीने वर्चस्व मिळवले. ‘महायुती’ने पंचायत समितीच्या ५ जागांवर विजय संपादन केले.

महायुतीमध्ये शिवसेना, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) यांचा तर सांगोला तालुका विकास आघाडीमध्ये शेतकरी कामगार पक्ष, दिपकआबा साळुंखे पाटील गट, राष्ट्रीय समाज पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांचा समावेश होता. गटनिहाय विजयी उमेदवार, पक्ष याप्रमाणे; महुद बू : दादासो भगवान लवटे, जवळा : अतुल प्रभाकर पवार, कडलास : शोभा बाबासो खटकाळे, चोपडी : चेतनसिंह तात्यासाहेब केदार (सर्वजण महायुतीचे उमेदवार) एखतपूर : सिंधुताई मोहन आलदर, कोळा : केराप्पा महादेव पांढरे, घेरडी : संगीता सोमा मोटे (सर्वजण सांगोला तालुका विकास आघाडीचे उमेदवार). गणनिहाय विजयी उमेदवार, पक्ष याप्रमाणे; वाकी शिवणे : स्मिता दीपक गोडसे, एखतपूर : सुवर्णा संजय नवले, वाढेगाव : वंदना भारत शेळके, जवळा : पुनम सुदर्शन इंगवले, अजनाळे : बापू अशोक जावीर, कोळा : छाया सोपान कोळेकर, हातीद : अमृत नारायण पाटील, सोणंद : काजल मुकेश काशीद, घेरडी : अशोक नामदेव चोरमुले (सर्वजण सांगोला तालुका विकास आघाडीचे उमेदवार), महूद : सोनाली उमेश पाटील, चिकमहुद : बाळासाहेब मच्छिंद्र बंडगर, कडलास : राणीताई सुरज पाटील, राजुरी : सदाशिव मारुती दबडे, चोपडी : अजय उत्तम सरगर (सर्वजण महायुतीचे उमेदवार).



# बार्शी : आ.सोपल यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय आघाडीला ‘भाजपा’कडून ‘व्हाईट वॉश’

## जि.प.च्या सहा तर पं.स.च्या बारा जागांवर निर्विवाद वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.९ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखाली ‘भाजपा’ने विद्यमान आमदार दिलीप सोपल यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय आघाडीला या नेतृत्वाखाली राजकीयदृष्टया ‘व्हाईट वॉश’ दिला आहे. जिल्हा परिषदेच्या ६ पैकी ६ आणि पंचायत समितीच्या १२ पैकी १२ जागांवर ‘भाजपा’ने विजय मिळविला. जि.प.गट व पं.स.गणातील सर्वच विजयी उमेदवारांनी विक्रमी मताधिक्य घेतल्याने यंदाचा विजय रेकॉर्ड ब्रेक ठरला आहे. आ.दिलीप सोपल यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाआघाडीला भोपळाही फोडता आला नाही. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी सलग पाचव्यांदा सत्ता मिळवून ग्रामीण भागावरील वर्चस्व कायम ठेवत आपणच खऱ्या अर्थाने राजा असल्याचे दाखवून दिले आहे.

उपळाई रोडवरील शासकीय धान्य गोदाम येथे निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी एफ.आर. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी करण्यात आली. उपळाई जि.प.गटातून भाजपाचे दीपक वैद्य यांनी १७ हजार ५५६ मते घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर वैद्य यांचा ९ हजार ९८४ मतांनी पराभव केला. उपळाई ठोंगे गणातील दुरंगी लढतीत भाजपाच्या मीनाक्षी रोंगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कावेरीबाई धस यांचा ४८३७ मतांनी पराभव करुन उपळाई पं.स. राखली. आगळगाव गणात भाजपाच्या सुरेखा मुंढे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार संगीता गिराम यांचा ३९०९ मतांनी पराभव केला. मागील निवडणूकीत मुंढे यांचा पराभव झाला होता.

पांगरी जिल्हा परिषद गटाची निवडणूक ही नेहमी अटीतटीची होत असते. मात्र यंदा याठिकाणी ही भाजप वनवे जिंकली. जि.प.मध्ये भाजपच्या रेश्मा डोके १७ हजार ९१३ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मीना विधाते ७ हजार ८८४ यांचा १० हजार ०२९ अशा विक्रमी मतांनी पराभव करुन राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यातून हा गट खेचून आणण्यात यश मिळविले. पांगरी पं.स. गणात भाजपचे शरद बसवंत ८ हजार ०९१ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार शिवाजी गायकवाड ३ हजार ८०७ यांचा ४२८४ मतांनी पराभव करुन भाजपला एकतर्फी विजय मिळवून दिला. या गणातील अपक्ष उमेदवारानी किरकोळ मते घेतली.

कारी गणामध्ये भाजपचे किरण घुले ९ हजार २०३ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे योगेश मुंढे ४ हजार १५७ यांचा ५ हजार ०४६ मतांनी पराभव केला. या गणामध्ये फक्त खामगांवमध्येच राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला ७० मतांची आघाडी मिळाली. उपळे दुमाला जि.प. गटामध्ये विद्यमान जिल्हा परिषद सदस्य व भाजपाचे तालुकाध्यक्ष मदन दराडे यांच्या पत्नी आणि भालगावच्या सरपंच भारती दराडे १५ हजार ५२५ यांनी शिंदेसेनेच्या मनीषा जाधवर ८ हजार ३६० यांचा ७१६५ मतांनी पराभव करत भाजपच्या ताब्यात असलेला गट मागील वेळेपेक्षा जास्त मताने जिकण्यात यश मिळविले.

उपळे दुमाला गणामध्ये भाजपाच्या उमेदवार ऐश्वर्या महानवर यांनी शिंदेसेनेच्या गोकर्णा शिरगिरे ३ हजार ३५५ यांचा ४ हजार ३७४ एवढ्या मोठ्या फरकाने पराभव करत विजय मिळवला. गौडगांव गणामध्ये भाजपचे उमेदवार संजय भड ७ हजार ८८० यांनी शिंदेसेनेचे विजय यादव ४ हजार ६६० या गावातीलच उमेदवाराचा ३ हजार २२० मतांनी पराभव करत विरोधी पक्षाच्या ताब्यातील गण हिसकावून घेतला. या ठिकाणी मागील वेळी सोपल गटाच्या कविता चव्हाण सदस्य होत्या. पानगांव जि.प.मध्ये भाजपचे उमेदवार पानगावचे विद्यमान उपसरपंच नंदकुमार काळे १६ हजार ५९७ यांनी शिंदे सेनेचे सुधीर काळे ६ हजार ८९९ यांचा ९ हजार ६९८ मतांनी पराभव केला. विशेष म्हणजे दोन्ही उमेदवार एकाच गावातील अन भावकीतील होते. सुधीर काळे यांच्या पत्नी विद्यादेवी काळे या विद्यमान पंचायत समिती सदस्य होत्या.

बावी पं.स. गणात झालेल्या दुरंगी लढतीत भाजपचे उमेदवार राजेंद्र सुरवसे ८ हजार १६१ यांनी शिंदे सेनेचे उमेदवार माहिति अधिकार व्याख्याते शिवाजी पवार ३ हजार ४५१ यांचा ४ हजार ७१० अशा मोठ्या फरकाने पराभव करुन यश मिळविले. शिवाजी पवार यांना त्याचे गाव असलेल्या मळेगावातही लीड घेता आला नाही. सुरवसे यांनी त्यांच्या सौंदरे गावात १ हजार पेक्षा जास्त मताधिक्य मिळाले. पानगांव गणामध्येही चार उमेदवार असले तरी लढत दुरंगी झाली. यात भाजपाच्या भीमा गव्हाणे ७ हजार ९५८ यांनी शिंदे सेनेचे वैभव पाटील ३ हजार ६४९ यांचा ४ हजार ३०९ मतांनी पराभव करुन गण ताब्यात ठेवण्यात यश मिळवले. दोन्ही उमेदवार एकाच गावातील होते.

मालवंडी जि.प.गटात झालेल्या दुरंगी लढतीत भाजपच्या सुजाता डोईफोडे १६ हजार ७६४ यांनी उद्धव सेनेच्या माधुरी काकडे ६ हजार ५८९ यांचा १० हजार १७५ एवढ्या फरकाने पराभव करत सोपल गटाच्या ताब्यात असलेला हा गट हिसकावून घेतला. माधुरी काकडे या उद्धव सेनेचे तालुकाप्रमुख प्रवीण काकडे यांच्या पत्नी असून सोपल यांनी उद्धव सेनेला सोडलेला हा तालुक्यातील एकमेव गट होता. विद्यमान जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत थोरात यांनी भाजपमध्ये केलेल्या प्रवेशाचा ही राऊत गटाला फायदा झाला.

मालवंडी पं.स. गणात झालेल्या पंचरंगी लढतीत भाजपाच्या उमेदवार विमल काटे ८ हजार ७२४ राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार पल्लवी डोईफोडे ३ हजार २४९ यांचा ५ हजार ४७५ अशा विक्रमी मताने पराभव केला. सासुरे गणात भाजपाचे उमेदवार, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संतोष निंबाळकर ८ हजार १३५ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे रामकृष्ण लोखंडे ३ हजार ०७३ मते घेत ५ हजार ०६२ मतांनी पराभव केला. मागील वेळी या गणात भाजपचा उमेदवार ४८ मताने पराभूत झाल्याने बहुमत नसताना कविता वाघमारे यांना सभापती पदाची संधी मिळाली होती.

तालुक्यातील शेवटचा व नव्याने तयार झालेल्या शेळगाव आर जि.प.गटामध्ये भाजपच्या उमेदवार सोनाली बोधले १४ हजार २०७ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तनुजा अडसूळ ८ हजार ७१० मते मिळाली. ५ हजार ४९७ मताने पराभव करुन विरोधी सोपल गटाच्या ताब्यात असलेला हा गट खेचून आणला. या गटातील शेळगाव आर गणामध्ये भाजपच्या सविता साबळे ७ हजार ५१८ यांनी पंचायत समितीच्या माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार कविता वाघमारे ४ हजार ३२९ यांचा ३ हजार १८९ मताच्या फरकाने पराभव केला. नव्याने झालेल्या मानेगाव पं.स. गणात भाजपाच्या उमेदवार जयमाला जाधव ६ हजार ६८७ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उर्मिला काशीद ४ हजार ०६९ मिळाली. २६१८ मताने पराभव केला. मागील वेळी या गणातून माजी सभापती अनिल डिसले हे केवळ ३१ मतांनी विजयी झाले होते.

### ‘शिवसृष्टी’ येथे मिरवणुकीचे झाले सभेत रुपांतर

आजच्या निकालाविषयी बोलताना माजी आमदार राजेंद्र राऊत म्हणाले की, हा माझा विजय नसून बार्शी तालुक्यातील जनतेचा आहे. त्यांच्या विश्वासास पात्र राहून तालुक्याचा विकास करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणार आहे. दरम्यान, शासकीय गोडावूनपासून विजयी मिरवणूक काढण्यात आली. शिवसृष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन त्याचे सभेत रुपांतर झाले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# १४ हजार कोटींचा पेच ! लाडक्या बहिणीसह शेतकऱ्यांचे हप्ते रखडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

राज्यातील दोन महत्त्वाच्या लोककल्याणकारी योजनांचे हप्ते रखडल्याने वित्त विभागासमोर तब्बल १४ हजार कोटी रुपयांचा पेच निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणि शेतकरी सन्मान निधी योजनेचे कोट्यवधी लाभार्थी गेल्या काही महिन्यांपासून लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर वित्त विभागातील निर्णयप्रक्रिया विस्कळीत झाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे सव्वादोन कोटी महिलांना डिसेंबर २०२५ पासून कोणताही हप्ता मिळालेला नाही. या महिलांचे तीन हप्ते थकले असून, त्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे. दुसरीकडे, राज्यातील ९३ लाख शेतकरी सन्मान निधी योजनेच्या आठव्या व नवव्या हप्त्याच्या प्रतीक्षेत आहेत. या दोन्ही योजनांचे थकित हप्ते वितरित करण्यासाठी एकूण १४ हजार कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून, अद्याप वित्त विभागाकडून त्यास मंजुरी मिळालेली नाही.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची पडताळणी अंतिम टप्प्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार, सध्या लाभ घेणाऱ्या महिलांपैकी सुमारे



दीड कोटी महिला निकषांनुसार पात्र ठरतील. पडताळणीनंतर दरमहा सुमारे १,६३५ कोटी रुपये, म्हणजेच वर्षाला १९ हजार ६२० कोटी रुपयांची बचत होऊ शकते, असा अधिकाऱ्यांचा अंदाज आहे.

शेतकरी सन्मान निधीबाबत, केंद्र सरकारकडून प्रत्येकी २ हजार रुपयांचा २२ वा हप्ता फेब्रुवारीअखेर वितरित होण्याची शक्यता आहे. त्यानंतर राज्य सरकारकडून प्रत्येकी ४ हजार रुपयांचे दोन हप्ते (आठवा व नववा) मिळण्याची अपेक्षा आहे. 'ॲग्रीस्टॅक' प्रणालीद्वारे लाभार्थी शेतकऱ्यांची पडताळणी पूर्ण झाली असून, त्यानुसार ९१ लाख १६ हजार शेतकऱ्यांना केंद्राचा २२ वा हप्ता मिळणार आहे. याच शेतकऱ्यांना राज्याचे थकित हप्तेही दिले जातील, अशी माहिती कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, १ एप्रिल २०२६ पासून लाडकी बहीण योजनेत केवळ पात्र महिलांनाच दरमहा १५०० रुपयांचा नियमित लाभ मिळणार आहे. १ जुलै २०२४ रोजी सुरू झालेल्या या योजनेत ५० लाखांहून अधिक अपात्र महिलांनी अर्ज केल्याचे पडताळणीतून समोर आले आहे. यात चारचाकी वाहनधारक, सरकारी नोकरदार कुटुंबातील महिला, वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त असणाऱ्या, तसेच वयोमर्यादा ओलांडलेल्या महिलांचा समावेश आहे. लाडकी बहीण योजनेतील प्रत्येक लाभार्थीसाठी ई-केवायसी बंधनकारक असून, त्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पात्र महिलांना पुढील काळात लाभ नियमित मिळेल, मात्र अपात्र महिलांचा लाभ बंद केला जाईल, अशी माहिती जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले यांनी दिली.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १३५२

**करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ ।**
**खापरा परीस काय करी ।।**

कांही लोकांचे स्वभाव अत्यंत दुष्ट, वाईट, हेकेखोर असतात. अशा दुष्ट स्वभावाचे लोक, त्यांचे वर्तन समाजाच्या दृष्टीने हितावह नसते. समाजहित साधले जावे व यांनाही माणूस म्हणून जगता यावे म्हणून कोणी अनुभवी लोकांनी यांना मार्गदर्शन केले, समजावून सांगीतले तरी हे लोक आपला स्वभाव बदलत नाहीत. प्रयत्नाअंती कांही लोक सुधारतातही. पण कांही लोक सुधारण्याच्या पलीकडे गेलेले असतात. समोरच्याला बरे वाटावे म्हणून तेवढ्यापुरते हो म्हणतात आणि पुन्हा परत पूर्वीप्रमाणे म्हणजेच त्यांच्या इच्छेप्रमाणे वर्तन करतात. निसर्गानेही कांही जीव, वस्तू अशा निर्माण केल्या आहेत की, ज्यात आपण इच्छा असूनही बदल करू शकत नाही.



उदाहरणादाखलच बोलायचे झाले तर कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच असते. मानवाला निसर्गाने वाकडे निर्माण केले नाही तरी माणूस कुत्र्याच्या शेपटाप्रमाणे स्वार्थ, अहंकारापोटी वाकडा वागतो. कुत्र्याचे शेपूट जसे सरळ करणे शक्य नाही त्याप्रमाणे स्वार्थी, अहंकारी, हेकेखोर लोकांचा वाकडा स्वभाव, वाकडे वर्तन सरळ करणे शक्य नसते. लोखंडाचे परीसाच्या स्पर्शाने सोने होणे शक्य आहे. पण खापराचे सोने होणे शक्य नाही. त्याप्रमाणे शेवटी मातीत जाणाऱ्या पण स्वत:ला स्वार्थ, अहंकार, अभिमानाने परीपूर्णत: आतून परिपक्व करून घेतलेल्या मानवी खापराला सज्जनरुपी परीसाचा स्पर्श झाला तरी त्यांचे मानवतारुपी सोने होत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, करितां नव्हे नीट श्वानाचें हे पुच्छ । खापरा परीस काय करी ।।

हिंस्त्र असणारे सिंह, वाघ, अस्वल, बलशाली असणारे हत्ती, घोडे आदी प्राणी मानवाच्या शिकवण्याप्रमाणे वागतात. पण माणूस माणसाच्या शिकवण्याप्रमाणे वागत नाही. म्हणून अशांना माणूस तर सोडाच पण जनावर म्हणणेही चुकीचे होईल. कारण जनावरेही माणसाचे ऐकत असतात. माणसाच्या सुचनेप्रमाणे वागत असतात. अत्यंत चंचल असणारे माकडसुध्दा माणसाच्या शिकवल्याप्रमाणे वागते. म्हणून समजावून, शिकवूनही जर एखादा व्यक्ति ऐकत नसेल तर त्याला जनावर, माकड म्हणणे म्हणजे माकड, जनावर या शब्दांचा अवमान आहे. अशा मुर्ख लोकांचा सहवास लाभला म्हणजे आपल्या मुखातून माणसांपरीस मेंढर बरी हे वाक्य बाहेर पडले तर चुकीचे नाही. असे लोक आपला स्वभाव, वर्तन, बदलतच नाहीत म्हणून त्यांना मार्गदर्शनच करायचे नाही, असे मात्र नाही. आपण आपले कार्य करीत राहावे, त्याला जे करायचे ते करू द्यावे, आपण मात्र सांगत रहावे. कारण तो ऐकत नाही म्हणून आपण मार्गदर्शन सोडणे म्हणजे ही त्याची हार नव्हे तर ही आपली हार होईल.

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष. अष्टमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- विशाखा (०७.५४)**
**योग - वृध्दि (२५.४१)**
**करण - तैतिल (२०.४२)**
**राहू काल : मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष :**
**जागतिक डाळी दिवस: डाळींच्या पोषणात्मक महत्त्वाविषयी जागृती करण्यासाठी, तशवर्षी प्रमाणे हा दिवस साजरा होतो**
**पुणे विद्यापीठाची स्थापना (१९४८): शिक्षणाच्या क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल,**
Dinvishesh **नुसार २.**
**स्वातंत्र्यवीर सावरकरांची निर्दोष सुटका (१९४९): महात्मा गांधी हत्येचा खटला चालवल्यानंतर सावरकर दोषमुक्त झाले.**

## कबरीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या चिमुकल्यावर काळाचा घाला

### पाच मुलींनंतर जन्मलेला एकुलता एक मुलगा होता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

मुस्लीम स्मशानभूमीत आजोबांच्या कबरीचे दर्शन घेण्यासाठी गेलेल्या सहा वर्षीय चिमुकल्यावर अक्कलकोट तालुक्यातील बासलेगाव रोड परिसरात काळाने घाला घातला. स्मशानभूमीच्या प्रवेशद्वारावरील तुटलेले व जीर्ण अवस्थेतील लोखंडी गेट अचानक अंगावर कोसळल्याने अलफैज युसूफ पठाण वय ६ या निष्पाप बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अलफैज हा घराजवळ असलेल्या मुस्लीम स्मशानभूमीत आपल्या आजोबांच्या कबरीचे दर्शन घेण्यासाठी गेला होता. दर्शन करून परत येत असताना प्रवेशद्वारावरील जीर्ण व सैल अवस्थेतील लोखंडी गेट अचानक त्याच्या अंगावर कोसळले. या अपघातात अलफैज गंभीर जखमी झाला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेऊन त्याला जवळील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अलफैजला मृत घोषित करण्यात आले. या घटनेमुळे पठाण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष बाब म्हणजे अलफैजचे वडील युसूफ पठाण हे एका हॉटेलमध्ये मजुरीचे काम करतात. पाच मुलींनंतर जन्मलेला अलफैज हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. संपूर्ण कुटुंब, नातेवाईक व परिसरातील नागरिकांचा तो लाडका होता.

सार्वजनिक ठिकाणी असलेल्या स्मशानभूमीच्या सुरक्षेबाबत प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. अलफैजच्या पश्चात आई-वडील व पाच बहिणी असा परिवार असून, गरीब कुटुंबावर ओढवलेल्या या संकटानंतर प्रशासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

## संबंधित झोनल अधिकारी, सहाय्यक व वाहनचालक दोषी : उपजिल्हाधिकारी देशमुख

### ढाब्यावर ईव्हीएम सापडल्याप्रकरणी वाहनचालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी**

मोहोळ तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पुनर्मतदानानंतर सोलापूर-पुणे महामार्गावरील मोहोळ शहराजवळील नवी स्वराज ढाब्यावर दोन ईव्हीएम मशिन आढळून आल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणात झोनल अधिकारी, त्यांचे सहाय्यक व संबंधित वाहनचालक दोषी असल्याची प्राथमिक माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली आहे.

या घटनेबाबत उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, ईव्हीएमची सुरक्षितता ही प्रशासनाची जबाबदारी आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून निष्काळजीपणा झाला असून प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. झोनल अधिकाऱ्यांकडे पर्यायी मशिन म्हणून दोन राखीव ईव्हीएम देण्यात आलेल्या असतात. चालकाच्या हलगर्जीपणामुळे आणि अधिकाऱ्यांमधील संवादाच्या अभावामुळे या मशिन वाहनातून उतरवण्याचे विसरले गेले. या मशिनवर कोणतेही मतदान झालेले नसून त्या पूर्णपणे रिकाम्या व राखीव होत्या, असे त्यांनी स्पष्ट केले.

**झोनल अधिकारी, त्यांचे सहाय्यक आणि संबंधित वाहनचालक दोषी**

ईव्हीएमची काळजी घेणं, हे आमचं कर्तव्य आहे. आमच्या अधिकाऱ्यांकडून चूक झालेली आहे. आम्ही या प्रकरणाची चौकशी करत आहोत. संबंधित अधिकाऱ्यांचे स्टेटमेंट रेकॉर्ड करत आहोत. वस्तुस्थिती काय आहे, याची स्थानिक अधिकाऱ्यांकडून माहिती घेत आहोत. संबंधित अधिकाऱ्यांचे खुलासे घेतलेले आहेत. संबंधित प्रकरणाचा पंचनामा करण्यात आलेला आहे. वाहनचालकाने हलगर्जीपणा केला असे आम्हाला वाटतंय, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. या प्रकरणात झोनल अधिकारी, त्यांचे सहाय्यक आणि संबंधित वाहनचालक दोषी आहेत.

**- संतोषकुमार देशमुख, उपजिल्हाधिकारी**



दरम्यान, निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी सांगितले की, या घटनेचा सविस्तर अहवाल तत्काळ निवडणूक आयोगाकडे पाठवण्यात आला आहे. झोनल अधिकारी, त्यांचे सहकारी व वाहनचालक यांची चौकशी सुरू असून दोषींवर लवकरच कारवाई करण्यात येईल. शनिवार (दि. ७) रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास ईव्हीएम घेऊन जाणाऱ्या वाहनचालक दिनेश संजय भांगे (रा. मोहोळ) याने क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय स्ट्रॉंगरूममधून वाहन बाहेर काढल्याप्रकरणी मोहोळ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहन तत्काळ परत आणण्याचे आदेश देऊनही चालकाने टाळाटाळ केल्याने जमाव जमा होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला.

घटनास्थळी पोलिस व निवडणूक अधिकाऱ्यांनी पंचनामा करून ईव्हीएम सर्वांच्या उपस्थितीत सीलबंद केल्या. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## श्री दत्त स्वामी समर्थ मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त गुरुचरित्र पारायण सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

श्री महालक्ष्मी सिद्धपीठ मंदिर राघवेंद्र नगर व राम नारायण चंडक विहार, शिव बसव चौक, सैफुल सोलापूर येथे औदुंबर कल्पवृक्षाच्या छायेत श्री दत्त स्वामी समर्थ मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया पुरस्कार प्राप्त दत्तगवई संगीतविशारद श्री ज्ञानमाऊली यांच्या सुमधुर वाणीतून श्री दत्तसांप्रदायातील कामधेनु म्हणजे श्री गुरुचरित्र या दिव्य ग्रंथाचे गायन आधारे पारायण सप्ताह होणार आहे, अशी माहिती ज्ञानेश्वर माऊली यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सुस्वर दिव्य वाणी आणि मंगलमय सानिध्यात १४ ते २० फेब्रुवारी दरम्यान संगीतमय गुरुचरित्र गायनाचा पारायण सप्ताह होणार आहे. माघ शुक्ल तृतीया शुक्रवार दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजल्यापासून वैदिक पद्धतीने विश्वकर्मा मंदिर निर्माण स्थापत्य शास्त्रानुसार अक्कलकोट संचलित श्री प्रसाद पंडित गुरुजींच्या मार्गदर्शनातून श्री दत्त स्वामी मूर्तीची प्रतिष्ठापना व इतर पूजा विधी संपन्न होणार आहेत.पूजा विधि नंतर सर्व भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळणार आहे. त्याच सोहळ्याचे औचित्य साधून शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी पासून संगीतमय गुरुचरित्र पारायणास सुरुवात होणार आहे. दररोज सकाळी सात ते अकरा या वेळेत संगीतमय पारायण होणार आहे. या पत्रकार परिषदेस भानुदास सूर्यवंशी, हनुमंत मोतीबने, सुरेश बिराजदार, प्रसाद पंडित आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र साहित्य परिषद निवडणूक

### साहित्य परिषद ही विद्यमान कार्यकारिणीची मक्तेदारी नाही

विद्यमान अनधिकृत कार्यकारिणी सदस्य साम, दाम, दंड, भेद, अपप्रचार, गुन्हेगारी, दडपशाही, गैरव्यवहार, बेकायदेशीर कारवाया करून महाराष्ट्र साहित्य परिषद कार्यकारिणी सत्ता टिकवण्याचे उद्योग विद्यमान कार्यकारिणी सदस्य विनोद कुलकर्णी व मिलिंद जोशी व अन्य सदस्य करत आहेत. याचा आम्ही तीव्र निषेध करतो. विनोद कुलकर्णी आणि मिलिंद जोशी साहित्य संमेलन व्यासपीठावरून मुख्यमंत्र्यांना धमकी देतात, साहित्य परिषद करीत हस्तक्षेत करू नका असा आदेश देतात. विनोद कुलकर्णी व त्यांचे प्रतिनिधी निवडणुकीतील विरोधी उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज भरू नका असे प्रयत्न करून निवडणूक बिनविरोध करून येथील आपली बेकायदेशीर सत्ता कायम राहील असा प्रयत्न करतात.

महाराष्ट्र साहित्य परिषदेची इमारत आपल्या निवडणूक पॅनेलचे, निवडणूक कार्यालय असल्या सारखे त्याचा उपयोग करत आहेत साहित्य परिषदेचा ताबा निवडणूक न घेता गेली पाच वर्ष ठेवला आहे. न्यायालयात महाराष्ट्र साहित्य परिषद कार्यकारिणी विरोधातील याचिकांचे निकालाच लागू नयेत यासाठी सर्व न्यायालयीन हातखंडे वापरणे व आपली बेकायदेशीर सत्ता कायम राहील याचा प्रयत्न करणे. १०० वे अखिल भारतीय साहित्य संमेलनात प्रमुख जबाबदारी देऊ, मानसन्मान देऊ अशी लालुच दाखवणे. साहित्य परिषदेचा पुरस्काराचे आमिष साहित्यिकांना दाखवून एक दबावाचे राजकारण करणे.

अनाधिकाराने संस्थेची घटना दुरुस्ती करणे सामान्य मराठी साहित्य प्रेमी संस्थेचे सभासद होता येणार नाही या साठी सभासद शुल्क वाढ करणे गेली पाच वर्षे सामान्य मराठी साहित्य प्रेमींची सभासद नोंदणी बंद, पण आपल्या परिचयातील, नात्यातील काही लोकांना सदस्य करून घेणे. धर्मादाय आयुक्त कार्यालय मान्यता नसलेल्या घटना दुरुस्ती आधारे संस्थेच्या निवडणुका घोषित करणे. निवडणुकी साठी उपयोगात आणलेल्या मतदार याद्या जाणीवपूर्वक सदोष ठेवणे. दुबार मतदार, मृत मतदार, पत्ते बदललेले मतदार आहेत अशी संख्या एकूण मतदारांच्या ३० टक्के आहे. आता विरोधी आघाडी उमेदवारांचा खासगी बैठकीचे चित्रण सार्वजनिक करणे, हेत्या आरोप करणे हा विद्यमान कार्यकारिणीच्या निवडणूक राजकारणाचा भाग आहे.

विद्यमान कार्यकारिणीची भूमिका, ना मुख्यमंत्री, ना सामान्य मराठी प्रेमी जनता, ना न्यायालय, ना विरोधी उमेदवार, ना सामान्य नागरीक, ना सामान्य आजीव सभासद महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यात सहभागी होऊ नये. परिवर्तच पॅनेलच्या जाहीरनाम्यात दिलेली आश्वासन पूर्ण करण्यासाठी या अनधिकृत कार्यकारिणीने गेली १० वर्षात काही का केले नाही? कृती समितीच्या पदाधिकारी यांना बदनामीची कायदेशीर सूचना पाठवणे हा सुध्दा या कार्यकारिणीच्या दबाव तंत्राचा भाग आहे. मूळ हे पदाधिकारी आपल्या पद संवरक्षणा साठी करत आहेत. परिणामी विद्यमान अनधिकृत कार्यकारिणी व परिवर्तन पॅमेल सर्व बेकायदेशीर व दबाव तंत्र वापरून महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ७/१२ आपल्या नावावर करून घेत आहे याच्या विरुद्ध कृती समिती सर्व स्तरावर संघर्ष करेल तो आम्ही गेली दोन वर्ष करीत आहोत. शशांक महाजन निमंत्रक

**- धनंजय कुलकर्णी, कार्याध्यक्ष**
महाराष्ट्र साहित्य परिषद
संरक्षण कृती समिती, पुणे

## हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे दुहेरी यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

साखर पेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी दुहेरी यश प्राप्त केले आहे. राजीव गांधी इनडोर स्टेडियम येथे जपान कराटे डू शूडोकॉन महाराष्ट्र राज्य व सोलापूर यांच्या वतीने खछ्ड महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत हिंगुलांबिका प्राथमिक शाळेची इयत्ता पहिलीची विद्यार्थिनी कुमारी ऋतुजा वीरेंद्र वेदपाठक हिने गोल्ड मेडल प्राप्त केले आहे. त्याचबरोबर ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी



यांच्या पुण्यतिथीनिमित्त निहाल काशिनाथ किरनळ्ळी यांच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता चौथीची कुमारी अनन्या अंबादास अंकम या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविले आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री बापू ढगे व सचिव श्री विजय पुकाळे यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी माध्यमिकचे मुख्याध्यापक श्री गोपी नवले व प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री प्रमोद हंचाटे उपस्थित होते.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

सोलापूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल शाळेत आज दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी भव्य निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा समारंभ शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या रेखा पाटील आणि प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार गायकवाड यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर शाळेची प्रार्थना, स्वागतगीत तसेच शिक्षकांनी सादर केलेले मनमोहक नृत्य सादरीकरण झाले.

स्वागत भाषणात मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक कामगिरीचे कौतुक केले. शिस्त, आत्मविश्वास आणि समर्पण ही यशाची त्रिसूत्री असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात कठोर परिश्रम करण्याचा सल्ला दिला.

प्रमुख पाहुणे राजकुमार गायकवाड यांनी प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीवनातील आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्याचे आणि ध्येयांवर एकाग्र राहण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी त्यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता व सांस्कृतिक उपक्रमांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते, नाट्यछटा व भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील अनुभव कथन करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देत आगामी बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या, तेव्हा सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले. शाळेच्या समन्वयकांनी आभार मानले.

## 'आयुष्याची शिदोरी': सहज, सोप्या भाषेतील काव्याविष्कार

### डॉ. शिवाजी शिंदे; राजेंद्र दंदे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

कवी राजेंद्र दंदे लिखित 'आयुष्याची शिदोरी' या काव्यसंग्रहात मराठी आणि हिंदी भाषेतील कविता आहेत. या कविता प्रासंगिक, एखाद्या घटना प्रसंगी सुचलेल्या आणि शब्दबद्ध केलेल्या कविता आहेत. मनामध्ये ज्या संवेदना निर्माण झाल्या, जे भाव उमटले त्याचा सहज आणि सोप्या भाषेतील काव्याविष्कार 'आयुष्यातील शिदोरी' या काव्यसंग्रहातून प्रत्ययास येतो. असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी व्यक्त केले.

संगमेश्वर महाविद्यालयात शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणून कार्यरत असणारे राजेंद्र दंदे यांच्या 'आयुष्याची शिदोरी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन समाजकल्याण केंद्र येथे पार पडले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अधिसभा सदस्य अजितकुमार संगवे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून शब्दमुद्रा प्रकाशन, मंगळवेढ्याचे प्रकाशक सुप्रसिद्ध कवी इंद्रजित घुले आणि सिनियर ऑडिटर गोविंद बोन्दर हे





उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. शिंदे म्हणाले, या काव्यसंग्रहात रोजच्या आयुष्यात भेटणाऱ्या छोट्या-छोट्या क्षणांची, भावना आणि अनुभवांची सहज मांडणी आहे. या कवितांमध्ये मोठे तत्त्वज्ञान मांडण्यापेक्षा माणसाच्या मनात सहज उमटणाऱ्या विचार, आठवणी आणि भावनांचे शब्दरूप अधिक जाणवते. या कविता मानवी वृत्ती प्रवृत्ती, नातीगोती, निसर्ग, भावलेली व्यक्तिमत्वे यावर भाष्य करणाऱ्या आहेत. कवी व प्रकाशक इंद्रजित घुले यांनी राजेंद्र दंदे यांच्या कविता आपल्याला भावतात. त्यांनी बोजड, अलंकारिक कविता न लिहिता वाचकाला समजतील, रुचतील अशा भाषेत काव्यरचना केल्या आहेत. त्यामुळे वाचक निश्चित या कविता वाचतील असा अशावाद कवी घुले यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अजितकुमार संगवे अध्यक्षीय भाषण करताना म्हणाले, आमचे प्राशासकीय सहकारी राजेंद्र दंदे हे शिक्षकेत्तर कर्मचारी असून देखील काव्यलेखनाकडे वळले याचा आनंद आहे. रोजच्या दैनंदिन कामातून थोडासा वेळ ते कविता लेखनासाठी देतात हे खरोखरच कौतुकास्पद आहे.त्यांच्या हातून अशाच साहित्यकृतींची निर्मिती होवो यासाठी त्यांनी दंदे यांना शुभेच्छा दिल्या.

कवी राजेंद्र दंदे यांनी आपले भावस्पर्शी मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमास कॉलेज कर्मचारी युनियनचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, अध्यक्ष दत्ता भोसले, कवी डॉ. अरविंद हंगरगेकर, डॉ. राजकुमार पवार, डॉ. भोवाळ, दंदे यांचे नातेवाईक सूर्यभान बळकार, बालाजी पाठक, सुरेश म्हाळगी व कुटुंबीय यांची उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. शिरीष बंडगर यांनी केले. आभार राजेंद्र दंदे यांच्या सुनबाई प्रज्ञा दंदे यांनी मानले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### हरित सोलापूरचा केला संकल्प; उपमहापौर देवकर यांच्या हस्ते वृक्षारोपणाने सुरुवात

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

शहरातील वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि पर्यावरणीय असमतोल लक्षात घेता सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने हरित सोलापूरच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या 'हरित संकल्पना' उपक्रमातून आज वृक्षारोपण करून मोहिमेची सुरुवात करण्यात आली. विविध देशी व पर्यावरणपूरक वृक्षांचे रोपण करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल, नगरसेवक जीवन चाबुकस्वार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगर अभियंता सारिका आकुलवार, उद्यान अधीक्षक स्वप्निल सोलंनकर , पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर यांच्यासह अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी महापौर कै. जनार्दन कारमपुरी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एक झाड लावून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपमहापौर देवकर म्हणाल्या की, आगामी काळात शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती मोहिमा व शाळा-महाविद्यालयांत सहभागात्मक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे सोलापूरच्या पर्यावरण संतुलनास निश्चितच चालना मिळणार आहे. महापौर कोंड्याल यांनी नागरिकांनी वृक्षांचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले.फ




### आ. कोठेंच्या 'देव-यज्ञ' स्थळी महापौर कोंड्याल यांची सदिच्छा भेट

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आमदार देवेन्द्र कोठे यांच्या देव-यज्ञ (संवाद जनतेशी) या ठिकाणी सदिच्छा भेट दिली. नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी यानिमित्ताने सोलापूर मध्यचे आ. देवेन्द्र कोठे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आमदार कोठे यांनी नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. शहरातील नागरी समस्या, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच विकासकामांना गती देण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी महापौरांनी दिली. याप्रसंगी नगरसेवक मेघनाथ येमूल, प्रशांत पल्ली, गुरुशांत धुत्तरगावकर, वासुदेव इपलपल्ली, नागेश खरात,बोजराज माने आदी उपस्थित होते.



### महापौर कोंड्याल यांनी घेतली आ. सुभाष देशमुखांची भेट

**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आज माजी मंत्री व सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांच्या निवासस्थानी जावून सदिच्छा भेट घेतली. यावेळी आमदार देशमुख यांनी नूतन महापौर विनायक कोंड्याल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. महापौरपदाच्या जबाबदारीसाठी त्यांनी शुभेच्छा दिली. या भेटीदरम्यान सोलापूर शहराच्या विकासकामांबाबत, नागरी समस्या, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच आगामी विकासात्मक योजनांवर सकारात्मक चर्चा झाली. महापौर कोंड्याल यांनी शहराच्या हितासाठी सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन काम करण्याची भूमिका व्यक्त केली. याप्रसंगी भाजपा नेते मनिष देशमुख यांनी अन्नपूर्णा योजना सदर्भात महापौर यांना माहिती दिली. यावेळी शहरातील काही नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

# 'दक्षिण'मध्ये भाजपाची एकहाती सत्ता

## १२ पैकी १२ पंचायत समिती सदस्य विजयी; सहापैकी पाच जिल्हा परिषद सदस्य विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

नऊ वर्षांनी झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चुरस पाहायला मिळाले. त्यामुळे दक्षिणमध्ये वाढलेली मतदानाची टक्केवारी कोणासाठी फायदेशीर ठरणार? याविषयी अंदाज व्यक्त करण्यात येत होता. सोमवार ९ फेब्रुवारी रोजी झालेल्या मतमोजणीत भाजपाने दक्षिण पंचायत समितीवर एकहाती सत्ता मिळवली. पंचायत समितीच्या १२ जागांपैकी ११ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिध्द केले. तर सहा जिल्हा परिषद जागांपैकी पाच जागा जिंकल्या. हत्तूर जिल्हा परीषद गट व भंडारकवठे पंचायत समिती गणात शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले. यावेळी अनेक मतदारसंघात चुरशीची लढत पहावयास मिळाली.

मंद्रूप पंचायत समिती गणामधून मळसिध्द मुगळे यांनी विजय मिळवित प्रस्थापित अप्पाराव कोरे यांचा दारूण पराभव केला. सोरेगाव येथील एसआरपी कॅम्प येथे दक्षिणमधील मतमोजणी प्रक्रीया पार पडली.

दक्षिणमध्ये गत निवडणुकीत आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली भाजपने पंचायत समितीवर कमळ फुलविला होता. मात्र यावेळी भाजपमध्ये माजी आमदार दिलीप माने यांनी प्रवेश केल्यामुळे व आमदार सचिन कल्याणशेटी यांचा दक्षिणमध्ये उमेदवारी निवडताना हस्तक्षेप झाल्यामुळे भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला. त्यामुळे हत्तूर मतदारसंघात भाजपाला नाराजीचा फटका बसल्याचे दिसून येते. याठिकाणी शिवसेनेच्या लक्ष्मी पाटील यांनी भाजपाच्या उज्वला हविनाळे यांचा अवघ्या ३४ मतांनी पराभूत केला. उमेदवारी नाकारलेल्या इंदुमती अलगोंडा-पाटील, सुरेश हसापूरे व शिवानंद पाटील यांच्या नाराजीमुळे भाजपच्या उमेदवाराला पराभवाचा सामना करावा लागल्याचे सांगण्यात येते.



बोरामणी जिल्हा परिषद गटातून भाजपचे नेताजी खंडागळे यांनी शिवसेनेच्या धनेश अचलारे यांचा ८४५ मतांनी पराभव केला. २५४५३ मतांपैकी खंडागळे यांना १२०९४ तर अचलारे यांना ११२४९ मते मिळाली. बोरामणी गणात भाजपच्या वर्षा पटणे यांनी शिवसेनेच्या सुनिता चव्हाण यांचा २१४३ मतांनी पराभव केला. पटणे यांना ६३०७ तर ४१६४ मते मिळाली. कासेगाव गणात भाजपचे विजय राठोड यांनी काँग्रेसचे अप्पा धनके यांचा २२९४ मतांनी पराभव केला. या ठिकाणी राठोड यांना ६५२९ तर धनके यांना ४२३५ मते मिळाली.

कुंभारी जिल्हा परिषद गटात भाजपच्या श्रुती भोरगुंडे यांनी काँग्रेसच्या रेणुका इमडे यांचा ४२९५ मतांनी पराभव केला. १८७५२ मतांपैकी भोरगुंडे यांना ९७४४ तर इमडे यांना ५४४९ मते मिळाली. कुंभारी गणात भाजपचे सूरज पाटील शिवसेनेचे रोहीत बिराजदार यांचा १०७९ मतांनी पराभव केला. पाटील यांना ३९७३ तर बिराजदार यांना २८९५ मते मिळाली. धोत्री गणात भाजपच्या शिल्पा बिराजदार यांनी शिवसेनेच्या अरूणा वाघमारे यांचा २०७४ मतांनी पराभव केला. बिराजदार यांना ६३६८ तर वाघमारे यांना २०७४ मते मिळाली.

वळसंग जिल्हा परिषद गटात भाजपचे रामप्पा चिवडशेट्टी यांनी काँग्रेसच्या युन्नुस कांबळे यांचा ७४४३ मतांनी पराभव केला. २४१६१ मतांपैकी चिवडशेट्टी यांना १३१५४ तर कांबळे यांना ५९७५३ मते मिळाली. वळसंग गणात भाजपचे बलवान गोतसुर्वे यांनी शिवसेनेचे दिनकर नारायणकर यांचा ३९३६ मतांनी पराभव केला. गोतसुर्वे यांना



६४४१ तर नारायणकर यांना २५०५ मते मिळाली. होटगी गणात भाजपच्या अंबिका पाटील यांनी काँग्रेसच्या श्रेया पाटील यांचा १२१३ मतांनी पराभव केला. पाटील यांना ६०६५ तर श्रेया पाटील यांना ४८५२ मते मिळाली.

आ. सुभाष देशमुख यांच्यासाठी प्रतिष्ठेची असलेल्या हतुर जिल्हा परिषद गटात मात्र धक्कादायक निकाल लागला असून ही जागा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी ताब्यात ठेवण्यात यश मिळवले आहे. शिवसेनेच्या लक्ष्मीताई पाटील यांनी भाजपच्या उज्वला हविनाळे यांचा अवघ्या ३४ मतांनी पराभव करत शिवसेनेचा बालेकिल्ला ताब्यात ठेवला आहे . २०८५७ मतांपैकी पाटील यांना ८९५१ तर हविनाळे यांना ८९०७ मते मिळाली. हतुर गणात भाजपचे पंचप्पा धनशेट्टी यांनी शिवसेनेचे नरसप्पा दिंडोरे यांचा ७६ मतांनी पराभव केला. धनशेट्टी यांना ३८१४ मते तर दिंडोरे यांना ३७३० मते मिळाली. औराद गणात भाजपचे संदीप टेळे यांनी शिवसेनेचे परमेश्वर शिंदे यांचा १३५३ मतांनी पराभव केला. टेळे यांना ४८१४ तर शिंदे यांना ३४६१ मते मिळाली.

मंद्रूप जिल्हा परिषद गटात भाजपच्या माजी सभापती सोनाली कडते यांनी राष्ट्रवादीच्या प्रीती कोरे यांचा ८५४७ मतांनी पराभव केला. २२४५४ मतांपैकी कडते यांना १३३५० तर कोरे यांना ४८०३ मते मिळाली. मंद्रूप गणात मात्र राष्ट्रवादीचे उमेदवार अप्पाराव कोरे यांचा दारूण पराभव झाले असून भाजपचे मळसिध्द मुगळे यांनी कोरे यांचा ४०३० मतांनी पराभव केला. मुगळे यांना ६९०६ तर कोरे यांना २८७६ मते मिळाली. कंदलगाव गणात भाजपच्या प्रियांका आसबे यांनी काँग्रेसच्या शांताबाई व्हनमाने यांचा ५४७ मतांनी पराभव केला. आसबे यांना ४९७६ तर व्हनमाने यांना ४३६९ मते मिळाली. भंडारकवठे जिल्हा परिषद गटातून भाजपच्या सविता उंबरजे यांनी शिवसेनेच्या जयश्री संगोळगी यांचा ३५६६ मतांनी पराभव केला. १८९४२ मतांपैकी उंबरजे यांना ९६३२ तर संगोळगी यांना ६०६६ मते मिळाली. भंडारकवठे गणाचा निकाल मात्र भाजपसाठी धोकादायक ठरला. याठिकाणी शिवसेनेच्या प्रियांका कुबसंगे यांनी भाजपच्या नेहा कुपसंगे यांचा ५८३ मतांनी पराभव केला. कुबसंगे यांना ५०८० तर कुपसंगे यांना ४४९७ मते मिळाली. निंबर्गी गणात भाजपच्या अंबिका दुपारगुडे यांनी काँग्रेसच्या श्रुती गायगवळी यांचा १४६६ मतांनी पराभव केला. दुपारगुडे यांना ३९७१ तर गायगवळी यांना २५०५ मते मिळाली.

**अदृश्य शक्तीचा पराभव**

पंचायत समिती गणात मळसिध्द मुगळे यांना आमदार कल्याणशेटी गटातून उमेदवारी मिळाली आहे. त्यामुळे त्यांची उमेदवारी आमदार देशमुख गटासाठी डोकेदुखी ठरली होती. मुगळे यांना पराभूत करण्यासाठी आमदार देशमुख गटांच्या कार्यकर्त्यांकडून विरोधात काम केल्याची चर्चा सुरू होती. मात्र भाजपच्या मतदारांनी मुगळे यांना ४०६६ मताधिक्यांनी विजयी करून 'अदृश्य शक्ती'चा पराभव केला आहे.

**भंडारकवठेत स्थानिकचा फटका**

भंडारकवठे पंचायत समिती गणात भाजपच्या नेहा कुपसंगे यांचा शिवसेनेच्या प्रियंका कुबसंगे यांनी पराभव केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी भाजपने या ठिकाणी एकही उमेदवारी न दिल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी होती . त्यामुळे भंडारकठेच्या मतदारांनी स्थानिक उमेदवार प्रियंका कुबसंगे यांना निवडून देऊन नाराजी दाखवून दिली आहे. आमदार देशमुख यांच्यासाठी धक्का मानला जात आहे.

**अंतर्गत गटबाजीचा भाजपाला फटका**

दक्षिण सोलापूर तालुक्यात सर्वत्र भाजपची लाट असताना माजी आमदार दिलीप माने व आमदार सुभाष देशमुख यांच्यातील अंतर्गत गटबाजी मुळे हत्तूर जिल्हा परिषद गट व भंडारकवठे पंचायत समिती गणात पराभूत व्हावे लागले. शिवाय अनेक ठिकाणी अंतर्गत गटबाजी झाल्यामुळे विरोधी उमेदवारांना फायदा झाल्याचे दिसून येते.

### हत्तूरमध्ये नाराजीचा फटका

हत्तूर जिल्हा परिषद गटात इंदुमती अलगोंडा पाटील सुरेश हसापूरे व शिवानंद पाटील यांना उमेदवारी मिळाल्यानंतर आमदार देशमुख गटाने त्यांची उमेदवारी रद्द करून आमदार देशमुख समर्थकांना उमेदवारी दिली. त्यामुळे हत्तूरमध्ये भाजपविरोधात नाराजी होती. माजी आमदार माने गटाच्या इंदुमती अलगोंडा पाटील, सुरेश हसापूरे व शिवानंद पाटील यांनी 'अदृश्य शक्ती' द्वारे भाजपला विरोध करून शिवसेनेला मदत केल्याची चर्चा आहे. त्यामुळे हत्तूरमध्ये भाजपचा पराभव होऊन शिवसेना विजयी झाल्याचे सांगण्यात येते.





## मेहता शाळेत हिमोग्लोबीन व थायरॉईड तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

शिक्षण प्रसारक मंडळी मातृ संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेमध्ये किशोरवयीन मुलींसाठी हिमोग्लोबिन व थायरॉईड तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर, सर्व शिक्षक शिक्षकेतर वृंद उपस्थित होता. हॅलो मेडिकल फाउंडेशन, संपूर्ण आलाईव्स लाईफ सायन्सेस लिमिटेड या प्रकल्पाच्या सुपरवायझर संतोषी सुतार तसेच महा लॅबचे लॅब टेक्निशियन, रामवाडी नागरी आरोग्य केंद्राच्या सिस्टर पूजा राठोड व आशा तसेच संपूर्ण प्रकल्पाच्या सुपरवायझर पल्लवी माने या सर्वांच्या सहकार्याने इयत्ता ६ वी ते ९ वीच्या किशोरवयीन मुलींची मोफत हिमोग्लोबिन व थायरॉईड तपासणी करण्यात आली.

## बार्शीत 'हर घर रमाई' उपक्रमाचा जागर; माता रमाईंची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ९ फेब्रुवारी-**

बार्शी शहरातील नालंदा बुद्ध विहार येथे नालंदा बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीचे औचित्य साधून संस्थेच्यावतीने 'हर घर रमाई, घर घर रमाई' हा अभिनव उपक्रम राबवून समाजासमोर एक नवा आदर्श उभा केला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करुन झाली. त्यानंतर माता रमाई आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पूज्य भंते सुमेधजी नागसेन यांचे प्रमुख सानिध्य लाभले. त्यांनी उपस्थितांना धम्मदेशना



देऊन शुभाशीर्वाद दिले. प्रमुख वक्ते प्रा. जयद्रथ गायकवाड यांनी माता रमाईंच्या त्यागाचा इतिहास मांडला. शासनाच्या 'रमाई आवास योजने'तून घरे मिळतात, पण तिथे माता रमाईंचा फोटो नसतो. ही बाब निदर्शनास आल्यावर संस्थेने हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या ५ ते ६ वर्षांत बार्शी शहर व तालुक्यातील प्रत्येक घरात माता रमाईंची प्रतिमा पोहोचवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. देणगीदारांच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या या प्रतिमांचे यावेळी वाटप करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमासाठी रमेश गवळी, अभिमान वाघमारे (पेंटर), बाबासाहेब वाघमारे, संजय भालेराव, सुरज कांबळे, बाबासाहेब भालेराव, अविनाश काळेगावकर, पांडुरंग शिंदे, मोरे, केदार, अकबर शेख, नागनाथ सोनवणे आणि संजय सरवदे यांनी सहकार्य व प्रतिमा दान केली. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यामध्ये सुशीला बागडे, अनुराधा ओहोळ, चांदणी गवळी, मैनाबाई अंकुशराव, लता कसबे, लता वाघमारे, साधना वाघमारे, सुजाता कदम, अनिता भालेराव, विद्या वाघमारे, वंदना चंदनशिवे, शोभा किरतकर्वे, उल्का चंदनशिवे, नंदा अय्यर, सुमन बोकेफोडे, जयश्री गायकवाड, प्रतिभा भातंबरेकर, कल्पना भातंबरेकर, शांताबाई जानराव, रंजना बोकेफोडे, कविता मस्के, मरीता काकडे व बनसोडे (धाराशीव) आदींचा समावेश होता. कार्यक्रमात शाहीर राजेश ननवरे यांनी माता रमाईंच्या जीवनावर आधारित भीमगीते सादर करून सर्वांची मने जिंकली.

# आता 'प्रभाग चलो अभियान'; आ. देवेंद्र कोठे यांचा नूतन संकल्प

### भाजप पक्ष पदाधिकारी ते बूथ प्रमुखांपर्यंत करणार विकासकामांबाबत संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी ते बुथ प्रमुखांपर्यंतच्या विकासकामांबाबत संवाद साधून, विकासकामांसह इतर समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या हेतूने आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडून शहर मध्य मतदारसंघात 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. प्रभाग चलो अभियानांतर्गत आमदार देवेंद्र कोठे संबंधित प्रभागातील पदाधिकारी ते बूथ प्रमुखांपर्यंत सर्वांशी विकासकामांबाबत संवाद साधणार आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांना आपल्या प्रभागात, बूथ परिसरात पक्षाचे काम करताना येणाऱ्या अडचणी, त्यावरील उपाय, जमेच्या बाजू, पक्षाची भूमिका, पक्ष विस्तारासाठी कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांचे अपेक्षित योगदान आदी विषयांवर आमदार देवेंद्र कोठे चर्चा करणार आहेत. यात प्रभागाचे नगरसेवक, मंडल पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, आजी-माजी नगरसेवक, शहर पदाधिकारी यांचा समावेश आहे.

मंगळवार, १० फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक ९ आणि १० साठीचा 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम पद्मनगर येथील आरकाल गार्डन येथे सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत वाजता होणार आहे. बुधवार, ११ फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक ११ आणि १२ साठीचा 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम नितीन नगर येथील राजमाता गार्डनमध्ये सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत होणार आहे. गुरुवार, १२ फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक १३ आणि १४ साठीचा 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम चिप्पा मार्केट समोरील लोटस मंगल कार्यालयात सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत होणार आहे. शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक १५ आणि १६ साठीचा 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम जुना एम्प्लॉयमेंट चौकातील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयात सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत होणार आहे. बुधवार, १८ फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक १८ आणि २१ साठीचा 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम अंत्रोळीकर नगरातील प्रगती लॉन येथे सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत होणार आहे. शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी प्रभाग क्रमांक २२ आणि २३ साठीचा 'प्रभाग चलो अभियान' कार्यक्रम भैरू वस्ती येथील मातोश्री तराई गार्डन मंगल कार्यालय येथे सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत होणार आहे. या कार्यक्रमांना संबंधित प्रभागातील नगरसेवक, मंडल पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, आजी-माजी नगरसेवक, शहर पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले आहे.



### निवडणुकीनंतर या उपक्रमाचे प्रयोजन काय ?

निवडणूक झाल्यानंतरही आमदार देवेंद्र कोठे हा उपक्रम करत आहेत. कारण पक्षाचे पदाधिकारी निवडणुकीच्यावेळी जनतेपर्यंत जात असतात. जनतेच्या मागण्या काय आहेत याची सविस्तर माहिती या पदाधिकाऱ्यांना असते. पुढील वर्षाच्या निधीमध्ये प्राधान्याने कोणती कामे असावीत, विकासकामे करण्यासठी अडचणी काय आहेत याची माहिती घेण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पक्षाच्या माध्यमातून विकासकामे झाल्यानंतर संबंधित प्रभागातील पदाधिकाऱ्यांचे त्या परिसरात महत्व वाढावे, प्रभागात, बूथ परिसरात सुरू असलेल्या विकासकामांवर बूथप्रमुख स्तरावरील पदाधिकाऱ्यांची देखरेख असावी हा देखील या उपक्रमामागील हेतू आहे.

# सोलापुरातील वातावरण संशोधनास पूरक

### ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड; वालचंद महाविद्यालयात संशोधन चर्चासत्राचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोमवार, दि. ९ फेब्रुवारी-**

सोलापूरची भूमी अनेक संशोधकांची जन्मभूमी असून, सोलापूरला संशोधकांचा वारसा लाभला आहे. सोलापुरातील वातावरण संशोधनास पूरक असून विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटीने संशोधन करावे तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात संशोधन करताना, ग्रंथालयातील पुस्तकांचा वापर करावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत दत्ता गायकवाड यांनी केले.



वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयात पदव्युत्तर विभागाच्या वतीने संशोधन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी भूषविले. या कार्यक्रमाची सुरुवात वृक्षाला जल अर्पण करून करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. चर्चासत्रात अकरा विभागांनी सहभाग घेतला. तसेच एका विभागाकडून प्रत्येकी आठ याप्रमाणे ८८ शोधनिबंध आज सादर करण्यात आले. यासाठी विविध तज्ञ परीक्षकांची नेमणूक करून प्रत्येक विभागातून संशोधन पत्रिकेची निवड करण्यात आली. त्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य मनोहर जोशी, उपप्राचार्य डॉ. शशिकांत हिप्परगी, पदव्युत्तर विभागाचे विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. डॉ. अनिलकुमार कट्टी, कला विभागाचे समन्वयक प्रा. संतोष रेळेकर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. अनिल कट्टी यांनी केले, तर प्रा. होंगल यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ.अर्चना इंजाल तर आभार प्रा. सविता शेरीकर यांनी मानले.



जिल्हा परिषद व पंचायत समितीची

# रणधुमाळी





# आमदार पाटील व भालकेंच्या आघाडीकडून 'दे धक्का'

## भोसे, रोपळे, भाळवणी आणि वाखरीत घड्याळ अन् तुतारीचा गजर तर करकंब,लक्ष्मीटाकळी आणि गोपाळपूर गट भाजपाच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ फेब्रुवारी -**

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या आठ पैकी ४ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे, तिर्थक्षेत्र विकास आघाडीला १ जागा तर अवघ्या ३ जागांवर परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपाच्या उमेदवारांनी विजय मिळविला आहे. दुसरीकडे पंचायत समितीच्या निवडणूकी मध्ये देखील आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने चांगलीच मुसंडी मारत परिचारकांच्या नेतृत्वाखालील तालुक्यातील पंचायत समितीच्या सत्तेला मोठा सुरुंग लावल्याचे निकाला नंतर स्पष्ट झाले आहे.

दरम्यान नगरपालिका तसेच महानगरपालिका निवडणूकीत ज्या प्रमाणे मोठ्या प्रमाणावर क्राँसव्होटिंग झालेले दिसून आले त्याच पध्दतीने तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकी मध्ये अनेक गट आणि गणांमधून क्राँसव्होटिंग झाल्याचे निवडणूक निकाला नंतर समोर आले आहे. या झालेल्या क्राँसव्होटिंगचा फटका देखील अनेक मातब्बर उमेदवारांना बसल्याचे दिसून आले. या बरोबरच निवडणूकीच्या तोंडावर पक्षांतर करुन भाजपाशी घरोबा केलेल्या कल्याणराव काळे, समाधान काळे आणि गणेश पाटील यांना देखील मतदारांनी साफ नाकारल्याचे निवडणूक निकालावरुन दिसून आले. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अभिजीत पाटील आणि विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख नेते भगिरथ भालके यांनी अगदी प्रचार सुरु झाल्या नंतर केलेली युतीची घोषणा मतांचे विभाजन न झाल्यामुळे त्यांच्या दृष्टीने फायद्याची ठरल्याचे दिसून आले.



दरम्यान येथील तहसील कचेरी समोरील शासकीय गोदामा मध्ये सोमवारी (ता.९) दहा वाजता मतमोजणीला प्रारंभ झाला. प्रत्येकी एक गट आणि दोन गणांची अशा प्रकारे १६ टेबलवर आठ गट आणि सोळा गणांची मतमोजणी केली जात होती. यावेळी मतमोजणी नंतर आपआपल्या उमेदवारांच्या विजयश्रीची घोषणा झाल्यानंतर शासकीय गोडाऊन समोरील रेल्वे मैदानावर निकालाच्या प्रतिक्षेत असलेले त्यांचे कार्यकर्ते विजयी उमेदवाराला खांद्यावर घेऊन जल्लोष करीत होते. यावेळी गुलालाची मुक्तउधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी देखील केली जात होती.मतमोजणी नंतर कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तगडा पोलिस बंदोबस्त देखील ठेवण्यात आलेला होता. सकाळ पासूनच शासकीय गोडाऊन कडे जाणारी वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात आलेली होती. त्यामुळे निकाला नंतर शहर आणि तालुक्यात कुठेही अनुचित घटना घडली नसल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान मतमोजणी नंतर तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या करकंब जिल्हा परिषद गटाच्या पहिल्या निकालाने भाजपाने आपले खाते उघडले. करकंब गटातून परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपाच्या आदिनाथ देशमुखांनी विरोधी अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार बाळासाहेब देशमुख यांचा पराभव केला.

तालुक्यातील बऱ्याच वर्षापासून (कै.) यशवंतभाऊ पाटील त्यांचे पुत्र (कै.) राजुबापू पाटील आणि सध्या गणेश पाटील यांची एकहाती सत्ता राहिलेल्या भोसे गटातून धक्कादायक निकाल समोर आला आहे. कारण निवडणूकीच्या अगोदर विठ्ठल परिवाराला सोडचिठ्ठी देवून भाजपाशी घरोबा केलेल्या भोसे गावचे सरपंच गणेश पाटील यांच्या मातोश्री प्रफुल्लता पांडुरंग पाटील यांना पराभवाला समोरे जावे लागले. त्या ठिकाणी आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार षण्मुखी भारत कोरके यांचा विजय झाला. गोपाळपूर गटातून भाजपाच्या दुर्गा गोपाळ अंकुशराव या मोठ्या फरकाने विजयी झाल्या. शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या प्रियंका पराडे यांचा त्यांनी दारुण पराभव केला. वाखरी गटात सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांचे बंधु समाधान काळे यांच्या पत्नी मोनिका काळे यांनी भाजपाच्या तिकीटावर निवडणूक लढविलेली होती. त्यांच्या विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवार मयुरी बागल या निवडणूकीच्या रिंगणात होत्या. या निवडणूकीत मयुरी बागल यांनी मोनीका काळे यांचा पराभव करीत बाजी मारली. रोपळे आणि भाळवणी गटात देखील आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळाचा गजर ऐकावयास मिळाला.

### जिल्हा परिषद गट निहाय विजयी

करकंब गट :- आदिनाथ देशमुख (विजयी - भाजपा). भोसे गट : - षण्मुखी भारत कोरके (विजयी- राष्ट्रवादी), वाखरी गट : मयुरी बागल ( विजयी, राष्ट्रवादी). गोपाळपूर गट : दुर्गा गोपाळकृष्ण अंकुशराव (विजयी-भाजपा). रोपळे गट : गितांजली हनुमंत साळुंखे (विजयी, राष्ट्रवादी) .भाळवणी गट : सुप्रिया गायकवाड (विजयी, राष्ट्रवादी काँग्रेस). लक्ष्मीटाकळी गट : नंदकुमार वाघमारे (विजयी, भाजपा) आणि कासेगाव गट : व्यंकट भालके (विजयी, तिर्थक्षेत्र विकास आघाडी)

### पंचायत समिती गणनिहाय विजयी उमेदवार

( करकंब : राहुल पुरवत (विजयी, भाजपा ) आणि उंबरे : शहाजी मुळे (विजयी, राष्ट्रवादी). भोसे : पुनम पवार ( विजयी, भाजपा) आणि गुरसाळे : महादेव पाटील (विजयी,राष्ट्रवादी). गोपाळपूर : रंजना आण्णा शिंदे (विजयी,भाजपा) पुळूज गण : ज्योती शिवाजी पांढरे (विजयी, भाजपा).वाखरी : निखील अरविंद गोसावी ( विजयी, भाजपा) आणि पटवर्धनकुरोली : प्रमिला झांबरे ( विजयी,राष्ट्रवादी काँग्रेस). रोपळे : विजया विलास भोसले (विजयी, राष्ट्रवादी) आणि सुस्ते : सावली अतुल गायकवाड (विजयी,शप राष्ट्रवादी) भाळवणी : विजय मोहन शिंदे (विजयी- भाजपा) आणि पळशी : अक्काताई लोखंडे ( विजयी, राष्ट्रवादी). लक्ष्मीटाकळी : वंदना फाटे ( विजयी, भाजपा) आणि खर्डी : शुभम आगावणे (विजयी, भाजपा). कासेगाव गण : प्रमोद देशमुख (विजयी, राष्ट्रवादी) आणि सरकोली : प्रियांका जाधव (विजयी तीर्थक्षेत्र विकास आघाडी)

# मंगळवेढ्यात 'समाधान'कारक विजय, विरोधक गारद








## विरोधकांना चारीमुंड्या चितपट करत तालुक्यावर भाजपाचे वर्चस्व

**जिल्हा परिषद: ४ पैकी ४ जागा (भाजप विजयी) - भोसे -प्रदीप खांडेकर, लक्ष्मी दहिवडी - करुणा शिवशरण. हुलजंती - संगीता दुधाळ संत दामाजीनगर - रमेश भांजे**

**पंचायत समिती: ८ पैकी ६ जागा (भाजप विजयी) संत चोखामेळानगर - दीपाली आनंद ताड, बोराळे - जयश्री कवचाळे, हुलजंती - अर्जुन मल्लाळे, मरवडे - मनीषा श्रीकांत गणपाटील, लक्ष्मी दहिवडी - विनायक यादव, भोसे - आप्पासाहेब निकम, रड्डे : सुरेश कांबळे (तीर्थक्षेत्र आघाडी), दामाजीनगर : जयश्री शिंदे (तीर्थक्षेत्र आघाडी)**

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ फेब्रवारी-**

मंगळवेढा तालुक्याच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर येत आहे. आमदार समाधान आवताडे यांनी आपल्या राजकीय कौशल्याच्या जोरावर विरोधकांना चारीमुंड्या चितपट करत मंगळवेढ्यावर भाजपचे वर्चस्व सिद्ध केले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत आवताडे गटाने 'एकहाती' सत्ता मिळवत विरोधकांचे बालेकिल्ले उद्ध्वस्त केले आहेत. मंगळवेढा तालुक्यातील ४ जिल्हा परिषद गटांत भाजपच्या उमेदवारांनी दणदणीत विजय संपादन केला असून, पंचायत समितीच्या ८ पैकी ६ गणांवर कमळ फुलले आहे. या विजयामुळे तालुक्यावर आमदार समाधान आवताडे यांची पकड अधिक घट्ट झाली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या निवडणुकीत अनेक मोठ्या राजकीय उलथापालथी पाहायला मिळाल्या: माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांना मोठा झटका बसला असून लक्ष्मी दहिवडी गटातून निवडणूक लढवणाऱ्या लक्ष्मणराव ढोबळे यांच्या कन्या कोमल ढोबळे यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. तर भोसे गटातून दामाजी साखर कारखान्याच्या संचालक बसवराज पाटील यांना मतदारांनी नाकारले असून, या गटात आवताडे समर्थकांनी विजय मिळवला आहे. गेल्या काही काळापासून भालके आणि ढोबळे गट आवताडे यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत होते. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात आवताडे यांच्या नियोजनापुढे विरोधकांचे सर्व डावपेच फोल ठरले. तालुक्याचा विकास आणि जनतेचा विश्वास याच जोरावर हा विजय मिळाल्याची भावना समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

या विजयानंतर मंगळवेढ्यात भाजप कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत आणि फटाक्यांच्या आतषबाजीत मोठा जल्लोष साजरा केला. दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकीत विरोधकांनी पत्रकार देखील बाहेरून आयात केल्यामुळे येथील स्थानिक पत्रकार नाराज होते. त्या सर्व्हेने केलेले सर्व अंदाज फेल गेले त्यामुळे सर्व्हेची विश्वासार्हता गेली असून याचा फटका देखील विरोधकांना बसला असल्याचे बोलले जात आहे. या विजयामुळे आमदार समाधान आवताडे यांची तालुक्यातील पकड अधिक घट्ट झाली आहे.




# माढ्यात मा.आ. शिंदेबंधूंचे वर्चस्व कायम

## लक्षवेधी ठरलेल्या कुर्डू व भोसरे गटात मा.आ. संजयमामा शिंदे यांचेच वर्चस्व

## खासदार आमदार गटाचा धुव्वा उडाला तर रणजित शिंदेंना मोठे यश


**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.९ फेब्रुवारी-**

माढा तालुका पंचायत समिती अंतर्गत जिल्हापरिषद गट व गणात मा.आ.शिंदे बंधूंनी आपले वर्चस्व कायम राखत विरोधी राष्ट्रवादी काँग्रेस श.प पक्षाचे खा. धैर्यशील मोहिते पाटील व आ. अभिजित पाटील गटाचा धुव्वा उडवला. सात पैकी सहा गटात आ. शिंदेबंधूंचे उमेदवार विजयी तर केवळ बेंबळे गटात शिवसेनेला एक यश मिळाले आहे. माढा तालुक्यातील पाच जि.प.गटात जिल्हा दुध संघाचे चेअरमन भाजपा नेते रणजितसिंह शिंदे यांच्या नेतृत्वात निवडणूका झाल्याने त्याच्यासाठी आजचे सर्वात मोठे यश मिळाले आहे.

### पक्षीय बलाबल

✻गट ४ भाजप, २ राष्ट्रवादी काँग्रेस, १ शिवसेना. ✻गण- भाजप ७ (एक पुरस्कृत) राष्ट्रवादी काँग्रेस - ५,अपक्ष १ ,तुतारी १

तालुक्यातील माढा विधानसभा मतदार संघातील ४ गटात भाजप तर १ गटात शिवसेना आणि माढ्यातील करमाळा विधानसभा मतदार संघातील २ गटात राष्ट्रवादी काँग्रेस (संजयमामा शिंदे गट) व १४ गणात एक पुरस्कृत सह भाजपचे ७, तर अपक्ष १ व राष्ट्रवादी शरद पवार तुतारीचा १ तर राष्ट्रवादी काँग्रेस(पाटील गट) उमेदवार १ निवडून आले आहेत.तर माढ्यातील करमाळा विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस (संजयमामा शिंदेगट)- ४ उमेदवार निवडून आले आहेत. माढ्यातील भोसरे व कुर्डू या गटातील निवडणूक ही लक्षवधी ठरली होती. या दोन्ही गटात शिंदे व मोहिते-पाटील गटाची थेट लढत होती. या लढतीत शिंदे गटाने आपले वर्चस्व कायम राखत मोहिते-पाटील यांच्या दोन्ही गटातील व गणातील उमेदवारांचा पराभव केला.



# मोहोळमध्ये भाजपाचा झेंडा; जि.प.च्या सहा पैकी चार तर पं.स.च्या १२ पैकी ७ जागांवर विजय

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.९ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ६ पैकी ४ जागा आणि पंचायत समितीच्या १२ पैकी ७ जागा जिंकून भाजपाने आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. राजन पाटील यांनी भाजपा प्रवेश केल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक होती .मागच्या वेळेत पंचायत समितीमध्ये सहा सहा असे समसमान बलाबल होते.यावेळी त्यात फक्त एकाचा फरक पडला आहे. मात्र राष्ट्रवादी अजित पवारचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील आणि त्यांचे बंधू शिंदे शिवसेनेचे नेते संतोष पाटील यांचा पराभव वगळता विजयराज डोंगरे आणि चरणराज चवरे यांचा भाजपच्या विरोधात झालेला विजय हा भाजपाला विचार करण्यास प्रवृत्त करणारा ठरेल असे दिसत आहे .एकूण विजयी उमेदवार आणि त्यांचे पक्ष त्यांना मिळालेली मते आणि पराभूत उमेदवार याची माहिती खालील प्रमाणे -

### गटनिहाय विजयी व पराभूत उमेदवार

**१) आष्टी :** विजयराज डोंगरे (अप राष्ट्रवादी) ४५४५ मतांनी विजयी. मिळालेली मते :-१२६१७ पराभूत समाधान शेळके (भाजपा) ८०७२ मते.



**२) नरखेड :** लखन शिंदे (भाजप) ६१० मतांनी विजयी. मिळालेली मते :-११२२३, पराभूत संतोष पाटील (शिंदे शिवसेना),मिळालेली मते:-१०६१३

**3) कामती (बु) :** विमल खताळ, पक्ष : भाजप, ५४२३ मतांनी विजयी, मिळालेली मते :-१३३९०, पराभूत अश्विनी पाटील, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मिळालेली मते:-७९६७,

**(४) पोखरापूर :** बालाजी नरुटे, पक्ष : भाजप, ५२८ मतानी विजयी, मिळालेली मते :-११६३१, पराभूत सर्जेराव निळे, पक्ष:-शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मिळालेली मते:-१११०३

**५) पेनूर :-** चरण चवरे, पक्ष : शिंदे शिवसेना, ७५२ मतांनी विजयी. मिळालेली मते :-१०१६४, पराभूत रामदास चवरे, पक्ष:-भाजपा, मिळालेली मते:- ९४१२






**६) कुरूल :-** सचिन जाधव, पक्ष : भाजप, १३०३ मतांनी विजयी. मिळालेली मते :-१११७४, पराभूत उमेश पाटील, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मिळालेली मते:-९८६१.

### गणनिहाय विजयी व पराभूत उमेदवार

**१) आष्टी :** डॉ. अमित व्यवहारे २३६६ मतांनी विजयी. पक्ष : अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मिळालेली मते :-६२३९, पराभूत मदनसिंह पाटील, पक्ष:- भाजपा, मिळालेली मते:-३८७३

**(२) खंडाळी:-** गणेश उत्तम मुळे, पक्ष:- अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, १२५५ मतांनी विजयी. मिळालेली मते:-५६३३, पराभूत सतीश भोसले, पक्ष:- भाजपा, मिळालेली मते:-४३३८

**(3) नरखेड :-** उल्का पाटील, पक्ष : भाजप, १४३४ मतांनी विजयी. मिळालेली मते :-५०८०, पराभूत प्रगती दगडे, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, मिळालेली मते:-३६४६

**(४) शिरापूर (सो) :-** नीलम मसलकर, पक्ष:-भाजपा, १०५ मतांनी विजयी. मिळालेली मते:-५१९३, पराभूत सायली चव्हाण, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, मिळालेली मते:-५०८८

**(५) कामती (बु) :-** कोमल अवताडे, पक्ष :-भाजप, ४३७ मतानी विजयी. मिळालेली मते :-४६११, पराभूत वैशाली शेळके, पक्ष:-अपक्ष, मिळालेली मते:-४१७४, विद्या कोळकुर, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, मिळालेली मते:-२०८५

**(६) सावळेश्वर :-** पार्वती गावडे, पक्ष:-भाजपा, १२९५ मतांनी विजयी. मिळालेली मते:-६०६१, पराभूत मयुरी शेंडगे, मिळालेली मते:-४७६६,

**(७) पोखरापूर :-** संजीव खिलारे, पक्ष:-भाजपा, २६८३ मतांनी विजयी. मिळालेली मते:-७२९९, पराभूत समाधान खंदारे, मिळालेली मते:-४६१६

**(८) सय्यद वरवडे:-** बाळासाहेब गायकवाड, पक्ष:-शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, २५२ मतांनी विजयी. मिळालेली मते:-४३२५, पराभूत राहुल मोरे, पक्ष:-भाजपा, मिळालेली मते:-४०७३.

**(९) पेनूर:-** संगीता वसेकर, पक्ष:-शिंदे शिवसेना, ५२८ मतांनी विजयी मिळालेली मते:-५३९९, पराभूत अंजली आढेगावकर, मिळालेली मते:-४८७१.

**(१०)टाकळी (सि):-** अमेरिका कापसे, पक्ष:-भाजपा, ३२३ मतांनी विजयी. मिळालेली मते:-४६४४, पराभूत स्वाती गवळी, पक्ष:-शिंदे शिवसेना, मिळालेली मते:-४३२१

**(११) कुरूल:-** धनाजी माळी, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, ६४७ मतांनी विजयी. मिळालेली मते:-५१२२, पराभूत बिरुदेव मोटे, मिळालेली मते:-४४७५..

**(१२) घोडेश्वर:-** असलम चौधरी. भाजपा, पक्ष:-भाजपा, ८८३ मतांनी विजयी, मिळालेली मते:-५९०८, पराभूत केशव पाटील, पक्ष:-अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस. मिळालेली मते:-५०२५